# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. V, AKOLA:—SATURDAY EVENING, FEBRUARY 5, 1870 NO. 6

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ५ माहे फेब्रूएरी सन १८७० इ० अंक ६



| किमतीचे दराव. | रु | आ |
| --- | --- | --- |
| वर्षाची आगाऊ देणारास… | ६ | ० |
| साल अखेर … … | ७ | ० |
| सहा महिन्याची आगाऊ … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ५ |
| फुटकळ … … | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व साल अखेर ३ रु० ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०१०६

इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to remind our subscribers that their Subscriptions, for the present and past years, should be remitted as early as possible, otherwise, we would, however reluctantly, be under the necessity ceasing to transmit the paper to their addresses. We believe that this reminder will not fail to arouse the sympathies of our Constituents in the country and bring about speedy remittances from defaulting Subscribers.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक


## वऱ्हाडसमाचार.

शनिवार सायंकाळ ता० ५ फेब्रुआरी.

लाभीं हर्ष नको विषादहि नको निंदा प्रशंसा नको ॥ हानीचा मनिं शोक तूं धरू नको देहीं अहंता नको ॥ कोणाचें इतिकृत्य तें स्मरु नको माझें तुझें हें नको ॥ आप्तांशी ममता नको गुरुपरब्रम्हासि सोडूं नको ॥ १ ॥

## इंडियन स्कालरशिपूवर धाड.

( मागील अंकावरून पु. चा. )

(हा विशय पुढें चालविण्यापूर्वीं, आमचे मनांत साहजिक कल्पना उद्भवली ती आमचे प्रीय व मर्मज्ञ वाचणारे यांच्या पुढें ठेविल्यावांचून रहावत नाहीं, ती ही इंडियन स्कालरशिपस हें हेडींग, पाहिल्याबरोबर आम्ही पुढें काय लिहिणार याची अटकळ आमचे सुज्ञ वाचकांस सहज करतां येईल. तसेंच या लिहिण्यापासून विशेषसा फायदा नसून उगीच कोंडा काढून तांदुळ काढण्यासारखी खटपट करण्यांत अर्थ काय? व इतर उपयुक्त विषयांकडे लक्ष न देतां आम्ही आपला व दुसऱ्याचा वेळ व्यर्थ खर्च केल्याचा दोष आम्हांवर येणार आहे. हें आम्ही पुर्णपणें समजत आहों, या शंकेबरोबर आम्ही आपली लेखणी कांहीं वेळ पावेतों कानांत खोंवून ठेविली होती. परंतु पुन: आपलें कर्तव्य कर्माकडे लक्ष देऊन हातीं धरली. या आमच्या लिहिण्यापासून कागद, शाई, वेळ यांचा व्यर्थ खर्च होणार हें आम्ही कबूल करतों परंतु ज्या अर्थीं लोकांचीं दु:खें सरकारापुढें नेऊन ठेवण्याचा धंदा पत्करला आहे त्याअर्थीं या बाबदींत लोकांचें म्हणणें काय आहे हें जर वेळोवेळीं न दाखविलें तर आमच्यावर केवढा दोष येणार आहे? व यामुळें ईश्वरापुढें अपराधी होऊं यांत ही संशय नाहीं. या गोष्टीचा विचार करून हा विषय यथामती पुढें चालविण्याविषयीं वाचकांची परमाणगी घेतों.)

खर्चाचे बाबदींत विचार केल्यास, हिंदु लोकांचा खर्च, इंग्रज लोकांचे खर्चा पुढें कांहींच नाहीं. युरोपियन लोकांस ज्याप्रमाणें ऐषआरामाचा, व दारूचा खर्च आहे तसा हिंदु लोकांचा कोठें आहे. आतां आमचे वाचकां पैकीं कोणी अशी शंका घेईल कीं दारू प्याल्यावांचून चालणार नाहीं कीं काय? याचे उत्तर असें असें आहे कीं; कधींही चालावयाचें नाहीं कारण युरोपियन व त्यांत विशेषें करून इंग्लिश लोक हे आकाशांतील बापांचीं लेकरें आहेत ती इतरा सारखी नाहींत याज करितां त्यास मद्यरूप अमृत पिऊन रोज विमानांत बसून आकाशांतील बापा कडे मोठें थाटानें जावें लागतें तेथील नाना प्रकारचीं सुखें त्यांस प्रत्यहीं भोगण्यास सांपडतात. तेव्हां दारू शिवाय कसें चालेल. एकादे दिवशी या मुलां पैकीं एखादें लेकरूं दारू पिऊन त्यांज कडे न गेल्यास आकाशांतील बाप्पा त्या साठी ढळढळा रडतो, त्याला चतकोर पाव सुद्धा जातनाहीं, मग तो दारू पिऊन कसा तरी दिवस काढतो असें असतां हिंदु लोक पापभिरू, शास्त्राप्रमाणें चालणारे धर्मज्ञ, असे असल्याने त्यांस मात्र त्या वेळची त्यांची कृयें वाईट वाटतात, व दारू पिण्याचा खर्च व्यर्थ समजतात परंतु ही जी हिंदुलोकांची चूक ती अवळा येवढी तरकाय परंतु मोठ्याशा कोहाळ्या येवढी आहे. ही लेकरें कधीं कधीं कोणा हिंदूस आकाशाचे बापाकडे जातांना एकदम मुक्त करितात कोणांस प्रसाद रूप मुष्टी मोदक देतात; कोणांची अंगे व्यंग करितात हा त्यांचा उपकार लहानकायहो? येवढें कशानें होणार तर ती अमोलिक जी बाटली बाई तिच्या लाडिकपणानें हीं कृत्यें होतात. अशा या इंग्लिश लोकांचे खर्चाचे बाबदींत स्टेट सेक्रेटरीकडून याजविषयीं कैवार घेऊन जें उत्तेजन त्यांस दिलें हें त्यांनीं आपले टोपी पाटलोण, व स्वत:चे अनुभवावरूनच दिलें. आतां या आमचे लिहिण्यावरून सर्वच युरोपियन असे आहेत असें आमचें बिलकूल म्हणणें नाहीं त्यांतही कांहीं सुस्वभावचे असून, आमचे करितां म्हणा अगर खऱ्या गोष्टीकरितां म्हणा बहूत झटताहेत परंतु अशा लोकांची संख्या पाहूं गेल्यास समुद्रांत जसा वाळुचा कण त्याप्रमाणेंच सांपडणार आहे, असो. अशा प्रकारें त्यांचा खर्च असून मोठमोठ्या जागा त्यांस असणें हें जरूर आहे, हिंदुलोकांत तशा जागेची लायखी नाहीं हें उघडच आहे, जास्त विचार केल्यास कोणाचेही लक्षांत असें सहज येईल कीं, हल्लीं जे हिंदु लोक कांहीं कांहीं मोटमोठाले हुद्यावर आहेत हे त्यांचे दृष्ठीनें अगदीं अन्याय आहे कारण त्या जागेवर सुद्धां आकाशांतील बाप्पाचे लेकरांचाच हक्क आहे असें म्हटल्यास कांहीं हरकत नाहीं.

आम्ही जो वर प्रकार दाखविला याजवरून कोणी आम्हांस कृतघ्न पणाचा दोष देईल कारण हल्लीं हिशेबांत मोठी चूक झाली आहे तिचा निवारणार्थ नशा खर्चाच्या इतर बाबी कमी केल्या व करीत आहेत त्याच प्रमाणें हाही खर्च कमी केला जर अशा प्रसंगीं खर्च कमी न करावा तर लोकांवर कर बसवावा लागेल व तशानें लोकांवर जुलूम होणार आहे आणि त्या जुलूमा पासून असंतोष उत्पन्न होऊन प्रजेस कांहीं अंशीं तापदी होणार आहे हा सारासार विचार मनात आणून आपल्याच लोकांच्या हिता वर दृष्टि देऊन, ह्या गोष्टी अमलांत आणल्या याबद्दल आभार मानणें एके बाजूस राहून उलट दोषा रोप करणें हा अन्याय आहे. होय आम्ही ही ही गोष्ट कबूल करतों, परंतु ह्यास उलट शंका अशी आहे कीं एकच कायदा एका मनुष्यास बाधक व एकास साधक कसा होतो हें अम्हांस समजत नाहीं हिंदुस्थानची प्रजा अजमासें वीस कोटी असतां तिच्या प्रीत्यर्थ अजमासें पन्नास हजार रुपये खर्च फार आहे काय बरें ह्या खर्चापासून फार नफा जाला असेल असें म्हणावें तर तसें नाहीं ही फक्त नेटिव रकमेचाच कायतो लाभ दुसरें असे युरेशियन व इंडोब्रिटन यांच्या मुलांकरितां जो ठराव झाला तोही ह्या प्रसंगीं बंद करणें योग्य होता, पण माजी लोक प्रीय उदार, भाग्यशाली गुळवट, फ्रियर साहेब गवरनर असतां व ग्रयांट साहेब डिरेक्टर असतां त्यांनीं हा ठराव केला, त्या वेळीं वर्तमान पत्रकर्त्यांनीं पुष्कळ आरोळ्या मारिल्या व हा नेटिवांचा पैसा आहे त्याअर्थीं त्यांच्याचकडे हा पैसा खर्च व्हावा हें योग्य आहे अशा प्रकारें पुष्कळ रीतीनें स्पष्ट करून दाखविलें असतां तिकडे दुर्लक्ष करून तो ठराव कायम केला. ठराव करते वेळीं हे लोक गरीब सबब यांचा अभ्यास पुढें चालावा एतदर्थ ही तजवीज हें कारण लावलें. आतां हें वाचून कोणास ही हंसूं आल्यावांचून रहाणार नाहीं नेटिव लोकांत ज्या अडचणी आहेत त्यांच्या शतांश सुध्दां त्या लोकांस नसतील हें आम्ही खातरीनें सांगूं शकतों आमचे लोकांस फार तर काय परंतु शाळेंत शिकण्याकरितां जी फी, द्यावी लागते ती सुध्दां मिळत नाहीं मग बूकें, कपडे, उदरनिर्वाहा विषयीं तर बोलणेंच नको. व याच कारणामुळें बहुतेक गरीब परंतु होतकरू मुलांस आपला अभ्यास लहानपणी सोडून देऊन पोटाच्या मागें लागावें लागतें बरें कसेंही करून सरासरी म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेपर्यंत दिवस काढून कांहीं मुलें अभ्यास करितात तरी देखील त्यांस आश्रय सरकारांतून मिळत नाहीं परंतु युरेशियन लोकांविषयीं तसें नाहीं सरकारी पैशांतून दरमहा ३०, ४०, ५० अशा भडाभड रकमा खर्च पडत आहेत त्यांच्या गरिबीविषयीं जर विचार केला तर शाळांत ज्यावेळीं हीं मुलें जातात त्या वेळीं घोडे, गाडी अशा थाटानें जातात यावरून साधारण बुद्धीच्या मनुष्यास देखील कल्पना करितां येईल कीं जो म्हणून गरीब आहे ज्यास विद्याभ्यास करण्याची ऐपत नाहीं त्यास असले जिन्नस, जनावरें घेण्याची कधींही इच्छा उत्पन्न होणार नाहीं असें असून आमचे सरकारासच जर ते गरीब वाटले असतील तर आम्ही साफ असें म्हणतों कीं, घरें भरण्याकरितां ही एक दक्षणाच देण्याची युक्ति काढली तिसरें असें कीं जेव्हां जेव्हां नेटिवांचा व युरोपियनांचा संबंध येतो त्या वेळीं युरोपियनाचा पक्षपात

पासून येतो, लष्करी खात्याच्या संबंधानें ज र विचार केला तर आमचाच पैसा असून आमेच लोकांस राहण्यास झोपड्या व सोजिर लोकांस राहण्यास शानदार, हवाशिर अशा बराकी, चांगले बंगले वगैरे बंदोबस्त नोकरांविषयीं जर विचार केला तर आम्हांस असें वाटतें कीं युरोपियन लोकांपेक्षां नेटिव लोक पुष्कळ कामें करून तीं ही उत्तम करितात असें असून हा असा भेद आमचे सुज्ञ सुशिक्षित शहाणे, विद्वान राज्य कर्ते कां धरतात कोण जाणे. असो या विषयीं आम्ही किती जरी लिहिलें तरी संपायाचें नाहीं अशी एक म्हण आहे कीं उडदा माजी काळे गोरे काय निवडावे निवडणारे ईस अनुसरून आम्ही आपला विषय पुरा करतो व शेवटीं सरकारास अशी सूचना करतो कीं जर खर्च कमी करण्याच्या संबंधानें इंडियन स्कालरशिपास बंद करणें असतील तर ही परिक्षा हिंदूस्थानांतच घेण्याचा हुकूम व्हावा व दुसरे जे निरर्थक इतर खात्यांत खर्च होत आहेत ते बंद करावे म्हणजे यापासून लोकांचा भरवसा सरकारावर दिवसें दिवस ज्यास्त बसणार आहे व ज्या वेळीं हा मुलुख खुद्द राणी सरकारच्या ताब्यांत गेला त्या वेळीं जें वचन दिलें आहे त्यास बहुत बळकटी येणार आहे व या पासून उभयतांस ही फायदा आहे. आम्हांस आपली लेखणी पुसण्या पूर्वी असें सुचवणें भाग आहे कीं आम्ही मागील व ह्या निबंधांत युरोपियन लोकांचे जे दोष काढले आहेत त्यावरून आम्ही कृतघ्न आहों अशी कोणी शंका घेईल कारण यांच्या योगानें आमचे पुष्कळ कल्याण जाहलें आहे, हा देश जो हल्ली पुष्कळ सुधारला आहे व पुढें ही सुधारत चालला आहे हा सर्व यांचाच उपकार होय तर याबद्दल असें समजावें कीं आम्ही जें लिहिलें तें सरकारास उद्देशून मुळींच लिहिलें नाहीं आम्हास पूर्ण माहीत आहे कीं मूळ सरकारचा हेतू आम्हा विषयीं अगदीं वाईट नाहीं उलट आमचे बरें करावें असा आहे त्यांच्या योगानें जें आमच्यावर उपकार झाले आहेत ते अपरमित आहेत परंतु मध्यें जे कारभारी आहेत ते लोभी मत्सरी हेवेखोर कपटी जात्याभिमानी असल्यामुळें आम्हांस त्याच्या वरील स्वभावामुळें जीं दुःखें भोगावीं लागतात तीं हीं अपरिमित आहेत त्यास त्यांनीं हा आपला स्वभाव टाकून ताळ्यावर यावें व सरकारच्या उद्देशास अनुसरून चालावें अशी आमची त्यांस शिफारस आहे.

ताजा कलम हा निबंध लिहून गेल्या वर युरेशियन व इंडू ब्रिटन यांच्या स्कालरशिप बंद तर केल्या नाहींतच परंतु ऐथून पुढें कोणास मिळणार नाहींत म्हणून डिरेक्टर साहेब मुंबई यांनीं सरकारी ग्याझिट मध्यें नोटिस लावली आहे हें एकून कोणास ही समाधान झाल्यावांचून रहाणार नाहीं कारण गरिब हिंदूच्या पैशावर दुसऱ्यांनीं पोट भरावें हा अगदीं अन्याय आहे ज्याचा पैसा त्याच्याच कामीं लागावा हेंच योग्य आहे.

## CHANDA COAL.

MR. A. R. BINNIE, officiating Executive Engineer of the Nagpore Division, has made a careful calculation of the distance towards Bombay to which Chanda coal can be carried on the G. I. P. Railway with profit. It takes at present two tons of Chanda coal to do the work of one ton of English. The cost of carriage, therefore, of Chanda coal going towards Bombay must be considered as twice that of English coal coming from Bombay towards Chanda. The question is, at what point in the directon of Bombay does Chanda coal, estimated to cost at Chanda only Rs. 5 per ton, become as dear as English coal brought from Bombay, having there coast Rs. 30 per ton? This will of course depend on the exact cost of carriage to the G. I. P. Railway of the coal it uses. That railway charges about 10 pie per mile for *goods*—of which about half is supposed to be profit, the other half going to working expenses. The cost of carrying *two* tons of Chanda coal (equal to one ton of English) may thus be considered as something less than 10 pie per mile; and the distance between Chada and Bombay is 546 miles. It is clear then that at Bhosawul, for instance, which is about half way (271 miles from Chanda and 273 from Bombay) though the cost of carriage of the Chanda coal is nearly twice as great as that of the English coal for a little smaller distance (Rs. 8-7-6 against Rs. 4-4-3) yet that the original cheapness of Chanda coal (Rs. 10 for two tons against Rs. 30 for one ton) makes the Chanda the cheaper by no less than Rs. 15-12-9. In all probability the point up to which the Chanda coal preserves this advantage is Egutpoora, the changing station at the top of the ghauts only 75 miles from Bombay. More over, though the Chanda coal hitherto experimented on has proved only half as effective as English coal, yet it is confidently expected that the Chanda field really contains coal of a much better quality. If this should prove so, Chanda coal may depose English from its pre-eminence even at Bombay itself.—*Pioneer.*

*(Communicated)*

## TO VISHNU SHASTREE PANDIT.

Why Luther braved the brunt of papal rage?
And stood the clamours of that bigot age?
Why eager men lur'd by his doctrine's charms,
His cause supported with the force of arms?
He loved the truth. He won a glorious prize.
Now nations view his work with wondering eyes.
Truth laid aside, if country's good demands.
Some novel change at patriots' helping hands,
A change in people's manners old and ways,
Which people loved and prized from former days,
Should not one Pundit rise to save his race.
From tears at the ruined girls' melancholy face?
Times change, and yes! So change all human things,
So nature with her kind manœuvre sings.
Wherefore newrivers start and earthquakes spread,
The settled earth with ruin and slaughter dread.
Such is His law and such it always seems.
From seeming evils grace eternal gleams.
Though such the widow's cause, the hardy mob.
Feels not the female wail and rend ing sob.
Your heart alone discerned the widow tear.
Your knowledge glow'd to help the matter dear.
If e'er true merit claims a sound applause.
Your efforts such claim in the noble cause.
Though bigots blind triumphant roar today.
Your trophies glitter with a brillant ray.
For helpless widows, with a steady pace.
May sure success your noble structure grace.

D. P.

---

We very much regret to observe that the erection of our Clock tower near the town of Oomerawuttee has suddenly stopped. The building was intended to be both useful and ornamental to the Town, but why it has come to a stand still, we are quite unable to understand. Sum 8 or 10 thousand rupees were sanctioned about two years ago, but up to date it has not advanced beyond one fourth of the height intended. The estimate for its erection was we believe, prepared by a scientific Engineer of Government, who must have made ample provision for the full cost. The money is to be paid from the municipal funds collected from the Town people. Why they are then silent in the matter. We presume they have a right to ask the cause of the sudden stoppage of the work Why it was entrusted to the Public Works Department, is puzzle that cannot be easily solved. We have a Local Eund Engineer, who receives a handsome salary; he is a thorough seientific Engineer and the work ought to have been entrusted to him. A clock has been got up from England, it has cost 4 thousand rupees, the half of which was contributed by the Towns people. It arrived here more than two years ago, and it is lying uselessly some where at the Sudar Station, allowed to rust and go to nothing. Is this the way to lavish our Municipal Funds; What is our Municipal Committee about, and do they not look into such important matters. The money in sanctioned, it is expended and gone, no one knows where or how indeed the present state of the Clock Tower is a positive disgrace, and it is with some reluctance that we make mention about it. We appeal to our energetic Deputy Commissioner to our benevolent Commissioner and to our Excellent Resident, to look into this delay and cause our beautiful Tower to be quickly finished, and our clock put up to the gratification of countrymen who are anxiously waiting to see the Clock Tower quite finished and completed.

---

## वऱ्हाड.

गवरनरजनरल व हायदराबाद येथील सि. बी. सांडर्स साहेबांच्या स्वाऱ्या खामगांव स्टेटरेलवेची सुरवात मोठे समारंभानें करण्या करितां चालूमहिन्यांत येणार आहे.

मिसमेरी कारपेंटर बाई ही सध्या नागपुरास तिकडील शिक्षण क्रम कसे चालले आहे तें पाहाण्यास गेल्या आहेत. ह्या बाई वऱ्हाडांत स्त्री शिक्षणाचे पाऊल कितपत पुढें आहे हें ही पाहाण्याकरितां थोड्याच दिवसांत येणार आहेत.

एवतमाळचे तहशिलदार लाला शालिग्राम त्याची नौकरीचीं वर्षे पूरीं भरल्यावरून पेनशन देण्याचा विचार झाला म्हणून पुढें लिहिल्या प्रमाणें व्यवस्था करण्या विषयीं रसिडेंट साहेबाकडे लिहून गेले आहे. शेखहिम्मत मोहिदीन दुसऱ्या प्रतीचे तहशिलदार ह्यास पहिल्या प्रतीचे तहशिलदार नेमिले. अबदूल अजीजशा तिसऱ्या प्रतिचे त. हशिलदार यांस दूसऱ्या प्रतीचे तहशिलदार नेमिले. रा. रा. भास्कर महेश्वर आफिशियेटींग तहशीलदार त्यास तिसऱ्या प्रतीचे तहशीलदार नेमिले. रा. रा. बळवंत बापूजी त्यांस आफिसियेटींग तहशीलदार नेमिले. स० प्र०

वाशिमाहून पत्र आल्यावरून कळतें कीं मे० लायल साहेब कमिशनर यांची स्वारी पुसद उमरखेडकडून पाचवे तारखेच्या सुमारास सेशनाकरितां तेथें जाणार आहे व क्या० मेकंजी साहेब असिस्टंट कमिशनर इनचार्ज, वाशीम हे त्यांस भेटण्याकरितां जात आहेत.—

मे० डा० सिंक्लेर साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर यांची स्वारी वाशिमास गेली आहे शाळांच्या परीक्षा चालू आहेत, बक्षिसें वांटण्यांचा व मुलीस पदक वांटण्यांचा समारंभ बहुधा पांचवे तारखेस होईल— तेथील इंग्लिश मराठी शाळेंत इंग्लिश अभ्यास थोडा चालतो व तें हल्लीं जिल्ह्याचें सदर स्टेशन असून तेथें ब्राम्हण वस्ती ही पुष्कळ आहे त्या मानानें नाहीं याहून चांगले प्रकारचे इंग्लिश स्कूल तेथें पाहिजे. व त्या प्रमाणें डायरेक्टर साहेब तजवीज करितील तर फार चांगलें होईल:—रा. रा. रसतक दीन दयाळ एकस्ट्रा असि० कमिशनर यांस त्या जिल्ह्यांतील अव्वल दिवाणी दाव्याचा १००० रुपये पर्यंतचा अधिकार दिला आहे. याशिवाय सेकंड क्लास सबार्डिनेट माजिस्त्रेटचा व डिस्ट्रिक्ट रजिष्टरचा अधिकार त्यांकडे दिलेला आहेच तेथील तहशिलदाराकडील दिवाणी अधिकार कमी केला—अकोल्याचे तुरुंगांतून दहा वर्षांचे कैदेचा वाघ्या नावाचा एक कैदी तीन माहिने झाले पुसद तालुक्यांत त्याचें घर आहे तिकडे पळून गेला आहे. व तो रस्ता लूट वगैरे करून लोकांस त्रास देत आहे व तिकडील पोलिस सुपरिंटेंडेंट साहेब त्याच लगत्यास आहेत तर ते त्यांस लवकर पकडण्याची तजवीज करितील तर बरें होईल—वाशीम जिल्हा कचेरीचें काम सुरू असलेले सुमारें एक महिन्यानी पुरें होईल.—शाळेकरितां एक मोठी इमारत अकोल्यास व खामगावास झाल्या प्रमाणें वाशिमास ही लवकरच होणार आहे. व त्या करितां १६०००, रुपयांचें सांगशन झालें आहे. ही इमारत गावाबाहेर कचेरी जवीक बांधणार असें ऐकल्यानें गांवकरी लोकांस फार वाईट वाटत आहे. व इतक्या लांब स्कूल बांधलें तर मुलांस त्रासकारकही होईल याजकरितां अजून सुरुवात झाली नाहीं तों ती सुंदर इमारत गांवातच किंवहुना गावास लागून तरी बाहेर बांधल्यास फार चांगलें होईल.

अकोल्याहून वाशिमास जाणारी सडक मालेगावां पर्यंत चांगली आहे. व पुढें काम चालू आहे. ही सडक हिंगोलीचे छावणी पर्यं

त नेणार आहेत सडकांचे रस्त्यापासून सुख किती आहे याचा, मलिगावा पुढील वाईट रस्त्यानें कोस दोन कोस चालून माणूस आसलें म्हणजे, पूर्ण अनुभव येतो.

वाशिमास कापसाचा तग होण्याचीं तजवीज चालली आहे. तेथिल उदमी लोकांनीं व सरकारी अधिकाऱ्यांनीं या कामीं अकोल्याचें उदाहरण लक्षांत आणावें—

पुसद तालुक्यांत एका सुताराचा खून झाला त्याचा अजून पत्ता लागला नाहीं। यांत कांहीं स्त्रीचा संबंध असल्याचें ऐकण्यांत आहे

पोलिस खात्याचें जानेवारीच्या पगाराचें तके मागाहून दुसरा हुकूम येईपर्यंत तहकूब झालें आहेत काय होतें पहावें.

## अकोला.

### NOTIFICATION.

No.11

*Hyderabad Residency*
*Dated 24th January* 1870.

Under the provisions of Act. IX of 1860 the Resident is pleased to invest the Assistant Commissioner for the time being at Akola with powers to take up and decide cases under the act as there in preseribed.

By Order
(Signed) W. Tweedie
Officiating 1st Assistant Resident.

दुसरा एक चित्पावन जातीचा ब्राम्हण वय १८ गोत्र शांडिल्य हे विधवेशीं लग्न करण्यास तयार आहेत जास्त माहिती रा. रा. वामनराव प्रभाकर यांजकडे मिळेल.

मेहेरबान सांडरस साहेब रेसिडेंट, बहादूर वसर सालरजंग साहेब बहादूर व गवरनर जनरल साहेब बहादुर हे खामगांव येथिल स्टेट रेलवे सूरू करण्या करितां तारीख १५ रोजीं इकडे येणार तेथून साहेब बहादूर इकडे येऊन उमरावती व इलिचपुर पाहाण्यास जातील असें कळतें.

मेहेरबान बैमनजी जामासजी असिस्टंट कमिशनर हे मुंबईस कांहीं रेसिडेंट साहेबांची सरबराइची व्यवस्था करून आणण्याकरितां काल गेले आहेत.

अकोट जळगांव येथील तहशीलदार यांस ५० रुपये पर्यंतचे दिवाणी दावे तपासण्याचा अधिकार मिळाला.

गवरनर जनरल साहेब बहादूर व रेसिडेंट साहेब बहादूर इकडे येणार सबब त्यांचे सन्मानार्थ जमीनदार लोकांस येण्या विषयीं सूचना केल्या आहेत.

डिपुटी कमिशनर साहेब हे आपल्या क्लार्कसह खामगांवास गेले आहेत.

मे० फिटिझरल्ड साहेब हे वाशिमहून इकडे येऊन चार दिवस झाले अद्याप काम पाहूं लागले नाहींत.

मे० बर्नसाहेब ह्यांची स्वारी बाहेर फिरत आहे त्यांस सदरस्टेशन येथें रहाण्यास बोलाविलें आहे.

विद्यासंबंधीं इमारतींनीं वऱ्हाडास चांगली शोभा आणिली आहे. जागोजाग सुंदर शाळागृहें होत आहेत, व तीहि दरिद्र्याच्या प्रपंच्याप्रमाणें नव्हत; सोळा हजार, अठरा हजार, वीस हजार रुपये पर्यंत खर्चाची होत आहेत. या गावांत टोलेजंग शाळा झालेली लोकांचे नेत्रास नित्य सुखानुभव देत आहे याच परीची खामगांवास झाली आहे. उमरावतीस व वाशिमास होत आहेत, जळगांवास काम चालू आहे, हायस्कुलांकरितां ही एथें आणि उमरावतीस चांगल्या इमारती आहेतच; इतका सर्व सुंदर सेन असतां या खात्याचे मुख्य धुरंधर मे० डा० सिंक्लेर साहेब यांच स्वत:चे आफिसाकरितां एक छानदार बंगला नाहीं ही किती विलग गोष्ट आहे! सुदाम देवाच्या झोपड्याप्रमाणें भाड्याच्या बंगल्यांत आजवर काळांत विद्यालायाचें मुख्य आफिस नसावें असा आमचा अभिप्राय आहे. आफिसाचा दृष्टीनें पाहिलें तर कमिशनर आफिस डिपुटी कमिशनर आफित, पोलिस आफिस, पोस्ट आफिस, इंजिनियर आफिस, इत्यादि नवीं झालीच आहेत, आणखी फार काय सांगावें! धर्मार्थ दवाखाना, मार्केट, लायब्ररी, धर्मशाळासुद्धां अकोल्यास नव्या, मोलवान, व सुशोभित झाल्या आहेत. आणि अशा सुंदर मेळाव्यांत डायरेक्टर साहेबांस भाड्याचें आफिस म्हणजे फारच मोठी उणीव आहे! असें आम्ही पुन: म्हणतों वऱ्हाडाचे शेजारी नागपुर प्रांत आहे तेथेंही डायरेक्टर साहेबांकरितां आफिस बांधणें आहेच, या गोष्टीचा विचार व्हावा.

मि० मिर नजीर अह्मदखा जळगांव जामोद येथील तहशीलदार यांनीं पेनशन घेतल्यामुळें त्यांचे जाग्यावर कमिशनर साहेबांचे कचेरींतील डेपुटी क्लार्क ऑफ धि-कोर्ट मि० मीर इनायत हुसेन यांस ऑफसीयेटिंग तहशीलदार नेमले हें लिहिण्यास आम्हांस फार आनंद होतो. हे तिकडे लोक प्रीति चांगली संपादन करतील अशी आशा आहे. हे आपल्या नवीन नेमलेल्या जाग्यावर सोमवारीं जाऊन चार्ज घेतील असें कळतें.

मेहेरबान कमिशनर साहेब दोन तीन दिवसांनीं वाशिमहून परत येणार आहेत

## वर्तमानसार.

The Right Honourable the Governor in Council has been pleased to confer the title of "Rawsaheb" on Mr. Gunpatrao Moroba Pitale Assistant to the Registrar and Librarian Bombay University.

The death of the Dowager Lady Avabaee, widow of the late Sir Jamsetji Jeejeebhai, which melan choly event took place on the morning of the 24th instant, is regretted by all the sections of the Bombay Community. The deceased lady was in her 78th year of age. Her charities were extensive, and she was a worthy companion of her partner in life. Her kind disposition was well known, and her sons will no doubt feel her loss for a long time.

The Hon'ble A. D. Sassoon has, we are glad to learn from the *Bombay Gazette*, presented Rs. 10,000 to the charitable institutions of Madras. a like sum having been given to Calcutta on the occasion of his visit to the capital of India during the regime of Sir John Lawrence.

विलायतेंतील स्त्रियांचीसभा व योग्यता —विलायतेस संयोगजन्य रोगाच्या प्रतिबंधार्थ अलीकडे दोन कायदे झाले आहेत. त्यांच्या योगानें स्त्रियांत मोठी पंचाईत झाली आहे व त्याजवर पोलीसच्या लोकाकडून फार जुलूम होतो. अनीति अधिक वाढत जाऊन स्त्रियांच्या हक्कास धक्का बसतो असे सर्व विचार मनांस आणून विलायतेंतील कांहीं प्रतिष्ठित स्त्रियांचा समाज जमला आणि "लेडीज नाशनल असोशिएशन" ह्मणून हे कायदे रद्द करण्याकरितां प्रयत्न करण्याच्या हेतूनें त्यांनीं सभास्थापन केली. त्यांचा उद्देश वगैरेविषयीं जाहिरात सुमारें सवाशें वर स्त्रियांच्या सह्यांनिशीं प्रसिद्ध झाली आहे. एक व्यवस्थापक कमिटी, चिटणीस, खजिनदार वगैरे कामगार नेमले. ते आपल्या देशबांधवांस या कामांत मदत करण्याविषयीं विनंती करीत आहेत आणि स्पष्टपणें कळवितात कीं, ही गोष्ट आह्मी सहजावृत्ती मनावर घेतली नाहीं आणि ती आह्मी सहजावृती सोडूनही देणार नाहीं. कारण यांत फक्त स्त्रीजातीच्या हक्काचाच विचार आहे असें नाहीं तर त्यांत सर्व राष्ट्रांच्या नीतीचा विचार आहे. याजवरून विलायतेंतील काय योग्यता आहे हें स्पष्ट समजतें. इतपत पाणी आमच्या पुरुषांत नाहीं तेव्हां बायकांत कोठून असणार?

इ० प्र०

वकिलीची परीक्षा——ही परिक्षा ता० ८ फेब्रुवारी १८७० पासून सुरू होईल. व ही परीक्षा घेण्याकरितां हाय कोर्तांतून खालीं लिहिलेले परिक्षक नेमले आहेत.

मे० जस्टीस मेलविल साहेब व मि० खंडेराव चिमणराव बेंदरकर, हायकोर्टांतील डेपुटी रजिस्टर, मि० खरसेटजी रुस्तुमजी ठाणेवाला कल्याण येथील सबार्डिनेट जज्ज, आणि मि० कोनटम सोलापूर येथील सबार्डिनेट जज्ज. याप्रमाणें नेमणूका केल्या

एक्झामिनर पत्रावरून असें कळतें कीं, कलकत्ता येथील करन्सी आफिसामध्यें शंभर रुपये दराच्या अशा दहा हजार रुपयांच्या नोटी एकाएकीं आफिसांतून चोरीस गेल्या. याचा पत्ता अद्यापपर्यंत लागला नाहीं.

हिंदुसणांच्या सुट्या.—गेल्या सरकारी ग्याजेटमध्यें यंदाच्या सालच्या हिंदु सणांच्या अकरा सुट्या येणें प्रमाणें तारखिवार मंजुर केल्या आहेत:— मकर संक्रांत, १२ जानेवारी, महा शिवरात्र २८ फेब्रुवारी, होळी, १७ व १८ मार्च, रामनवमी १० एप्रिल, नारळी पौर्णिमा १८ आगस्ट, जन्माष्टमी १९ आगस्ट, गणेशचतुर्थी ३० आगस्ट; दसरा ४ आक्टोबर, आणि दिवाळी २४ व २५ अक्टोबर.

गेल्या सरकारी ग्याझेटा मध्यें विद्या खात्याचे डिरेक्टर यांच्या सहीची जाहारीत प्रसिद्ध झाली आहे कीं, हायस्कुलांत व कालेजांत युरोपियन व युरेशियन यांच्या नेमणुका ज्या मिळत असत त्या बंद करण्यां विषयीं हिंदुस्थान सरकारचा हुकूम झाला आहे व त्याप्रमाणें त्या बंद होऊन पुढें नविन नेमणुका होणार नाहींत.

मुंबई आम्हांस लिहिण्यास फार आनंद होतो कीं प्रसिद्ध वे. शा. सं. रा. रा. महादेव गोविंद शास्त्री कोलटकर यांचे पुत्र रा. रा. बाळाजी नारायण कोलटकर यांस १०० रु० पगारांवर श्री. रा. तात्या साहेब यांनीं सांगली संस्थानांतील मुलकीकडील हुजुर शिरस्तेदार नेमले बळवंत राव हे चतुर व हुशार असून चांगले कारकून आहेत आणि दैव योगें सांगली संस्थानांतील वरें वाईट करण्याचें काम त्याजकडे आलें आहे. तेव्हां जशी त्यांचे चुलते यानीं लोक कल्याणें व विद्या वृद्धि या कामांत आपल्या कडून होण्या सारखे होते तेवढें करून कीर्ति व लोक प्रीति संपादन केली याप्रमाणें बळवंतराव हे आपल्या हातीं असेल तितके लोक कल्याण करून कीर्ति व लोक प्रीति संपादन करतील अशी आशा करतों.

इं० प्र०

हे गृहस्थ या पत्राचे मालकांपैकीं एक मालक आहेत.

फ्रान्स—पिअर बोनापार्ट नावाचा राजपुत्र याने कांहीं खाजगत आकसावरून मास्यू, व्हिक्टर नायर नामे एका फ्रेंच वर्तमान पत्राचे एडिटरास गोळी घालून ठार मारिलें. ह्या प्रकरणीं फौजदारी अधिकाऱ्यांकडेस फिर्याद झाल्यावर राजपुत्रास पकडावे म्हणून हुकूम झाला व त्या हुकुमाप्रमाणें राजपुत्रास "माझास" नांवाचे तुरुंगांत कैद करून ठेविलें आहे. तारीख १३ माहे मजकूर रोजीं मारलेल्या गृहस्थास मूठ माती देण्याचे वेळीं हजारों लोक त्याचें प्रेत पोंचवण्यास गेले होते. व शहरांत ह्या गोष्टीचा लोकांस अतिशय राग आल्यामुळें तिकडे तिकडे अव्यवस्था झाली होती. ती इतकी कीं, पोलिसास घोंडे मारून झोडून काढिलें. ह्या गुन्ह्याची चौकशी प्यारिस एथील हायकोर्टाकडे नेमली आहे.

ताप आला असतां पोटांत क्विनिन देण्याचा पाठ हल्लीं आहे. नूतन शोधावरून असें कळतें कीं, तें पोटांत देण्यापेक्षां शरीरांतील रक्त वाहिन्या पैकीं एकींत घातलें असतां ताप कसाही खट असला तरी तो नाहींसा होतो. हा शोध विलायतेंतील दोन तीन नामांकित वैद्यांनी लाविला. ह्या शोधाची तपासणी म्हणण्यासारखी अजून पक्केपणी झाली नाहीं. रक्तवाहिनींत हें औषध घालण्यापूर्वीं क्विनिन गंधकाचे प्रवाही खारांत मिश्र करावें लागतें, व असें केलें असतां पोटांत घेण्यास जर एक ड्राम क्विनिन लागत असलें तर रक्तवाहिनीत तितकें न लागतां पांच ग्रेन क्विनिन बस होईल.

आपल्या संस्थानांतील बंदरांत व शहरीं तारायंत्राचीं आफिसें सुरू व्हावीं अशी जुनागडचे नबाब, नवानगरचे जाम व काटेवाडांतील इतर मांडलिक राजे यांची फार इच्छा आहे.

प्रांताच्या सरकारांनीं आपापल्या अमलाखालचे प्रदेशांतून पोलीस खात्याचा बारीकसारीक खर्च कमी करावा म्हणून हिंदुस्थान सरकारानें ठरावेलें आहे. ह्या ठरावावरून बंगालचे ले० गवरनरानें आपले इलाख्यांत सात लक्ष रुपयांचा खर्च कमी केला, वायव्य प्रांताचे ले० गवरनरानें चार लक्ष व मद्रासचे गवरनरानें तीन लक्ष कमी केला.

मुंबई एथील हाय कोर्टांत हल्लीं सहा नेटीव बारिस्टर आहेत पैकीं चालू सालीं मि० लिमजी नौरोजी बनाजी हे विलायतेहून बारिस्टरची परीक्षा देऊन एथें आले. ह्यांस विलायतेस जाऊन सरासरी सात वर्षें झालीं असतील. ह्यांचा पाहिल्यानें सिवील सर्विस ( संदी नोकरी ) ची परीक्षा देण्याचा उद्देश होता, परंतु कांहीं कारणामुळें ती परक्षिा देण्याचा बेत राहित होऊन हल्लीं ते बारिस्टर होऊन आले आहेत.

ने. ओ.

गेल्या गुरुवारच्या मागच्या गुरुवारीं राजपुत्र एडींबरोचे ड्यूक यांच्या सत्कारार्थ तजवीजी व योजना यांचा विचार करण्याकरितां नेमलेल्या कामिठीची सभा आन. मंगळदास नथूभाई यांच्या बंगल्यांत भरली होती राजपुत्र येतील त्यावेळेस सर्व लोकांनीं दिवाळी सारखी आपापल्या घरोघर रोषनाई करावी ह्मणून लोकांस सुचविण्याचें टरलें. तसेंच त्यांस एक मानपत्र व मेजवानी द्यावी असा टराव झाला याजकरितां खर्च लगिल त्यासाटीं वर्गणीनें पैसा जमवावयाचा ठरून तेथें याद होऊन पांच हजारचे आंकडे पडले.

युनिवर सिटीतील पदव्या मिळालेल्या पैकीं दोघें मि० अंबालाल साकरलाल आणि घनःशाम निलकंठ. एल. एल बी. यानीं मागील गुरुवारीं हाय कोटींत मेहेरबान वारडन साहेब व मेहेरबान मेलविल साहेब यांचें पुढें आम्हांस वकिलीच्या सनदा मिळून काम करण्यांत परवागी मिळावी ह्मणून अर्ज केला आहे. व त्यांच्या अर्ज्या ही मान्य केल्या आहेत असें बोंबे ग्याझीट वरून कळतें.

ड्युक ऑफ एडिंबर्ग यांचे बरोबर गवरनर जनरल साहेब असल्यानें जबलपूर रेलवेची लाइन तारिख ७ मार्च पर्यंत सुरु होत नाहीं. मे. सर. आर टेंपल साहेब हे फिनेन्सीयल खात्याचा हिशोब मार्च महिन्याचे अखेरीस करणार आहेत.

बंगाल येथील कौन्सल मधें मि० बी० एछ स्काच आणि मि. टि. एछ कौई यांस पुनः मेंबर नेमिलें.

गेल्या सरकारी ग्याझेटमध्यें रेजिस्ट्रेशन (नोंदणी) आकटाच्या संबंधानें असा एक नियम प्रसिद्ध झाला आहे कीं, एखाद्या सरकारी कामगारांस सरकारी कामाकरितांच नोंदलेले कागदपत्र पहावयाचे व शोधावयाचें असतील अगर त्यांच्या नकला घ्यावयाच्या असतील तर त्याजबद्दल फी घेऊं नये.

सेंट्रल इंडिया टैम्सवरून असें कळतें कीं आतांच्या तुटीच्या अडचणीमुळें मध्यप्रांतांत जागोजाग दारूगोळा वगैरे सामान ठेवण्याचे जे मोठाले कारखानें आहेत त्यांन पैकीं कितीएक कमी करण्याचें ठरलें. सागरचा कारखाना तर तावडतोब बंद व्हावयाचा आहे.

## जाहिराती.

### जाहिरनामा.

विद्यमान लेफ्टनेंट करनल जान बुश्बी साहेब बहादूर डेपुटी कमिशनर जिल्हा ऊन प्रांत पूर्व वऱ्हाड यांजकडून सर्व लोकांस कळावयाकरितां प्रसिद्ध करण्यांत येते कीं, ऊन जिल्ह्याचे मक्तेबाबीचा म्हणजे अपकारी, अफू, गांजा आणि विषयुक्त वगैरेचें लिलांव सन १२८० फसली मु० सन १८७०।७१ इसवी सालाबद्दल तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी रोज गुरुवारीं येवतमाळ येथें सदर छेशनचे छावणींत डेपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे कचेरींत होईल. लिलांवाच्या शर्तीं गुदस्त सालाप्रमाणें असून त्या लिलांवसमयीं पूर्वीं वाचून दाखविण्यांत येतील. लिलांवाची सुरवात सदहुं तारखेस दिवसा १० वाजतां होईल. यास्तव ज्या कोणास मक्ते घेणें असतील त्यांनीं त्या दिवशीं हजर रहावें कळावें तारीख १८ माहे जानेवारी सन१८७०इसवी मुक्काम येवतमाळ

परशुराम गणेश अ. रि.
शिरस्तेदार.

J. T. Bushby
Deputy Commissioner Woon.

### नोटिस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, बुलढाणे जिल्ह्याचे अपकारिचा लिलांव सन १८७०।७१ इसवी सालाबद्दल सालाबाद प्रमाणें तारीख २४ माहे फब्रुवारी सन १८७० इसवी रोजीं दहा वाजतां दिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे कचेरीत होईल. कळावें तारीख २८ माहे जानेवारी सन १८७० इसवी मुक्काम बुलढाणें.

दामोदर सदाशीव हुजूर कारकून.
मिरचिरागुदीन शिरस्तेदार.

J. ALLARDICE
Deputy Commissioner B. District.

नोटिस—अमृतराव आबाजी वकील मुक्काम अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येये कीं, हरजसजी मयत याचे जिनगीचे वहिवाटीबाबद वारसाचे सरटिफिकीट आम्हांस सरकारांतून मिळालें आहे. तें खुदावंत बुलूक साहेब बहादूर यांचें कोडतांत रामदत्त हरजसचा गुमास्ता श्रीकृष्ण यांजवर चालविला होता. त्यांत कोर्टांत दाखविण्यासाठीं पुराव्यास पाहिजे म्हणोन तुम्हीं आम्हापासून मागून नेलें आहे तें सदहू खटल्याचा निकाल झाल्यावर तुम्हास मागितलें असून दिलें नाहीं व त्यानंतरही दोनच्यार वेळ मागितलें असून दिलें नाहीं सबब ही नोटिस देण्यांत येते कीं, सदहू सरटिफिकीट आजपासून ८ दिवसांत आणून देऊन रशिद द्यावी. असें न होईल तर मुदतीनंतर रीतीप्रमाणें तजवीज करणें भाग होईल व केली जाईल कळावें तारीख ३१ जानेवारी सन १८७० इ०.

(सही) रामदत्त किसन दयाळ साहू.

### नोटिस.

सर्वांस मालूम होण्याकरितां कळविण्यांत येते कीं, राघो गंगाराम शहामृग रहाणार अकोलें हा आमचा गुमास्ता संवत १९२६ चे मार्गशिर्ष शुद्ध ९ पासून श्रावण शुद्ध ४ पावेतों होता, पुढें त्याणें नौकरी सोडली आहे, यास्तव सदहू मितीचे पुढें त्याणीं कोणापासून आमचे दुकानचे नावावर किंवा दुकान संबंधी ह्याने पैसा घेतला असेल तर तो आम्हांस मान्य नाहीं व लागू नाहीं कळावें तारीख ३१ जानेवारी सन १८७० इसवी.

(सही) रामदत्त किसनदयाळ साहू.

नोटिस—राघो गंगाराम शहामृग वस्ती अकोलें यास रामदत्त किसनदयाळ साहू दुकान अकोलें यांजकडून देण्यांत येतें कीं, तुम्हीं आमचे दुकानी संवत१९२६ चे मार्गशिर्ष शुद्ध ९ रोजीं नोकरीस राहून संवत मजकूरचे श्रावण शुद्ध ४ रोजीं नोकरी सोडल्याबाबद आम्हास गुमास्ते याजबरोबर सांगून पाठऊन तुम्हास दिलेलें मुखत्यारपत्रही तुम्ही त्याजबरोबर परत पाठविलें नंतर त्याच साल्चे श्रावण वद्य ९ रोजीं पुनः एक पत्र अकोल्याहून आम्हांस शेगावीं लिहिलें कीं, तुम्हावर (आम्हावर) उमरावतीकर बजाज यार्णीं फिर्याद केल्याचें समन् आलें सबब समन्सावर सही करण्यासाठीं व सरकारांत दाखविण्याचे कामाकरतां मुख्त्यारपत्र दुकानातून घेतलें आहे म्हणून पत्र लिहिलेंत आणि त्या दिवसापासून ही नोकरिवर नसून घेतलेंले मुखत्यारपत्र पुनः परत नदेतां तुम्ही आपले जवळ ठेऊन घेतलें दरम्यान पुष्कळ वेळ तुम्हांस मुकत्यारपत्र परत मागितलें असून दिलें नाहीं करितां तुह्मांस ही नोटिस देण्यांत येते कीं, तुम्ही प्रथम संवत १९२६ श्रावण शुद्ध ४ रोजीं नोकरी सोडली त्या दिवसा पासून आमचे नोकर नसून नंतर ही समन्सवर सही कर्ण्यासाठि मुकत्यार पत्र आमचे सांगितल्याशिवाय घेण्याचें कारण नसून आमचे दुसरे नवीन आलेले गुमास्त्यापसून घेतलें आहे तरी तें मुकत्यारपत्र आजपासून ८ दिवसांत परत द्यावें परत नदेतां जवळ ठेवण्याचा तुमचा हेतू लबाडीचा व आम्हास कांहीं नुकसानीं करण्याचा आहे असें दिसतें पण तुम्हांस आतां असें साफ कळविण्यांत येतें कीं संवत १९२६ चे श्रावण शुद्ध ४ पासून तुम्ही आमचे नोकर नाहीं व तुमचें मुकत्यार पत्रही सदहू मित्तीपासून कायम नाहीं करितां सदहू मितिपासून तुम्हांस आमचे दुकानचे कोणतेंच काम करण्याचा अधिकार राहिला नाहीं जर आम्हास नकळतां किंवा न कळवितां काम केलें असलें तर तें आम्हांस मान्य व लागू नाहीं त्याची जबाबदारि तुम्हांवराच राहील हें कळावयास लिहिलें आहे तारीख ३१ जानेवारी सन १८७०

(सही) रामदत्त किसनदयाळ साहू.

नोटिस—दावल कुंभार राहणार चानी तालुके बाळापूर यांस देण्यांत येते कीं, तुम्हाकडे खातेबाकी एकुणतीस रुपये बारा आणे शिवाय व्याज येणें आहे याचा उलगडा नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांचे आंत करावा न केल्यास दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करून घेऊं. कळावें तारीख २३ जानेवारी सन १८७०

(सही) परमसुख नथमल मारवाडी दुकान देऊळगांव साकरशा.

नोटिस—संभाजी पुनाड मुकाम स्वस्ती तालुकें बाळापूर यांस नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हांकडे पंचवीस२५ रुपये व शिवाय व्याज येण आहे त्यांचा उलगडा नोटिस पोंचल्या पासून आठ दिवसांचे आंत करावा नाहीं पेक्षां दिवाणी कोर्टां मार्फत नोटिसीचे वगैरे खर्चा सुद्धां वसूल करून घेण्यांत येईल कळावें तारिख २३ जानेवारी सन १८७० इसवी.

(सही) परमसुख नथमल मारवाडी
दुकान देऊळगाव साकरशा.

नोटिस—रतनसा वल्लद नारायणसा लाड मुकाम चानी तालुके बाळापुर यांस नोटिस देण्यांत येते कीं, तुम्हाकडे हुई ओळीं २ दोन व खाते बाकी तेवीस रुपये दोन आणे सहापै २३८२८६ व शिवाय व्याज येणे आहे त्याचा उलगडा ही नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत करावा नाहीपेक्षां दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करून घेण्यांत येईल कळावें तारीख २३ जानुएरी १८७० इसवी.

(सही) परमसुख नथमल मारवाडी दुकान देऊळगाव साकरशा.

नोटिस—बाबणलाल रामलाल साहू दुकान अकोलें यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्हांकडून आमचे नोटिसीचें उतर व पत्राचें उतर वर्तमानपत्रातुन लिहून व पत्रानें आलेली पावली वर्तमान पत्रांत व पत्रांत जिजी सबब अपण लिहितां ती ती आपलें व्यवहारास व आपले सरकत नाम्यांतील ठरावास व त्याच ठरावावरून आपणावर जी जी जबाबदारी आहे व ज्या जबाबदारीस आपण पात्र आहांत त्याचा विचार न करितां व तीकडे लक्ष न देतां व सरकत नाम्यांतील ठरावाची स्मृती न बाळगीतां दिल्ही आहेत एकंदरीत तुम्हीं जे जबाब दिल्हे आहेत त्याजवरून सरकत नाम्यांतील शर्ती प्रमाणें तुम्ही जबाब दारीस पात्र आहा त्या जबाबदारी प्रमाणें तुमचे जे कर्तव्य कर्म त्याप्रमाणें तुम्हांकडून घडल्याचें किंवा पुढें ही आमचे लिहिल्यावर घडविण्याची तुमची सिद्धता आहे असें बिलकुल होत नसोन दुसरे भागीदारांवर आलयावरील जबाबदारी सोडविण्याचा हेतू मात्र प्रदर्शित केलात करारनामा सरकती बाबद जो तुमचे व आमचे दरम्यान आहे व त्यांत ज्या शर्तीं ठरवील्या आहेत त्यावरून दुसऱ्यास आम्ही विचारण्याचें आम्हांस कांहीं कारण नाहीं तुम्हीं केले कामाची जबाबदारी तुमचेवर असोन त्याचा जबाब आम्हांस तुम्हीं दिल्हा पाहिजे. तुमचे पोटांतील भागीदारांत आणि तुम्हांत वितुष्ट किंवा हिशेबाचा गोंधळ किंवा अपूर्तता असेल तर त्याविशाई आम्हांस करार नाम्यांतील ठरावाप्रमाणें तुम्हांशिवाय दुसरे भागीदार जबाबदार नाहींत तुमच्या भागीदारीतील व तुमच्या तंटयांतील किंवा हरयेक गोष्टीची सफाई करणे हें तुमचें काम आहे. आम्हांस तुम्ही करार नाम्यांतील ठरावा प्रमाणें हिशेब व शिलकी पैसा दिल्हा पाहिजे तसें तुम्हांकडुन घडण्या साठीं आम्हीं तुम्हांस नोटिस दिल्ही व पत्रें ही लिहिलीं पण तुम्हीं करार नाम्यांतील ठरावाची स्मृती न राहातां त्या विरुद्ध उडवा उडवीचे पोकळ जबाब देत आहां याजवरून तुमचा हेतु करारनाम्यांतील शर्तीं प्रमाणें जबाबदारीची सफाई करण्याची हे मात्र उघड जाहले आहे. आम्हांस दुसऱ्याचा मिलाफ करून आणि तुमच्यासी विरुद्ध करून करार नाम्यांतील शर्ती बाहेर किंवा तुमचे हातून जाहले व्यापाराची योग्य व्यवस्था व शिलक नगदीची घेणें व मिळणें आहे त्यांतुन ज्याजती घेणें किंवा मागणें नाही मग दुसऱ्याशीं मिलाफ करण्यांत व तुमच्यासीं विरुद्ध करण्यांत आम्हांस कोणता फायदा आहे याचा नर तुम्ही सुज्ञ पणे विच्यार कराल तर त्याचा तुम्हास बोध होईल. आम्हांस तुम्हांशिवाय दुसऱ्याजवळ हिशेब किंवा पैसा मागण्यास करारनाम्यांवरून मार्ग नाही सबब आम्हीं दुसऱ्यास ह्या बिशाई बिचारणार नाही आजवर तुमचे आमचे झाले जाब जबाबाचे प्रत्येकवेळीं जाहले व व्यापारापासून होणार सुखा विरुद्ध अंत: कर्णास फारच फार त्रास व फार खेद मात्र जाहले आहेत आतां हें जें पत्र तुम्हांस लिहिलें आहे याहुन ज्याजती लिहिण्यास किंवा बोलण्यास आम्हीं इछीत नसोन इतकेंच इछीतों कीं आजवर दिल्हे सुचने शिवाय व दिल्हेले मुदती शिवाय आतां हि शेवटची सुचना व (४) दिवसाची मुदत देऊन कळवितों कीं ह्या मुदतींत तुम्हीं करारनाम्यांचे शर्तीं प्रमाणें हिशेब व पैसा समजून द्यावें न द्याल तर रिती प्रमाणे तजवीज केली जाईल काळावें तारीख २४ जानेवारी सन १८७० इसवी.

(सही) बमनजी उकडजी.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छापून प्र० के०

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. V, AKOLA:—SATURDAY EVENING, FEBRUARY 12, 1870 NO. 7

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १२ माहे फेब्रुएरी सन १८७० इ० अंक ७



## पाहिजेत.

हुशार दोने मराठी कंपाझिटर पाहिजेत. ते इंग्लिशचे माहितगार असल्यास फार उत्तम. योग्यता पाहून पगार १९ पासून २९ पर्यंत मिळेल.

**मालक, व० स०**


## वऱ्हाडांतील मुलींच्या शाळा.

वाशिमास शाळांच्या परिक्षा होऊन बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला त्या प्रसंगीं एक मुसलमान गृहस्थ उभे राहून म्हणाले कीं एथें एका मुसलमान जातीच्या वृद्ध स्त्रीनें स्वतांच्या खटपटीनें व खर्चानें एक मुलींची शाळा आज सहा महिने चालविली आहे ती सरकारानें आपले खात्यांत घेऊन त्या बाईस तिजवर पगारी मास्तर नेमावें. त्या वेळीं मे० डा० सिंक्लर साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर यांनीं सरकारचा एक नवीन ठराव झालेला सर्वांस सांगितला तो असा कीं, या पुढें मुलींच्या शाळा केवळ सरकारी म्हणून चालविल्या जाणार नाहींत. मुलींच्या शाळा या लोकांच्या आहेत. त्या त्यांच्या त्यांनीं स्थापून चालविल्या पाहिजेत. व त्यांनीं सरकारास मदत मागितली तर ते जितका पगार देत असतील तितकाच सरकार पगार देईल. याहून अधिक सहाय मुलींच्या शाळास मिळणार नाहीं.

मुलींच्या शाळांचे कामीं मुंबई इलाख्यापेक्षां आमचे वऱ्हाड प्रांतांत अधिक त्वरा झाली होती व सरकारानें उदार बुद्धीनें जें सहाय देण्याचा पूर्वसंकल्प केला होता तो आणखी कांहीं वर्षें चालविला असता तर त्याचें फल फार चांगलें झालें असतें. लोकांच्या मनांत स्त्रियांस विद्या असावी या विच्याराचें केवळ दिक्प्रदर्शन होतं चाललें आहे व नुकतेंच कोठें लोक आपल्या मुली शाळेंत पाठवूं लागले आहेत इतक्यांत सरकारानें आपला हात आखडला हें चांगलें केलें नाहीं. पेरलेल्या बिजास मोड येत आहे तोंच खुडावा, किंवा पोहरा विहिरींत आहे तोंच दोर कापावा त्यासारखा हा कांहींसा प्रकार झाला. या पेक्षां मुलींच्या शाळांस आरंभींच सरकारानें सहाय दिलें नसतें तर लोकांस इतकें वाईट वाटलें नसतें. आणि ज्यापेक्षां सरकारानें आज दोन वर्षें मुलींच्या शाळा आपल्या म्हणून चालविल्या त्यापेक्षां आणखी थोडीं वर्षें तशाच सहाय्यानें त्या चालवून व कांहीं स्त्रिया सुशिक्षित करवून त्यांस मुलींच्या शाळांवर मास्तर नेमून तें उदाहरण लोकांचे डोळ्यांपुढें ठेविलें असतें तर केल्या कामाचें चीज झालें असतें. पण वरिष्ठ सरकारानें तसें कां केलें नाहीं याचें कारण त्याचें त्यांस ठाऊक.

हल्लीं वऱ्हाडांत मुलींच्या शाळा पंचवीस आहेत त्या सर्वांचे पगार एप्रिल महिन्यापासून गांवकऱ्यांनीं निमे दिले तर सरकार निमे देणार; नाहींपेक्षां त्या शाळा बंद होतील. आम्हांस असें समजलें आहे कीं तीन च्यार ठिकाणच्या गांवकऱ्यांनीं मुलींच्या शाळांचे निमे पगार देण्याचें कबूल करून शाळा पतकरिल्या आहेत याकरितां त्यांची स्तुती केली पाहिजे व इतर ठिकाणच्या लोकांनीं त्यांचें उदाहरण घेऊन आपले गांवच्या मुलींच्या शाळा राखिल्या पाहिजेत. भाडयाचे घरांतून मालकानें निघा म्हटलें कीं निघावें लागतें. त्यावर खासगत घराप्रमाणें जशी आपली सत्ता नाहीं तशीच ही गोष्ट आहे व भाडयाच्या घराच्या अडचणीस त्रासून मनुष्य ईर्षेनें जसें आपलें स्वतांचें घर बांधतें तसें लोक आपले सर्व स्वतांचेच खर्चानें स्त्रीशिक्षणें चालवितील तर फार चांगलें. परंतु लोकांस तशी दृष्टी अजून आली नाहीं व तशीं साधनेंही नाहींत हें पाहून धर्मपरायण बुद्धीनें सरकार अर्धें भाडें माफ केल्याप्रमाणें निमा पगार देण्याची मदत करित आहे एवढेंच त्यांचे उपकार समजून लोकांनीं उदास न होतां चालू असलेल्या मुलींच्या शाळांपैकीं एकही शाळा बुडणार नाहीं अशी तजवीज अवश्य करावी व त्यांस त्या त्या ठिकाणच्या मुनसिपल कमिटींनीं मदत करावी अशी आमची शिफारस आहे.

## डागिण्यापासून नाश.

ईश्वरानें जो प्राणी उत्पन्न केला आहे त्याचे अंगीं बरें वाईट, हे गुण असावयाचेच, ज्या प्राण्यास सदसद्विचारानें चालून दुसऱ्याच्या बऱ्यावाइटाकडे लक्ष्य देऊन या जगांत वागावें कसें हें कळतें त्याचे हातून वाईट गोष्ट कधींही घडावयाची नाहीं. प्राणिमात्रास धनलोभ हा आहेच. कोणास द्रव्याचा लोभ नाहीं असा मनुष्य सांपडणें विरळाच. तरी जो चांगला शाहणा वज्याचे अंगीं आत्मसंयमन करण्याची शक्ती आहे तो कसाही प्रसंग आला तरी आपलें बरें करण्याचे इरादानें वाईट व अनीतीची गोष्ट कधीं करावयाचा नाहीं. जे अविचारी लोक आहेत ते आपले सुखाकरितां व धनलोभाकरितां काय करतील याचा भरंवसा नाहीं. ते एक पैशाकरितां किंवा आपला मतलब साधण्याकरितां अघोर कृत्यें केल्याशिवाय ही कधींकधीं रहात नाहींत व दुसऱ्यास आपली साकी दाखवून त्याच्याशीं निकटसंबंध ठेवून, केव्हां आपला दुष्ट बेत सिध्धीस नेतील याचा नेम नाहीं. आतां आज हा विषय हातीं घेण्याचें कारण इतकेंच कीं आपले लोक आपल्या मुलांस शोभवण्याकरितां त्याचे अंगावर अलंकार भूषणादिक घालून त्यांतच आनंद मानितात. त्यांस इतकें पक्कें ठाऊक असतें कीं लहान मूल हें अज्ञान आहे त्यास आपली वस्तू कशी जतन करावी हें माहित नाहीं व अशानें पुष्कळ लहान मुलें प्राणास मुकतात तरी मूल गोजिरवाणें दिसण्याकरितां हे विच्यार एकीकडे ठेवून आपल्या मुलाचे आपणच वैरी होऊन त्यास दुसऱ्याकडून मारावितात असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. मुलांचे अंगावर दागिने घालण्यापासून दोन तोटे आहेत; एक त्यांचा नाश व दुसरा आपण परिश्रम करून मिळविलेलें द्रव्य एक घटकेंत दुसऱ्याचे स्वाधीन करवितो व त्याचा उपयोगही सदसद्विच्याराकडे होत नाहीं. मनुष्याचे जिवापेक्षां वस्तू जरी फार मौल्यवान नाहीं तरी ती मिळविण्यास जितका वेळ खर्च केला आहे तितक्या अमोलिक वेळेचा जर विच्यार केला तर दोन्हीही गोष्टी अमोल्य आहेत तितक्यांतही प्रीतीचे ओघापेक्षां धन लोभ हा ज्यास्त वाटत नाहीं इतकेंच काय तें आहे तरी आपली वस्तू आपण समजून उमजून लहान बालकांचे अंगावर घालून आपण दोन्ही अमोलिक वस्तु गमावणें हें आपले वेडेपण नाहीं कां? समजणें हें जरी सोपें आहे तरी उमजून त्याप्रमाणे वर्तणूक होणें हें एक शहाणपणापैकींच आहे. जगांत असेही प्राणी आहेत कीं बाहेर मोठमोठ्या डामडौलाच्या गोष्टी सांगून आपली वर्तणूक सुधारीत नाहींत, सर्व वाईट कामांत आपण पुढारी होतात आणि कोणी एखादे वेळीं त्यांस चांगली समजुतीची गोष्ट सागण्यांस गेलें तर तेथें ते मानभाविकपणा इतका दाखवितात कीं जणु काय आपण सर्व समजलों आणि त्याप्रमाणें खचितच वागणार, परंतु त्यांचे जवळून अमळ दूर गेलें कीं "उपडया घडयावर पाणी" याह्मणी प्रमाणें त्यांच जे गुण आहेत ते ते सोडित नाहींत याजवरून असें स्पष्ट दिसतें कीं ते आपल्या विच्यारशक्तीचा उपयोग न करितां आपलें आयुष्य पशुवत घालवितात व अशा मनुष्यांवर विश्वास ठेवणें व त्यांस सलगीनें आपले घरांशी ठेवून घेणें हें अगदीं वाईट आहे. त्यांच्याशीं जों जों सलगी करावी तों तों आपले गुण बाहेर काढून कधींना कधीं तरी ते आपले दुष्ट बेत सिद्धीस नेण्यास मागें पुढें पाहणार नाहींत अशाबद्दल एक ताजें उदाहरण अति भयंकर झालेलें वाचकांपुढें ठेवितों. एवढ्यावरून आमचे वाचकांची खात्री होऊन असल्या दुष्ट व अविच्यारी पुरुषापासून वेळेनुसार काय काय गोष्टी घडून येतात तें सहज लक्षांत येईल.

मुंबईमध्यें मागील गुरुवारीं पोलिसचा शिपाई रात्रीं गस्त फिरत असतां भेंडीबाजारचे जवळ हुजगमुला याचे घराचे पुढले बाजूस एक मुसलमानाची फातमा नांवाची मुलगी सुमारें दीड वर्षाची हिची कोणी मान कापून टाकून दिलेली त्याचे दृष्टीस पडली. तेव्हां त्यानें चौकशीस आरंभ केला त्या चवकशीमध्यें असें कळलें कीं, रात्रीं ७ वाजतां कासम टिकम मुलीचा बाप हा आपले घरोच बाहेरचे बाजूस मुलीस मांडीवर घेऊन बसला असतां त्याचा शेजारी भांडयांस कलहीं करणारा इब्राहिम मिरा काशी हाही आपले घरांत होता व त्या वेळेस दुरून एका वोहाऱ्याचें लग्न मोठे ढाम ढोलानें वाजत येत होतें म्हणून इब्राहीम हा त्या मुलीस बापाजवळून घेऊन ती गम्मत पाहण्यास गेला तो तीस रात्रीचे ९ वाजे तों पर्यंत परत घेऊन न आल्यानें मुलीचे बापास तिला पाहण्याची फारच उत्सुकता उत्पन्न झाली. म्हणून तो व तिची बहीण हीं त्यास पहावयास गेलीं. परंतु दोघांपैकीं एकासही मुलीचा किंवा त्या गृहस्थाचा पत्ता लागला नाहीं. कांहीं वेळानें तिचे बापास असें कळलें कीं एका लहान बालकाची मान कापून मुडदा पडलेला आहे तेव्हां तो त्या ठिकाणीं गेला आणि पहातो तों आपलीच दुर्दैवी मुलगी मान कापली जाऊन पडलेली आहे. तेव्हां इब्राहीम त्या मुलीस लग्नाची गम्मत दाखवावयास घेऊन गेला होता तेव्हां तिच्या दोन्ही कानांत दोन सोन्याच्या बाळया होत्या व गळ्यांत रुप्याची सरी आणि एक रुप्याची साखळी होती व हातांत रुप्याच्या बांगडया होत्या. जेव्हां त्यानें तो मुडदा पाहिला तेव्हां गळ्यांतील सरी व हातांतील बांगडया मात्र चोरीस गेलेल्या दृष्टीस पडल्या याजवरून अशी कल्पना करितां येते कीं एवढा हा भयंकर खून जो झाला तो त्यानें या क्षुल्लक वस्तूचा अपहार करण्याचे इरादानें केला असावा. इब्राहीम अद्याप पर्यंत सांपडला नाहीं व त्यास जो शोधून देईल त्यास दोनशें रुपये बक्षीस देण्याचें कबूल केलें आहे. पुढें कारोनर (अपमृत्यूची चवकशी करणार कामदार) यांजकडे चौकशी सुरू झाली तिजमध्यें तिचे बापानें असें लिहून दिलें कीं ही जी मेलेली मुलगी ही माझीच आहे. हिची आई हिचा जन्म झाल्यापासून तिसरे दिवशीं मृत्यू पावली. तिचें संगोपन माझी बहिण करीत होती माझेजवळ माझा एक भाऊ हे दरखान आणि माझा पुतण्या असे आह्मी एके ठिकाणीं राहतों. ज्या मनुष्यानें माझे मुलीस मौज पाहण्याकरितां नेली तो माझे घरा शेजारीं राहतो आणि मी यास लहानपणापासून ओळखतों ह्याचा व आमचा चांगले रीतीचा घरोबा आहे. हा दररोज माझे घरीं येऊन माझे मुलीसही मोठे ममतेनें घेत होता. ह्याचा व आमचा कधींही तंटा बखेडा झालेला नाहीं. जेव्हां माझे जवळून यानें मुलगी नेली तेव्हांवरें सांगितलेल्या वस्तू तिचे अंगावर होत्या, त्यां पैकीं दोन वस्तू एक गळ्यांतील सरी आणि हातांतील २ रुप्याच्या बांगडया मात्र नाहींत असें त्यानें लिहून दिलें.

दुसरा बशरत अली ज्याचे घराजवळ ह्या मुलीचा मुडदा पडलेला होता तो असें सागतो कीं मी आपल्या घरांत दोन च्यार सोबत्यासह निजलों असतांनां मी बाहेर लघ्वी करावयास म्हणून आलों तों काळोखी रात्रीमुळें व तेथें दिवा वगैरे कांहीं नसल्या कारणानें मी जातांनां तो मुडदा माझे पायामध्यें अडकला तेव्हां काय अडकलें आहे तें पाहाण्यास आपले घरांतील मनुष्यांस मीं

चा आणावयास सांगितलें तेव्हां मी तेथें मुद्दा पडलेला पाहिला तेव्हां सर्व हकीगत मी पोलिस शिपाई तेथें जवळच होता त्यास सांगितली तेव्हा असा कयास निघाला कीं हा खून त्या दुष्ट मनुष्यानें आपला मनोरथ सिद्धीस नेण्याकरितां केला असावा. आतां इतकेंच सर्व लोकांस सुचविणें आहे कीं त्यांनीं आपले मुलाचे अंगावर दागिने घालण्याचें बंद करून त्यांस सुखी ठेवावे येवढें मागणें आहे.

The buildings of the Educational Department have immensely ornamented the province. School buildings are rising at several places. They are not tiny things like the huts of miserable people; but have each of them cost the Government from 16000 to 20000 Rupees. The magnifiaent school building at Akola for the middle class school has been gratifying the eyes of the spectators, and another equally splendid is raised at Khamgaum, a third at Julgaum is in progress, and similar school houses for Anglo Vernacular schools will shortly be commenced. The High schools at Akola and Oomerawuttee have also been provided with decent buildings. Ample provision has been made for all scoools but it pains us to see the Director of Public Instruction, the head of the whole department, has no decent office rooms. We believe that the Director's office should have been located in a much better house than the present miserable and hired hut. The Commissioner's office, the Deputy Commissioner's, the executive Engineer's, the Police Superintendent's, the Post Office and all public offices are provided with hand-some buildings. Even the Library, the Market place, the Charitable Dispensary, and all public serais have largely decorated the town. It is therefore high ly derogatory to the Educational Department that its head office should have been lodged in a hired hut. The Inspector General of Education in the Central Provinces has a nice building for his office, and we might ask why the head of the Educational Department in the Berars is not provided with a commodious and well furnished building.

We have seen many different dates very positively set down for the opening of the Jubbulpore extension of the G. I. P. Railway, but in reality the matter has only just been decided. The Viceroy and the Countess of Mayo, attended by Major Burne, the Hon'ble Major Bourke, and Captain Lockwood, will leave Calcutta on the 23rd February and reach Jubbulpore on the 25th. They will start on the same day for Nagpore. On the 3rd March His Excellency will open the Khamgaon State Railway, and then proceed, attended by Major Burne, to visit the Hingunghat cotton district and the Chanda coal-fields, returning to Jubbulpore, where he will be met by the Duke of Edinburgh, on the 7th. The G. I. P. Railway will probably be opened on the same day. The Viceroy will then return to Calcutta, and His Royal Highness the Duke of Edinourgh proceed on his journey to Bombay. The Countess of Mayo, accompanied by Major Bourke, will have proceeded direct from Nagpore to Bombay, in order to leave by the steamer of the 5th March.

*Pioneer.*

It is reported from Akola that Mr. Saunders, the Resident at Hyderabad, is expected at that station on 15th instant to prepare for the reception of the Viceroy, who is to open the first State Rrilway on the 3rd March, as we stated in a former issue. The Municipality of Khamgaon are determined that, so far as they can prevent it, the ceremonial shall not be devoid of *eclat*. They have voted the sum of Rs. 3,000 for the purpose. The station is to be illuminated, and Lord Mayo is promised a blue-bull hunt, if he cares for the sport; but His Excellency is warned that the spears he used wiih such good effect at Tumlook will not be for the Nilghai.—*Bombay Gazette.*

The Resident at Hyderabad, in a letter dated 15th December 1869, reported to the Government of India certain arrangements which have been made by the Government of the Nizam for the better government of His Highness' territories, and forwarded a copy of a Gazette which had been lately established, together with a translation of the more important portions. The Governor General in Council has expressed cordial approval of the arrangements reported, and desired that an expression of the satisfaction of the Government of India might be communicated to Sir Salar Jung and the Ameer i-Kubeer. The translations sent have been published in the "Gazette of India.'

## वऱ्हाड.

गेल्या आठवड्यांत वाशिमच्या बातम्या लिहिल्या त्यांत रा. रा. रामसेवक साहेब यांस सेकंड क्लास सबार्डिनेट माजिस्त्रेटचा अधिकार असल्याचें लिहिलें ती चूक आहे. त्यांस फष्ट क्लासचा आधिकार असून फुलपावराविषयीं शिफारस झालेली आहे. व ती योग्य आहे. त्यांचे हुशारीविषयीं अशी एक गोष्ट आम्हांस कळली आहे कीं यांनीं इतक्या प्रौढ वयांत आलिकडे एक वर्ष रात्रीं व सकाळीं थोडा वेळ मिळतो तितक्या अवकाशांत खासगी शिक्षक ठेवून इंग्लिश अभ्यास चालविला आहे व ते हल्लीं आपले वरिष्ठाशीं वगैरे सरकारी कित्येक कामांत इंग्लिश लिपींत स्वतः मजकूर जुळून पत्रव्यवहार ठेवित असतात. हा त्यांचा उद्योग व बुद्धिप्रभाव वर्णन करण्या योग्य आहे. यांस पराशियन व आरबी या भाषाही चांगल्या येतात. मागें ज्या वेळीं वऱ्हाड प्रांतांत उडदु भाषेत सरकारी काम काज चालत होतें तेव्हां हे शिरस्तेदार होते. व पुढें मराठी दप्तर झालें त्या वेळेस मराठी भाषाही नव्यानें शिकले. व हल्लीं इंग्लिश विद्येचें प्राबल्य पाहून तिचे संपादनार्थ ते झटत आहेत. ही गोष्ट इतर अधिकाऱ्यांनीं मनावर घेण्याजोगी आहे.

वाशिमास पाचवे तारखेस कमिशनर साहेब सेशनाकरितां जाणार होते ते तिसरेच तारखेस गेले व चवथे आणि पाचवे तारखेस सेशनाचें काम करून सायंकाळचे निघून सहावे तारखेस अकोल्यास आले. पोलिसपैकीं गणू कन्स्टेबल यानें बाळमुकुंद नियालाल जहागिरदार यास व याचे भावास व मुलास वगैरे ठार मारण्याचे इराद्यानें तरवारीचे वार केले होते त्याची सेशनांत चौकशी होऊन गणूस सक्त मजुरीनिशीं पंधरा वर्षें काळे पाण्यावर कैदेंत राहण्याची शिक्षा झाली.

डा० सिंक्लेर साहेब विद्याखात्याचे डायरेक्टर यांची स्वारी वाशिमास गेली होती. आठ मुक्काम तेथें झाले. सर्व शाळांच्या परिक्षा झाल्या. व बक्षिसें वाटण्याचा समारंभ पाचवे तारखेस सकाळीं अमराईंत दरबार तंबूमध्यें झाला. मुख्यस्थानीं मे० लायल साहेब कमिशनर हे होते. डिपुटी कमिशनर क्या० मेकंजी साहेब व इंजिनियर मि० रीड साहेब व कित्येक प्रतिष्ठित नेटिव लोक त्या समारंभास होते. हिंदुस्थानी शाळेचा व मुलींच्या शाळेचा अभ्यास चांगला दिसून आला व त्याबद्दल त्यांवरील मास्तरांची तारिफ झाली. नंतर बक्षिसें वाटलीं व रेसिडेंट साहेबांच्या मडमसाहेबांचे चांदीचें पदक एका मुलीस बक्षिस दिलें. ही मुलगी ब्राम्हण जातीची ११ वर्षांची बालविधवा असून फार गरिब आहे. तिचे वडील तिला आणखी कांहीं वर्षे शाळेंत ठेवून चांगलें विद्यादान देतील तर तिचा उत्कर्ष होईल. तेथील मुलींच्या शाळेवर मास्तर ६० वर्षांचे वयाचा एक संभावित पुराणिक आहे. व त्याचे घरांतच शाळा ठेविली आहे त्यामुळें मोठाल्या वयाच्या स्त्रियांस ही तेथें विद्या शिकण्यास कांहीं गैरसोय, संकोच अगर लौकिकभीति वाटत नाहीं. व कित्येक वयस्कर स्त्रिया तेथें अभ्यासही करिताहेत असें समजतें. वाशिमच्या कित्येक संभावित नेटिव लोकांनीं मुलींस साड्या वगैरे बक्षिस दिल्या.— तेथील डिपुटी इजु० इन्स्पेक्टर यांनीं जेथें मुलींच्या शाळा नाहींत तेथें मुलांच्या शाळेंत मुलींचा वेगळा वर्ग ठेवाविण्याची कित्येक शाळांतून तजविज केली आहे व तशाप्रकारें साठ पाउणशें मुलींचा विद्याभ्यास चालत आहे. लहान लहान मुलींकरितां स्वतंत्र शाळांच्या अभावीं हीही तजवीज स्तुत्य आहे.

उमरावतीहून रा॰ रा. बापुजी रंगनाथ एक० असि० कमि० आपलें कार्ट कारंजास सुरू करण्या करितां ६ वे तारखेस तिकडे गेले. हे गृहस्थ उत्तम स्वभावाचे असल्या मुळें उमरावती करांस यांच्या वियोगाचें फार दुःख झालें आहे.

चांदूरचे तहशीलदार कचेरींतून एक मिसल गाहाळ जाहाली ती जाणून बुजून तेथील तहशील अमल्यांतील लोकांनीं नाहीशी केली असा वहिम डिपोटी कमिशनर उमरावती ह्यांस आला या वरून तीन कारकून बडतर्फ केले व तेथील नायब तहशीलदार यांस पगार कमी करून२५ रुपयांवर याच तालुक्यांत शहानवीस नेमिलें. नशिबानें तहशीलदार यांस कोणत्याही प्रकारें भोंवलें नाहीं.

खामगावास मुलींच्या शाळेचा एक वर्षाचा निमा पगार गावकऱ्यांनीं द्यावयाकरितां वर्गणीनें पैसा जमविला. त्यांची यादी कमिशनर साहेबांकडून आल्यावरून रकमा समजल्या त्या—

| | रु० |
|---|---|
| शेट. केशवराम रामजस | ५० |
| शेट. शामलाल ओंकारदास | २५ |
| मि० बरजोरजी शेट | २५ |
| शेट जयनारायण बक्तावरमल | १५ |
| रा० जानराव देशमुख | १० |
| मि० लाल खान | १० |
| रा० एकनाथ मोरेश्वर क्लार्क. | ७ |
| " बाळाजी नारायण वकील. | ६ |
| " गंगाधर बाळकृष्ण वकील | ६ |
| मि. एदलजी जमशेटजी मास्तर | ५ |
| रा. वामन लक्ष्मण वकील | ५ |
| " केशव घन:शाम वकील | ३ |
| " नारायण रघुनाथ वकील | २ |
| " विठ्ठल वामन वकील | २ |
| " केशव सिताराम वकील | २ |
| " शंकर रामचंद्र. | १ |
| | १७४ |

इलिचपूर—कर्नल स्टब्स साहेब विलायतेहून परत येत नाहींत असें समजतें.

खामगावास समारंभाचे दिवशीं चिरागदान व दारूकाम वगैरे होणार आहे. मुनसिपल कमिटीनें या समारंभाप्रित्यर्थ३००० रुपये देण्याचें ठरविलें आहे.

### टपालवाल्यांची सुस्ती.

खालीं लिहिल्या तीन ठिकाणांहून आम्हाकडे या आठवड्यांत टपाल खात्याचे बोभाट आले आहेत. त्यांकडे या खात्याचे मुख्यानीं अवश्य लक्ष द्यावें.

१ देऊळगांव माळी तालुके मेहकर येथून—"वर्तमान पत्रें दर आठवड्यास आम्हांस मिळत नाहींत. येकदम दोन अथवा तीन अशीं येतात."

२. आकोली तालुके अकोट येथून— "वर्तमानपत्रें दोनदोन तीनतीन येकदम येतात आठवड्यास पोंचत नाहींत.

३. बरुड ता० मोर्शी जिल्हा उमरावती येथून—"वर्तमानपत्रें आम्हांस बरोबर पोंचत नाहींत. गुदस्त महिन्यां तील दोन पत्रें आलीं आहेत व बाकीचीं तीन अजून यावयाचीं आहेत."

आम्ही खात्रीनें सांगतों कीं आमचें पत्र शनिवार सायंकाळचें आहे तें रविवारी दोन प्रहरचे आंत टप्यांत जाऊन पडतें त्याहून अधिक काळ बहुशा आम्हाकडे राहत नाहीं याजकरितां ज्या ज्या लोकांस अशीं दोन तीन आठवड्यांचीं पत्रें येकदम पोचत असतील त्यांनीं त्याविषयीं आम्हाकडे लिहावें म्हणजे त्यांचा गिल्हा पुढें नेऊ.

## अकोला.

उमरावतीस पेपर करेन्सीचें म्हणजे नोटींच्या खरेदी विक्रीचें आफिस ठेवण्याचा विचार आहे व त्याचा अजमास पाहण्याकरितां तूर्त त्याविषयींची माहिती व नोटी घेऊन जाण्याकरितां रा. रा. आत्माराम भिकाजी एक. असि. कमि. दोन तीन दिवस अकोल्यांस आले होते व ते कालरोजीं परत गेले.

एथून दक्षिणेस १० कोशावर पातुर शेखबाबू म्हणून गांव आहे तेथें यात्रा भरण्यास या आठवड्यांत आरंभ झाला आहे. यात्रा मोठी भरते व दुकानें पुष्कळ जातात. या यात्रेची हकीकत व पातुरविषयीं थोडी माहिती पुढील अंकांत लिहू.

कमिशनर साहेबांची स्वारी उमरावतीकडे गेली आहे डिपुटी कमिशनर साहेब मुंबई कडे गेले आहेत. रेसिडेंट साहेबांच्या सरवराईचें सामान आणण्याकरितां मे. दस्तुर बहिमनजी साहेब मुंबईस गेले आहेत.ते अजून आले नाहींत.

ाम

हाण

शहरांत रस्त्यावरून धुळीची रेलचेल झाली आहे. व तीपासून लोकांस आतिशय त्रास होत आहे इतकेंच नव्हे. रस्ते एकदम नवीन सुरू करून त्रासकारक स्थितीस आणावें हें मुनासिपल कमिटीस योग्य नाहीं त्यापेक्षां एकेक रस्ता हातीं धरून त्यावर मुरुम वाळू वगैरे घालून पुरा करून मग दुसरा चालू करते तर फार बरें होतें हल्लीं नामदार गवनर जनरल साहेब, रेसिडेंट साहेब, हयदराबादचे दिवाण साहेब कधीं नव्हत अकोल्यास येताहेत म्हणून त्यांच्या दृष्टीस ही रस्त्याची अपूर्व शोभा पाडण्याचा कमिटीचा बेत आहे कीं काय कोण जाणें !

हिंगोली, परतवाडा, व जालना येथून पुढील आठवड्यांत येथें फौजा येणार आहेत.

क्या. सालकेड साहेबानीं आपले लष्करी जागेवर जाणे करितां राजिनामा दिला असें कळतें.

या जिल्ह्याचे या सालचे अबकारी मक्याचे लिलाव झाले ते गुदस्त सालचे मेळासुद्धां खालीं लिहिल्या प्रमाणें.

| | सालमज० | सा० गुदस्त. |
|---|---|---|
| कलाली. .... | २६०४७५ | २५४८८८ |
| अफू.... ... | ५९१७५ | ४४५७६ |
| विषयुक्त पदार्थ.... | ६७०० | ५३०९ |
| | ३२६३५० | ३०४७७३ |

यावरून पहातां सालमजकुरीं सुमारें बाविसहजार रुपयांची वाढ आहे व ती दरएक जिनसांत आहे. अकोला जिल्ह्यांतील लोक अर्ध्या लाखाची अफू खातात व अडीच लाखांची दारू पितात काय !

मे. रेसिडेंट साहेबांची स्वारी १६ वे तारखेस न येतां २१वे तारखेचे सुमारास येणार असें कळतें, वऱ्हाडचे राज्यकारभाराचे बाबदींत आम्हास आजचे पत्रांत कांहीं सूचना लिहून त्यांच्यापुढें ठेवावयाच्या होत्या पण त्यांचें येणें लांबलें सबब ताजपणाकरितां त्या सूचना आम्हीं पुढील अंकावर ठेवितों.

गवरनर जनरल साहेबांचे इकडे येण्याचे बेत वारंवार फिरत आहेत. आतां नवीन बेत असा झाला आहे कीं ते २३ वे तारखेस कलकत्याहून निघून २५ वे तारखेस जबलपुरास येतील व त्याच दिवशीं नागपुराकडून इकडे यावयास निघतील आणि मार्च्यांचे तिसरे तारखेस खामगावची सरकारी आगगाडी चालविण्याच्या समारंभाकरितां तेथें येतील. नंतर पुन: मागें हिंगणघाट व चंद्रपुरच्या कोळशाच्या खाणी पाहून सातवे तारखेस जबलपुरास जातील व तेथें ड्यूक साहेबांच्या आणि त्यांच्या भेटी होतील व बहुधा त्याच दिवशीं जबलपुराकडील आगगाडी सुरू करण्याचा समारंभ होईल नंतर गवरनर जनरल साहेब कलकत्यास परत जातील व ड्यूक साहेब मुंबईकडे जातील.

## मागाहून आलेल्या जाहिराती.

वऱ्हाडरिपोर्टर– हें पुस्तक कांहीं अडचणीमुळें जानेवारींत निघालें नाहीं. तें या महिन्याचे अखेरीस निघेल.

देवराव विनायक
म्यानेजर.

नोटिस—रामलाल बाबणलाल साहू दुकान अकोलें यांस खालीं सही करणार असें कळवित आहे कीं आम्हीं अकोलें येथें ज्या घरांत राहतों तें घर महाराज गोपाळ बावासाधु दुनखेडकर यांचें असून ते महाराज येथें आले असतां आमचे मयत बंधु हरि गणेश यांनीं त्यांजला ही जागा दुरुस्ती करून राहण्यास मागितली व त्यावर खर्च करून दिवाली व बाहेर छपर केलें आतां त्याबद्दलचे खर्चाचा मजकूर तुम्हास कळविण्याची आम्हास जरूर नाहीं घर मागणें हें काम बावासाहेब यांचें आहे असें असून तुम्ही व तुमचे गुमास्ते आम्ही घरीं नसल्यावर अथवा असल्यावर घर खालीं करून देण्याकरितां तंटा करीत आहा. जर या घरावर तुमचा वारसा असेल तर योग्य कोर्टांचा हुकूमनामा मिळविल्यावांचून आमचे घरीं आल्यास आम्ही तुम्हांवर त्रास दिल्याबद्दल किंवा आगळिकीबद्दल फिर्याद करूं कळावें तारीख ११ फेब्रुवारी सन १८७०

( सही ) रामचंद्र गणेश लाळिंगकर.

## नोटिशीचें उत्तर.

चिरंजीव विठोबा कृष्णाप्पा मुंजाळ दुकान बाळापूर यास धनापाशेट मुंजाळ दुकान पेठ बाळापुर याजकडुन कळविण्यांत येते कीं. तुम्ही वऱ्हाडसमाचारांत तारिख २९ माहे जानेवारी सन मजकूरचे पत्रात आम्हास नोटिस दिलीत तिचें उत्तर येणप्रमाणें—आपला वडिलोपार्जीत दुकानदारीचा व्यापार येकत्र चालावा असें तुम्हांस न आवडल्या वरून तुम्ही कियेक वर्षें विभक्त होण्या विषयीं जिकीर करित होता त्यावरून गेल्या चैत्र वैशाख मासीं जिनगीच्या वाटण्या करून घेण्या विषयीं व पावत्या फारकती करण्या विषयीं माधव गिर बाबा वगैरे सभ्य पांच गृहस्थास पंच नेमून काम सुरू केलें व माल, दुकानें, कुळें, घेणें व नगदीं शिलक वगैरे सर्व वांटुन घेतली. पुढें पावत्या व फारकती वर सह्या करण्याचे वेळीं तुम्हीं उगीच तक्रार काढली कीं कांहीं रकमेचा आम्हांस भाग मिळाला नाहीं. बाकी इमानें इतबारें व हिशेबानें म्हटलें म्हणजे सर्व वडीलार्जीत जिनगीच्या बरोबर वाटण्या तुम्हांस मिळाल्या आहेत कांहीं येक घेणें राहिलें नाहीं सह्या करण्या विषयीं तुम्हास कियेक वेळां विचारिलें असतां तुम्ही हयगयी वर व लाबणीवर टाकून शेवटीं असा नोटिस देण्या परीयंत परीणाम केलात हा तुमचे लौकिकास योग्यच आहे. परंतु अजुन ही आम्हीं तुम्हांस सांगतों कीं आपले वडिलांचे नावाकडे लक्ष देऊन भलेपणानें वागुन आपसांत आम्हाकडे येउन पावत्या फारकती पुऱ्याव्यात यांत उगीच तंटा वाढवून दिवाण दरबार करूं नये इतक्या उपर तुमची मर्जी. सलोख्याचे रीतीनें तुम्ही आम्हाकडे आला व वाटणी करून दिली नाही अशा रकमा मुद्दे पत्ते सुद आम्हास दाखविल्यात तर त्यांचा तपास पाहून तुमची वाटणी त्यांत होणें असल तर करून देऊ. या शिवाय नव्हा छाडून ठेविल्या, कन्हय्यालालचे दुकानावर वायदा केला, व गुप्त रकमेचा निकाल केला नाही वगैरे नोटिशींत जें लिहिलें आहे तें सर्व बातल आहे. व तसें लिहिणें तुम्हास योग्य नव्हतें. आणि विनाकारण नोटिस देउन आम्हांस जबाब देणें भाग पाडलात याज करितां याचा खर्च तुम्ही आम्हास आणुन दिला पाहिजे. कळावे तारिख १२ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी

( सही ) धनाप्पा वाणी मुंजाळ
दुकान पेठ बाळापूर.

# वर्तमानसार.

**रजेविषयीं नवीन ठराव**—हिंदुस्थान सरकारानें असा ठराव केला आहे कीं, कोणीं बेसनदी सरकारी कामदारानें हक्काची रजा घेतली व रजा भरून वर आठ दिवस पर्यंत तो हजर झाला नाहीं तर त्याचा त्या जागेवर हक्क राहणार नाहीं; परंतु त्या इसमाची नेमणूक करणें ज्या अधिकाऱ्यांचे हक्कांत आहे त्यांनीं त्यांस त्या कामावर पुन: नेमण्यास किंवा दुसरे जागीं नेमून मागील चाकरीचा काळ बुडणार नाहीं किंवा त्याचा अमुक भाग बुडेल असें ठरविण्यास ते मुकत्यार आहेत. हक्काच्या रजेवर एक महिना किंवा त्याहून जास्ती दिवस लागले आणि त्यास त्याची मागील चाकरी न बुडूं देता पुन: चाकरीवर नेमण्याचा विचार झाला तर मात्र हिंदुस्थान सरकारचें पूर्वी सांकशन घेतलें पाहिजे.

मुंबईच्या युनिवर्सिटींत डिग्रीच्या परीक्षेकरितां इतर भाषांप्रमाणें पर्शियन भाषा ही चालू ठेवण्याचा ठराव झाला आतां त्या भाषेचे प्रोफेसरही नेमतील.

ड्यूकसाहेब ९ वे तारखेस लाहोरास पोचणार होते तेथें काश्मीर, पतियाळ, नभा, झिंद आणि कपुरथळा एथिल राजांच्या भेटी होतील.

मुंबईतील प्रसिद्ध पारशी सरजमशेटजी जिजी भाई यांच्या पत्नी आवाबाईसाहेब मरण पावल्या. या मोठ्या दानशूर होत्या. यानीं दोन च्यार कृत्यांस सुमारें च्यार लक्ष रुपये धर्मादाय खर्च केला आहे. यांच्या तोडाची दुसरी स्त्री पारशी जातीमध्यें अजून झाली नाहीं.

मुंबईच्या एलफिनस्टन कालेजांत एक कमर्शल क्लास म्हणजे व्यापार संबंधीं माहिती शिकविण्याचा वर्ग काढावा असा डायरेक्टर साहेबांचा विचार आहे.

मि. नाक्स साहेब जि आय पी रेलवेचे माजी ट्राफिक म्यानेजर मरण पावले असें वर्तमान आलें आहे.

गेल्या वर्षांत एकंदर सोळा ठिकाणीं नवीन ब्रह्मसमाज स्थापन झाले. याशिवाय प्रार्थनेकरितां ठिकाठिकाणीं पांच मंदिरें नुकतींच बांधलीं. हल्लीं त्यांच्या फिरत्या धर्मोपदेशकांची संख्या दहा आहे.

कलकता एथें ब्रह्म समाजाची स्थापना होऊन सुमार ४० वर्षें झालीं. हा समाज ज्या दिवशीं स्थापन झाला तो दिवस यंदा २३ वे जानेवारीस पडला. या दिवशीं बाबु केशव चंद्रसेन समाजाचे चिटणीस हे निशाण घेऊन आपले अनुयायांसह शहरांतून ईश्वराचे नामाचा घोष करीत समाजाचे मंदिरीं गेले व तेथें पोंचल्यानंतर भगवत स्तोत्र पठ झाल्या नंतर त्यानीं एक सुंदर व्याख्यान दिलें.

रा. बा मोगेबा कानोबा यांस मनोदयानुरूप त्यांचे ज्ञातीची येक विधवा मिळाली. तिचें वय २३ वर्षांचें आहे आतां त्यांचा पुनर्विवाह लवकरच होईल.

नागपुरास तेथील अबझर्वर वर्तमान पत्र पुन्हा चालू होणार असें वाटतें. रत्नागिरीहून लक्ष्मण सिताराम कारखाननीस नावाचे ८० रुपये पगारावर येक मराठी एडिटर या कामा करितां तिकडे गेले आहेत असें कळतें.

ग्रेट इस्टर्न नावाचें एक फार मोठें जहाज मुंबईस आलें आहे. यांत तारायंत्राचा दोर भरून आलेला आहे तो पावणे तीन हजार मैल लांबीचा आहे. या जाहाजाची लांबी सुमारें ७०० फूट, रुंदी सवाशें फूट, व उंची ६० फुट आहे. याला लोखंडी पत्रें १०००० लागलेले आहेत. व ते जोडण्यास बीस लक्ष खिळे लागले आहेत. हें पाहावयास जाणारा पासून दोन रुपये फी घेतात.

मुंबई सरकारानें ड्यूक साहेबांचे भेटिकरितां बडोद्याचे गायकवाड, कोलापुरचे, व कच्छचे राजे यांस खलीते पाठविले आहेत. व सर्व संस्थानिक आणि सरदार यांस पोलिटिकल एजंट मार्फत बोलावणीं पाठविलीं आहेत.

यंदा प्रयागास माघस्नानास व यात्रेस मनस्वी लोक चालले आहेत. यंदाच्या यात्रेस माघमेळा म्हणतात. हा योग १९ वर्षांनीं एकदां येतो असें म्हणतात. लोकांची इतकी गर्दी आहे कीं, आगगाडींत त्या सर्वांस जागा मिळत नाहीं. पूर्वेस जमालपुरापर्यंत पश्चिमेस दिल्लीपर्यंत व दक्षिणेस जबलपुरापर्यंत सर्व स्टेशनावर पुष्कळ उतारू तुंबून राहिले आहेत." रेलवेच्या योगानें मूर्तिपूजेस केवढें साह्य होतें तें पहा ! सू.

कलकत्यांतील ब्रम्हसमाज मताचे पुढारी बाबुकेशव चंद्रसेन हे विलायतेस जात आहेत त्याकरितां त्यांनीं आपले जाति वेळचें एक सुरस व्याख्यान लोकांस ऐकविलें. हा समारंभ टौनहालांत दुसरे तारखेस रात्री झाला. लोक सुमारें एक हजाराहून अधिक जमले होते. त्यांत आनरबल सर रिचर्ड टेंपल, आनरबल मि. नोबल टेलर, मि. जस्टिस फ्रियर, रेवरेंड मरे मिचल, राजे सत्येंद्र घोसाळ इत्यादि बहुत मोठे मोठे युरोपियन व नेटिव लोक आले होते. व्याख्यानाचा विषय "इंग्लंड देश व हिंदुस्थान देश" हा होता. व याच्या संबधानें त्यांनीं पुष्कळ उत्तम उत्तम गोष्टी सांगितल्या व त्यांतच आपले विलायतेस जाण्याचें कारण सांगितलें. ते म्हणाले कीं, आम्ही आपले स्वतांचे किंवा दुसरे कोणे गृहस्थाचें काम घेऊन विलायतेस जात नाहीं. आपले राष्ट्राचे व्यवहार संबंधी व नीती संबंधी सुख आणि सोई वाढाव्यात हाच आमचे जाण्याचा मुख्य हेतु आहे व त्याकरितां आमच्यानें करवतील तितके प्रयत्न आम्हीं करूं. नंतर लोकांस उत्तेजनपर कांहीं गोष्टी सांगितल्या. व भाषण समाप्त केलें. भाषण चाललें होतें तोंपर्यंत सर्व सभा केवळ चित्राप्रमाणें तटस्थ झाली होती. कृपाळू परमेश्वर या सद्गृहस्थांचा उत्तम हेतु सफळ करो.

नगरास रावबहादुर गुरुराव कृष्ण माजि दप्तरदार मरण पावले. हे गृहस्थ आपले कामांत मोठे हुशार होते.

मुंबईस वकिलीचे परीक्षे करितां २४५ उमेदवार जमले आहेत.

पुण्यास वे. शा. सं. रा. विठोबा अण्णा कऱ्हाडकर यांस ग्रामस्थ व शास्त्री यांनीं १२५ रुपयांची शालजोडी व १०० रुपये रोख देउन त्यांची संभावना केली.

कलबुर्ग्या पासून हैदराबादे पर्यंत आगगाडीचा रस्ता करावयाची लवकरच सुरुवात होईल. यास सुमारें सवा कोटि रुपये खर्च लागेल. निजाम सरकारचा या रेलवेंत कांहीं संबंध राहाणार आहे.

गंगेच्या मुखापाशीं गंगा सागराच्या मेळ्यास जाण्याकरितां सुमारें १५० लोक एका होडींत बसून चालले असतां रात्रौ १० वाजण्याचे सुमारास ती होडी बुडून बहुतेक मनुष्यें मरण पावलीं त्यांत स्त्रिया फार होत्या. सू.

### एक चमत्कारिक व विलक्षणिक मनुष्य.

विलायतेच्या नूतनच्या आगबोटींतून जीं वर्तमानपत्रें आलीं आहेत त्यांतील एका पत्रांत एका मनुष्याविषयीं हें पुढील चमत्कारिक व विलक्षणिक वर्तमान लिहिलें आहे त्यांतील सारांश खालीं लिहिल्याप्रमाणें.

फ्रान्स देशांतील एका गोरकाय लष्करी शिपायानें आपले ३३ वर्षांचें आयुष्य कसें घालविलें तें पहा. त्याची उमर १८ वर्षांची होती तेव्हां तो लष्करांत दाखल झाला. तेथें तीन महिने देखील पुरे झाले नाहींत तोंच त्याच्या वाईट वर्तणुकीस्तव त्यास सहा महिने सक्त मजुरीनिशीं कैदेची शिक्षा मिळाली. तेथून सुटका झाल्यावर तो कित्येक गोरकाय बंडखोराचे मंडळींत शिरला. व त्यांच्या बरोबर बंड उठविण्याच्या कामांत सामिल झाल्यामुळें हाता पायांत बिड्या ठोकलेल्या अशा अवस्थेंत तो पांच वर्षें पर्यंत कैदेंत पडला होता. पुढें तेथून सुटका झाल्यावर एका अमलदाराचा खून केल्याच्या आरोपाचा त्याजवर अपराध शाबित झाल्यामुळें त्यास फांशीची सजा ठरविण्यांत आली होती. परंतु तशाच कांहीं योग्य कारणावरून सदरील शिक्षा रद्द होऊन १५ वर्षें पर्यंत कैदेंत ठेवण्याची शिक्षा त्यास देण्यांत आली. ही शिक्षा त्यानें सुमारें आठ वर्षें पर्यंत भोगल्यावर त्यास तशाच कांहीं कारणावरून सरकारांतून माफी मिळाली. ती मिळतांच ह्मणजे तुरुंगांतून याचें पाऊल बाहेर पडतांच दुसरे दिवशीं त्यानें असें केलें कीं, कोणा एका गृहस्थाची सुंदर स्त्री पाहून त्यानें पुढें कांहीं एक विचार न पाहतां तिजवर बलात्कार केला. हा गुन्हा त्याजवर चांगलेप्रकारें शाबीत झाल्यावरून न्यायाधिशांनीं त्यास १३ महिने सक्त मजुरीनिशीं कैदेची शिक्षा दिली. त्या वेळीं या मनुष्यानें काय चमत्कार केला तो पहा. ह्याचा मुकदमा चालत असतां शेकडो लोकांची गर्दी कोर्टांत झाली होती त्या सर्वां समक्ष जवळच एक मेणबत्ती जळत होती. तिचें जड पितळी घर हातांत मोठे रागानें घेऊन न्यायाधिशाकडेस फेंकलें !!! यावरून त्यास आणखी २ ५र्षें पर्यंत सक्त मजुरीनिशीं कैदेची सजा दिली. पुढें ह्या कैदेंतून जेव्हां त्याची सुटका झाली तेव्हां तरी त्याची वर्तणूक सुधरावी तर तसें झालें नाहीं. याचें कारण उघडच आहे. म्हटलें आहे कीं, "जित्याची खोड मेल्यावांचून जात नाहीं." त्याप्रमाणें त्यानें पुनः वाईट मार्ग धरला. तो असा कीं, शेजारी पाजारी यांच्या बरोबर दररोज तो तंटे बखेडे करूं लागला. ह्या त्रासामुळें त्याच्या आई बापासही त्याचा कंटाळा आला. व पोटचा मुलगा जरी होता तरी बापानें रागावून त्यास घरा बाहेर हाकून दिला यामुळें तर त्यास इतका राग आला कीं, त्यानें आईबापाचा देखील खून करण्याचा कृतनिश्चय केला. हा बेत सिद्धीस जावा म्हणून त्यानें अशी युक्ती केली कीं, ज्या घरांत त्याचें आईबाप रहात होते, त्या घरासभोंवती रात्रौ लाकडें वगैरे खूप रचलीं व त्यांस आतां आग लावून देणार इतक्यांत दूर कांहीं गलबला ऐकून त्याचा बाप सहज घराबाहेर आला. त्यास पाहातांच या सुपुत्रानें त्याचे पोटांत जोरानें कटार भोसकली. व तो तरफडून जमिनीवर पडतांच त्यास पायांनीं तुडविलें. व त्याच्या शरीरास पुष्कळ ठिकाणीं छिन्न भिन्न केलें. व आतां तो दुष्ट आईची ही तीच दशा करावयास जाणार, तों इतक्यांत ती सुदैवानें कोठें नाहींशी झाली. व हा तिचा पाठलाग करीत असतां खुनाचे सर्व साहित्यासहित सांपडला. व पकडल्यावर आपला गुन्हा कबूल झाला, इतकेंच नाहीं तर न्यायाधिशानें त्यास जेव्हां फांशीची सेजा दिली, तेव्हां तो म्हणाला कीं ही शिक्षा भोगणें मला वाईट वाटत नाहीं, परंतु माझी आई माझ्या सपाट्यांत सांपडली नाहीं व निसटून गेली याचें मला फारच वाईट वाटतें. व० दी०

## जाहिराती.

### NOTICE.

SIR H. B. E. FRERE'S SPEECHES AND ADDRESSES.

The undersigned begs respectfully to announce that he has in the press a work containing all the Speeches and Addresses delivered by Sir Bartle Frere G. C. S. I. K. C.B. during the time he was Governor of this Presidency.

The work is classified under the following heads;—

( 1 ) Political Addresses.
( 2 ) Legislative. ,,
( 3 ) Educational. ,,
( 4 ) Miscellaneous Speeches delivered on memorable public occasions.
( 5 ) Appendices, containing letters written on public occasions, and addresses presented to Sir Bartle Frere on his retirement from India and his replies thereto.

The size of the book is royal octavo, is containing about 500 pages, and the binding will be of a good character. The frontisprese will contain Sir Bartle's portrait. Gentlemen desirous of subscribing for this publication, will be pleased to signify their wishes to Mr. Keshewrao Narayen Kolutkar care of Berar Sumachar.

The price of the Book will be Rupees Five per Copy, payable in advance, exclusive of postage.

The Compiler trusts that he will receive liberal patronage and support from the public in his present undertaking.—

*BALKRISHNA NILAJI*
*Asst. Supt., Revenue Department,*
*Secretariat, Bombay.*

*Bombay*
*7th February* 1870. }

नोटिस—चेडाजी बेलदार वस्ती शीस तालुके अकोलें यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यात येते कीं, तुम्हाकडेस आमचा कापूस येणें २॥ आडिच खंडी भागनीपैकीं येणें आहे तो आजपासून ८ दिवसांत आमचे येथें आणून दावा न दिल्यास कायद्याप्रमाणें तजविज करून नोटिशीचे व फिर्यादीचे खर्चासुद्धां घेण्यांत येतील तारीख १२ फेब्रुवारी सन १८७० इ०.

( सही ) कडतु वल्लद जयराम सोनार
वस्ती बाभुळगांव द. खु.

## नोटिस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, बुलढाणें जिल्ह्याचे अपकारीचा लिलांव तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी रोजीं होण्याविषयीं सर्वत्र ठिकाणीं प्रसिद्ध झाली होती परंतु हल्लीं तो दिवस रहित करून तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८७० रोज मंगळवार इसवी रोजीं सन १८७० । ७१ इसवी सालाबद्दल सालाबाद प्रमाणें केला जाईल बाकीचे नियम मागीलप्रमाणेंच समजले पाहिंजेत कळावें. तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी मुक्काम बुलढाणें.

दामोदर सदाशीव हुजूर कारकून.
रामकृष्ण महिपत जुडिशल
शिरस्तेदार.

J. ALLARDICE
Deputy Commissioner B. District
देपुटी कमिशनर.

नोटिस—हिराचंद बाळचंद आगरवाले जळगांवकर हल्लीं रहाणार जळंब तालुके बाळापूर यांस नोटिस बापु वल्लद शिवराम पाटील मौजे मछेंद्रखेड तालुके बाळापुर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तारीख २९ १८७० रोजीं सदहू पत्रीं जबाब माझे नोटिशीचा तुम्हीं लिहिल्यांत खाते वहिवर व रोख्यावर अशां तुम्ही सह्या करून हे रुपये नगदी पावले नाहींत सबब देणें नाहींत असें म्हणता वगैरे मजकूर ऐसियांस या रोख्याप्रमाणें रोख रुपये पावले नाहींत असे खातेवाहिवर ही सही आहे म्हणून तुम्हीच लिहिता यावरून उघडच आहे व याकारितां साक्षिदारही आहेत ह्या रोख्यांतील रक्कम खातेबाकिची आहे त्या हिशोबाची मी तुम्हाशीं तकरार ह्या वेळेस व ह्यानंतर आजपावेतों करितच आहें कारण मोगलाई अमलापासून कंपेश बीस वर्षें होत आलीं तुमचें माझें देणें घेणें व शेती चालत होती कित्येक रकमेचा रुजू मोकाबला व्हावयाचा तो तुम्ही एकिकडेस ठेऊन आपले देणें कसेंही कायम सध्या व्हावें जाणोन या रोख्याचे स्टांप कागदाचे खरेदीस तुम्हीच ६ रुपये देऊन तक्रार ज्या रकमेची हिशेबी निघती म्हणतां ते रुपये हल्लीं नगदी द्यावे अशी तुम्ही मजला भुलथाप देऊन सह्या घेतल्या त्याच जळगांव कसबे मजकुरीं रजिष्टर कारकून असून हा रोखा खरा असता तर तेथें तुम्ही नोंदविला असता तसें कां केलें नाहीं सदहू रोख्याप्रमाणें दोन सालबंद्यांचा ऐवज तुम्हांस मजकडून कधींच पावला नाहीं तेवेळेसच समयीं मजला नोटिशीनें वगैरे मागणें कशावरून केलें नाहीं? आणि सालगुदस्त भोजगांव मुक्कामीं तुम्ही सदहू रोख्याबद्दल तिनशें रुपये वर तंटा तुमचे आमचे देणें घेण्याचा आज पावेतों जो होता तो तोडून टाकितों असेंही कबूल झाला होता परंतु मी कबूल केलें नाहीं यास्तव तुमचें काय म्हणणें आहे तें मजला यांच उत्तरीं कळविण्याचें व्हावें म्हणजे तुम्हाआम्हांस रीतीप्रमाणें तजवीज पाहण्यास बरें पडेल कळावें तारीख ३ फेब्रुवारी सन १८७० इ०

( सही ) बापु वल्लद शिवराम पाटील
मौजे माछिंद्रखेड.

| किमतीचे ठराव. | रु. | आ |
| --- | --- | --- |
| वर्षाची अगाऊ देणारास... ... | ६ | ० |
| साल अखेर ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास ... ... | | ६ |
| फुटकळ .. ... ... | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

**नोटिसा वगैरे छापण्याचे दर.**

१० ओळी पर्यंत... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणिदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आकटोबर सन १८६८

**वऱ्हाडसमाचाराचे मालक**

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. V, AKOLA:—SATURDAY EVENING, FEBRUARY 19, 1870 NO. 8

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १९ माहे फेब्रुएरी सन १८७० इ० अंक ८



## पाहिजेत.

हुशार दोन मराठी कंपाझिटर पाहिजेत. ते इंग्लिशचे माहितगार असल्यास फार उत्तम. योग्यता पाहून पगार १९ पासून २९ पर्यंत मिळेल.

मालक, व० स०


## रेसिडेंट साहेबांचे अवलोकनार्थ.

इलाख्यास जसे गवरनर मुख्य तसे आमचे वऱ्हाड प्रांतास हैदराबादचे रेसिडेंट मुख्य आहेत. त्यांचे सत्तेनें एथील राज्यकारभार चालतो. व त्यांची स्वारी बहुतां दिवसांनीं आपला मुलुख पाहण्यास इकडे येत आहे. तेव्हां याप्रसंगीं आमचे प्रांतांत कोण कोणत्या गोष्टी अवश्य पाहिजे आहेत याचा आज विचार करून त्यांपुढें ठेविला तर कांहीं उपयोग झाल्यास होईल, निदान आपले कर्तव्यकर्म तरीं केलेंसें होईल, असें मनांत आणून दोन ओळी लिहितों.

रेसिडेंट साहेबांची गादीची जागा हैदराबाद ही वऱ्हाडास फारच लांब व आडवळणी आहे; म्हणून गरीब गुरीब रयतेस दाद मागण्या करितां तथपर्यंत जातां येत नाहीं व दाद लागण्याचे व लावविण्याचे मार्ग अडाणी वऱ्हाडी प्रजेस नीट ठाऊक नाहींत. याजकरितां रेसिडेंट साहेबांनीं वर्षास एक फेरी या प्रांतांत अवश्य घालीत जावी. आणि सर्व जिल्ह्याचे व तालुक्याचे जागीं जाऊन सर्व राज्य कारभाराची व्यवस्था पाहावी, व लोक भेटावयास येतील त्यांच्या भेटी घ्याव्या. दोन वर्षांमागें मे० टेंपल साहेब बहादुर रेसिडेंट वऱ्हाडांत आले होते व ते थोडक्यांत थोडके वरेच फिरले व परत गेल्यावर त्यांनीं आपल्या पाहणीचे कागद पत्र छापून प्रसिद्ध केले तसा प्रकार वर्षास व्हावा तो या रेसिडेंट साहेबांचे कारकीर्दींत गुदस्त सालीं झाला नाहीं म्हणून या सालीं तरी दोन तीन महिने सर्व प्रांतांत फिरून तसें करणें अवश्य व ब्रिटिश राज्यास योग्य असें आहे. याजकरितां आम्हीं इच्छितों कीं खामगावची रेलवे सुरू करून गवरनर जनरल साहेब व दिवाण साहेब परत गेल्यावर रेसिडेंट साहेबांनीं सावकाश हिंडून आपल्या राज्याची एकवार संपूर्ण पाहणी करावी. व लोकांच्या उण्या अधिक गोष्टी ऐकून घ्याव्या. रेसिडेंट साहेबांस आपल्या अडचणी, गैरसोयी, व दुःखें कळवावीं असें बहुत लोकांचे मनांत येतें पण त्यांस चांगलीशीं साधनें नाहींत; म्हणून रेसिडेंट साहेबांनींच कृपाळू होऊन त्यांस सवड द्यावी हे योग्य आहे.

वऱ्हाडांत कमिशनर म्हणून दिवाणी, मुलकी, व माजिस्त्रेटी खात्यास एकच अधिकारी आहेत. हा प्रकार बराबर नाहीं. अशानें गोंधळ होतो, अधिकाऱ्यांचें काम वाढतें, व तें व्हावें तसें होत नाहीं. ज्यांकडेस धरपकडीचें व माजिस्त्रेटीचे काम त्यांजकडेसच अखेर इनसाफाचें काम नसावें हा इंग्लिश राज्याचा शिरस्ता आहे व एथें तर अठरा कारखाने एकाच कमिशनराकडे दिले आहेत. नागपुरास कमिशनरी अंमल आहे पण तेथें देखील वेगवगळी व्यवस्था आहे, तसें आम्हीं म्हणतों कीं, एथें पूर्व पश्चम भाग कमिशनर केले आहेत त्यापेक्षां जुडिशल कमिशनर व इतर कामाचा कमिशनर असे दोन वेगवेगळे कमिशनर केले तर चांगलें होईल व तेणेंकरून इनसाफाचें काम अधिक चांगल्या रितीनें चालेल. या गोष्टीचा रेसिडेंट साहेबांनीं विचार करावा.

आमचा वऱ्हाड प्रांत ईश्वराचे कृपेंकरून स्वतः सिद्ध चांगला पिकाऊ आहे पण इंग्लिश सरकारचे कौशल्यानें त्याचे पिकाची वृद्धि होण्याचे कामीं अजून त्याचा पुष्कळ मागें पाय आहे. इरिगेशन म्हणजे नद्यांस मोठाल्या ताली व धरणें बांधून देशभर पाटाचें पाणी पुरवून बागाईत वाढविणें या कामास वऱ्हाडांत अजून आरंभसुद्धां नाहीं. या मुलखांत ब्रिटिश राज्य होऊन सुमारें सत्रा वर्षें झालीं; रेलवेसारखा मार्ग होऊनही सात आठ वर्षें झालीं; असें असून व पूर्णा वगैरे कित्येक नद्या धरणें बांधून पाणी पुरविण्यास सोईच्या असून रेसिडेंट साहेबांनीं या कामीं चांगलीशी उचल अद्याप केली नाहीं ती अजून तरी लवकर करावी असें आम्ही म्हणतों. गुदस्तसालीं एक इंजिनियर या कामाची पहाणी करण्याकरितां नेमिले होते व ते पुष्कळ दिवस आजारी पडले होते. शेवटीं त्यांनीं आपल्या कामाचा रिपोर्ट केला आहे असें कळतें. परंतु तो अजून बाहेर पडला नाहीं अशी इकडील इरिगेशनची स्थिती आहे.

रेसिडेंट साहेबांस दुसरी गोष्ट आम्हांस सुचवावयाची आहे ती रस्त्याविषयीं होय. पब्लिक वर्कस खातें वऱ्हाडांत थोड्या भरभराटीचें आहे असें नाहीं परंतु त्यापासून देशांत जागोजाग चांगले रस्ते होऊन लोकांना उपयोग विशेष झाला आहे असें अजून दिसत नाहीं. व वऱ्हाडांत जिल्ह्यांचीं स्टेशनें सहा आहेत त्या परस्परांपासून परस्पराकडे जाण्यास अजून सडका नाहींत मग तालुक्याच्या व इतर व्यापाराच्या गांवांची गोष्ट कशास पाहिजे? उमरावती व इलिचपुर यांच्या दरम्यान सडक झालेली आहे; व अकोला आणि वाशिम यांमधील सडक अजून पुरी झाली नाहीं. अकोल्याहून अकोटास व बडनेऱ्याहून मोरशीकडे सडक गेली आहे; परंतु त्यांवर वार्षिक दुरुस्ती असल्याचें दिसत नाहीं व सडकाही अजून पुष्कळ झाल्या पाहिजेत. गुदस्त सालीं बजेटामध्यें सडकांच्या कामाकरितां पावणें दोन लक्ष रुपयांचें सांगशन झालें होतें ती सर्व रक्कम तशीच्या तशी शिलक राहिली आहे व रस्तापट्टीचेंही गुदस्तसालीं सुमारें पाऊण लक्ष रुपये उत्पन्न झालें आहे त्यास आतां तरी चहोंकडे सडका, धर्मशाळा, व विहिरी वगैरे रहदारीच्या साया कराव्या. गरिबांस व व्यापाऱ्यांस मुख्य व आवश्यक ज्या सोयी त्या केल्या नाहींत आणि हुजूर ठिकाणीं लाखों रुपयांचे फौजवाड केले, बंगले केले, व बाग केले तर राज्यास काय मोठा उपयोग व भूषण आहे?

विद्याखात्याचें काम वऱ्हाडांत चांगल्या रितीनें चालू आहे पण त्यांत आलीकडे एक नवीन फेरफार झाला आहे त्याचें आम्हांस कारण दिसत नाहीं व उलटी थोडी त्यापासून गैरसोय दिसते. म्हणजे डिपुटी कमिशनरांच्या ताब्यांत लोअर क्लास स्कुलें दिलीं आहेत पण अशी वहिवाट मुंबई इलाख्या कडे देखील नाहीं. डिपुटी इन्स्पेकटर, इन्स्पेकटर, व डायरेक्टर या तीन अधिकाऱ्यांच्या पायऱ्या पुरे आहेत व एवढ्यानेंच दुसरीकडे सुरळीत कामें चालतात. स्कूलमास्तर लोकांचे पगार वक्तशीर मिळत नाहींत असा एक मोठा बोभाट आहे व त्यास हा नवीन फेरफार थोडा बहुत कारण आहे असें आमचें ऐकण्यांत आलें आहे.

टापाल खातें वऱ्हाडांत अजून सुधारत नाहीं. हें ब्रिटिश राज्यव्यवस्थेस मोठें लांछन आहे. लहान गावांकरितां रुरल मेलें जरही नेमले आहेत परंतु ते तीन तीन आठवडेही कागद घेऊन त्या गावांस जात नाहींत हा केवढा अंधार आहे!

नागपुर मुंबई प्रमाणें एथें वकीलीच्या परीक्षा वर्षास देण्याचा लोकांस हक्क ठेवावा. तशानें इंग्लिश शिकलेले व नव्या ज्ञानाचे लोक यांसही त्या धंद्यांत अंश मिळेल. तशाच कारकुनीचे कामा करितांही एथें परीक्षा असाव्या. तहशिलीसाठीं, व आसिस्टंट कमिशनरसाठीं, वऱ्हाडांत परीक्षा आहेत तर वकिलीसाठीं वगैरे नसाव्या हें बरोबर नाहीं.

प्रजेवर समबुद्धि असावी हा राजधर्म होय. हा प्रांतांतील अमलदारांकडून कोणे प्रकारें बजाविला जातो यावरही पैरवी पाहिजे. इकडे साधारण अधिकारावर कोणी नेटिव ठेवावयाचा म्हणजे त्यांत कोठें कोठें वरीच चिकित्सा होत असते म्हणजे दक्षणी मनुष्य कामाचा नाहीं, त्यापेक्षां कमी विद्वान वऱ्हाडी असला तर चालतो. व मुसलमान असेल तर फारच सर्वोत्कृष्ट. तहशिलदारीसारख्या जोखमीच्या व अनुभवाच्या जागांवर गैर वाकब मुसलमान व वऱ्हाडी गृहस्थ चालतात व हुशार दक्षणी गृहस्थांस पायरीचा हक्क व चांगला अनुभव असला तरी कोणी पुसत नाहीं. हा भेद असाच पुढें चालला तर लोकांचे दिल बिघडविणारा व देशाचें नुकसान करणारा आहे. आम्हास वाटतें कीं, सरकारचा इरादा विद्येस श्रेष्ठत्व देण्याचा आहे. अमुक जातीचे किंवा अमुक देशचे लोकांस हातीं धरावें व इतरांस पायीं लोटावें असें मुळांत सहसा नाहीं. तर हे प्रकृतीचे भेद आहेत व हे जितके कमी होण्याचे मार्ग निघतील तितकें देशाचें सुख व समृद्धि वाढेल.

आतां आज विस्तारामुळें आम्ही हा विषय पुरा करितों.

## समाधि किंवा मृतस्थिति.

श्वासें बंद करून इंद्रियें अगदीं अचेतन ठेऊन प्राणवायूचें मस्तकामध्यें जें एके ठिकाणीं आकलन करणें त्याचें नांव समाधि लावणें. या स्थितींत मनुष्य असला म्हणजे त्यास मानसिक व शारीरिक सुख दुःखें हीं अगदीं नसतात व स्नेहपाश त्यास बांधू शकत नाहींत. जो पूर्वीं विचार करित असावा तोच मनांत स्थिर असतो, याजकरितां योगी समाधि लावण्याचे वेळेस ब्रम्ह ध्यान करीत असतात. याप्रमाणें अमली पदार्थांनीं होतें असें म्हणतात. आमचे योगी ही स्थिती उत्तम असें समजत असत. या वेळेस अन्न पाण्याची गरज नसते, त्रिकालज्ञान प्राप्त होतें व समाधींत घालविलेला वेळ यमधर्म खर्च झाला असें समजत नाहींत असें म्हणतात. आलीकडे या मार्गांतले लोक फार थोडे आढळतात. मागें जसे वर्षानुवर्षें रहात असत त्याप्रमाणें आतां राहिलेले आढळत नाहींत. तथापि तीनचार दिवसपर्यंत अन्न पाण्यावांचून एका आसनावर बसून राहतात त्या वेळस त्यांचे शरीरास कांहींही इजा झाली तरी त्यापासून त्यांस व्यथा होत नाहीं. अशीं कांहीं उदाहरणें आमचे पहाण्यांत आहेत. थोडे वर्षां पूर्वीं राजपुर एथें एक ब्राम्हण होता तो हा अभ्यास करित असे. त्याणें अन्न सोडलें होतें व तीन तीन दिवस पर्यंत एका स्थितींत राही. ज्यावेळेस प्राण वर चढे त्यावेळेस उचकीसारखे मोठे शब्द होत असत. आलीकडील शोधावरून असें कळतें कीं, मेस्मेरिझम हा प्रयोग करण्याची जी युक्ति निघाली आहे तिचें व योगाचें फार सादृश्य आहे. सन १८६२ त मुंबईस एक या विद्येंत निपुण युरोपियन आला होता, तो पाहिले त्यास या विद्येनें आपले अमलांत आणी परंतु आम्ही ज्याप्रमाणें जर्मनी देशांतील वगैरे लिहिलेले चमत्कार वाचतो त्या प्रमाणें त्याचा प्रयोग केलेला मनुष्य इतर देशांची व भाषांची व काळाची माहिती बोलत नसे. अद्यापपर्यंत ब्रम्हांडीं प्राण स्थिर करण्याची मात्र माहिती युरोपियन लोकांस लागली नव्हती. आलीकडे असे शोध लागले आहेत कीं, जमीनींत पुरलेले मनुष्य कितीएक महिनेपर्यंत अन्नपाण्यावांचून जिवंत असतात. जमीनीचे किंवा दगडांचे छिद्रांतून थोडथोडी हवामात्र आंत गेली पाहिजे. जर एकदम पुष्कळ हवा जाईल तर प्राणनाश होईल. एक मनुष्य मेलेला असा समजून चार महिनेपर्यंत पुरून ठेविला होता. पुढें कांहीं कारणानें थडगें उकरतांनां तो मनुष्य

जिवंत आहे असें कळल्यावरून उपाय करितांनां तो जिवंत झाला—२०।२१ दिवस पर्यंत अगदीं उपाशीं राहिलेले अशा इकडे गोष्टी कधीं कधीं ऐकूं येतात. एक डाकतर तर नुसते पाण्यावर ४ महिने पर्यंत होता—एथून १०।१२ कोसांवर सुमारें ४० वर्षांचे पूर्वीं एका खळग्यांत गवत भरलें होतें त्यांत एक बैल पडला. परंतु त्यास वर उठतां येईनाच वर गवत पडल्यामुळें तो कोणासही उमगला नाहीं. त्याच्या धन्यानें तळीं विहिरी देखील शोधल्या परंतु शोध लागला नाहीं. पुढें दोन महिन्यानीं गवतवाल्यास ज्या वेळेस गरज लागली त्या वेळेस तो तेथें जातो तों आंत कोणीं प्राणी आहे असें कळलें. डुकर किंवा कोणी हिंस्र प्राणी असावा म्हणून सर्व लोक बंदुका घेऊन तयार झाले व उपसतात तों बैल. मग त्यास वर काढला. पुढें तो अडीच तीन वर्षेंपर्यंत जिवंत होता—खालीं मनुष्य पडून वर विहीर कोसळून तीन चार पुरुष माती पडून आंतील मनुष्य दोन तीन दिवसांनीं जिवंत काढला अशा गोष्टी झालेल्या आहेत. यावरून असें दिसतें कीं, मनुष्यास हवेचेंच भक्षण जीव धरण्यास पुरतें.—पुढें लिहिलेल्या कांहीं चमत्कारिक गोष्टी "सायंटिफिक ओपिनियन" मध्यें लिहिल्या आहेत.

कांहीं लोक उरांतील धडधड, व फुप्फुसाचें फुगणें इत्यादि जीवित्वाचीं सर्व चिन्हें दूर करून पाहिजे तेव्हां मृत स्थितींत जाऊं शकतात अशी लोकांत प्रसिद्धी आहे. यांतीलच कर्नल टाउनसेंड हे एक असामी होते. हे मेल्याचें सोंग घेत तेव्हां ऊर धडधडण्याचा अगदीं बंद राही. श्वासोच्छ्वास चालू नसल्यामुळें उदर व जवळचे अवयव हीं मुळींच हालतनसत, आंगतर अगदीं बर्फा प्रमाणें थंड पडे व मेलेल्याचे डोळे जसे पांढरे होतात तसे यांचे ही होत. मनुष्य मेला किंवा नाहीं हें समजण्यासाठीं मरणाराच्या तोंडाजवळ स्वच्छ आरसा धरीत असतात. त्या योगानें जर या मनुष्यास यत्किंचितही जीव असेल तर त्याच्या श्वासांनीं तो आरसा दमसट होतो. असा आरसाही कर्नल साहेबांच्या तोंडाजवळ धरिला असतां त्यावर दंव किंचित् ही दिसत नसे. सारांश मृत मनुष्यांत आणि यांच्यांत अणुरेणु इतकाही भेद नसे. डाकतर चेन साहेबानीं या गोष्टीचा प्रत्यय घेतला आहे व तथील सर्व हकीकत त्यांणीं टांचून ठेविली आहे ती येणें प्रमाणें:—करनल टाउनसेंड साहेब याणीं मेल्याचें सोंग घेऊन दाखविण्याचा फार आग्रह धरल्यावरून त्यांच्या म्हणण्यास आम्हीं रुकार दिला. पूर्वीं आम्हीं त्यांची नाडी पाहिली तेव्हा ती जराशी मंद चालली होती तथापि तिचें ज्ञान हातास स्पष्ट होत होतें, व ऊर नेहमी प्रमाणें उडत होता. ते पाठीवर निजले व मन स्थीर करून कांहीं वेळ स्तब्ध राहिले. तेव्हां मी त्यांचा उजवा हात धरला होता व डाकतर बेनार्ड याणीं त्यांच्या छातीवर हात ठेवला होता व मि० स्क्राईन याणीं तोंडाजवळ आरसा धरला होता. मी हात धरला असतां नाडी हळूहळू मंद होऊं लागली व कांहीं वेळानें अगदी हातास लागेना. छातींतील धडधड अगदीं बंद झाली व श्वासोच्छ्वास समजण्याकरितां आरसा धरला होता त्यावर किंचित् ही दमसटपणा आला नाहीं. या शिवाय अंगांत मृदुत्व व उष्णता हीं तिळभरही नाहींशी झालीं. तेथें बसलेले डाकतर लोकांनीं या विषयीं कारणाची बरीच चर्चा करून शेवटीं असें ठरविलें कीं, याचा प्राण गेला व ते जाण्यास तयार होतात इतक्यांत सुमारें अर्ध कलाकानें पुन: नाडी पाहतां हळूहळू नाडी हातास लागूं लागली. श्वासोच्छ्वासनाचा क्रम सुरू झाला व हळूहळू बोलूं लागला. नंतर कांहीं वेळ त्याशीं संभाषण करून डाकतर लोक आश्चर्यभरित होत्साते मतिकुंठित होऊन तेथून चालते झाले—

(पुढें चालू) ज० मि०

## ARRIVAL OF SIR SALAR JUNG AT BOMBAY.

There was great stir at the Byculla Station a little before seven last night, on account of the arrival of Sir Salar Jung, K. C. S. I., from Hyderabad. An immense crowd had gathered, and a complete company of the 22nd Regiment N. I., with the regimental band and colours and under the command of a native officer, was drawn up outside the station to serve as a guard of honour. On the platform were a number of gentlemen who attended in an official or quasi official capacity. We noticed Brigadier General Stock, Mr. Gerald Fitzgerald, Mr. Arthur Crawford, Mr. W. Wedderburn, Major Hastings Fraser, Mr. F. Souter, Mr. T. C. Anstey, Mr. Venayek Wassodew, H. H. Aga-Khan's sons and secretary, and others of position, including a number of Parsee and Hindoo setts. The train arrived punctually, and as it entered the station the engine startled the bystanders with a salute of fog-signals, let off in rattling succession. Mr. Saunders, the Resident at Hyderabad, came with Sir Salar Jung, and introduced him to a number of the gentlemen present. After some civilities His Excellency was conducted to the place where the magnificent carriage and four sent for him by H. E. the Governor ought to have been, but where it wasn't: the Railway Company's salute had been too much for the spirited animals, who made off without the distinguished visitor they had been sent for, and very nearly came to grief. About a quarter an hour passed before Sir salar was able to mount, and the police, in the meantime, had enough to do to keep order in the crowed. Mr. Gerald Fitzgerald and Mr. Saunders drove off with the Minister, to the bungalow at Girgaum which had been prepared for his use. There was a large and motley crowd of people with Sir Salar, some of them no doubt men of rank at Hyderabad, and others armed menials. It was probably the first railway trip of most of them, as well as Salar Jung's first, and they seemed hardly to know what to make of themselves. It was interesting to see some of them scorning the commonplace mode of entering a gharry and stepping right over the closed door into their seats. But Sir Salar Jung himself seemed a model of refined intelligence. He is a man of slight built, rather under the middle stature, and with a singularly open, lively, intelligent countenance of a Hindoo rather than a Persian type. (We understand he is of Persian descent) Judging by appearance we should take him to be about thirty years of age. The extreme simplicity of his travelling dress was remarked by every one. We hear he is likely to spend five days or so in Bombay and then go to the Berars in order to be present, first, at the opening of the Khangaon railway, and afterwards at the opening of the Jubbulpore extension of the G. I. P. line.—*Bombay Gazette.*

---

THE Government of India has absolved itself from blame in the matter of the abolition of the State Scholarships by the publication of the following Resolution:—

"The scheme proposed by the Government of India for encouraging, by the grant of scholarships, natives of India to proceed to England for the completion of their education, received the general sanction of the Secretary of State for India in his despatch No. 19, dated the 23rd September 1868 It was at the same time stated, however, that the subject involved many collateral questions of importance, which remained for consideration.

"2. The Secretary of State for India, in a subsequent despatch, No. 3, dated 8th of April 1869, stated that the scheme had been originally devised with reference to those provisions of the law which reserve certain high offices for members of the Covenanted Civil Service alone, and which confine all appointments in that service to persons who have passed through competitive examinations held in England. The natives of India are consequently in a great measure excluded from the higher offices connected with the administration of their country. But it was pointed out by the Secretary of State that, since the adoption of the scheme of scholarships, a bill had been laid before Parliament which, if it received the sanction of the Legislature, would enable the Government of India to appoint natives to all or any of the offices now exclusively confined to the Covenanted Civil Service. Such an alteration of the law would, it was said change the whole conditions of the case. The Secretary of State, therefore, desired, and these instructions were repeated in a subsequent despatch, that the scheme of scholarships should be regarded as experimental, and that no more appointment should for the present be made.

"3. These orders have been already communicated to the local Governments and Administrations; but the Governor-General in Council is desirous that there should be no misunderstanding in regard the original scheme. There has been no change in the views of the Government of India or of Her Majesty's Government in regard to the justice and propriety of affording to deserving natives of this country greater facilities for obtaining advancement to posts of high honour and emolument; and it is the hope of His Excellency in Council that measures may before long be taken, which, while they meet the just expectations of the native community, will at the same time, tend to strengthen and improve our administration."

There is not much room to blame the Government of India after the perusal of the above. It is clear, as every body anticipated, that the scholarships did not fall a prey under the ruthless scythe of retrenchment. Their abolition is the special act of the Duke of Argyll and he must have the unenviable fame of the achievement. It really suffuses one's face to think of the specimen of British Statesmanship therein disclosed. What is the first excuse given for the abolition? It is that "*since the adoption of the scheme of scholarships a Bill had been laid before Parliament which if it received the sanction of the Legislature would enable the Government of India to appoint Natives to all or any of the offices now exclusively confined to the Covenanted Civil Service. Such an alteration of the law would, it is said, change the whole conditions of the case.*" Now everybody knows that that Bill was before Parliament *before* the adoption of scholarship scheme, and that it was adopted in *addition* to the provision in the Bill. Does the Duke of Argyll's reintroducing the Bill originally laid before Parliament by Sir Stafford Northcote, who had also sanctioned the scheme of scholarships, change the whole conditions of the case? But mark further: What is actually given in lieu of the scholarships? The splendid hope of the natives being appointed to covenanted appointments *if the Bill received the sanction of the Legislature*! No confidence is expressed that *it will be sacctioned by the Legislature.* We know how that body has dealt with it for the last two years and should not be surprised if the same dallying should go on to the end of time. Lastly comes the sweet "hope of His Excellency in Council that measures *may* before long be taken which will meet with the just expectations of the Native Community." So then, Natives are fed with "Ifs" and "Mays" while the substantial scholarships, sanctioned by all authorities from the Secretary of State himself, downwards, have been taken away! Is not a statue deserved for such eminent statesmanship?

---

## वऱ्हाड.

हैदराबादचे दिवाण व रसिडेंट या सरदारांच्या स्वारी १७वे तारखेस म्हणजे परवाचे दिवशीं सायंकाळचे सात वाजतां मुंबईस येऊन दाखल झाली. यांच्या सन्मानार्थ मुंबई सरकारानें एक पलटण सामोरी पाठविली होती. व स्टेशनावर त्यांस भेटण्याकरितां बहुत लोक गेले होते. त्यांत ब्रिग. जन. स्टाक, मि. जी फिटझरल्ड, मि. ए क्राफर्ड, मि. डब्ल्यू वेडरबर्न, मि. फ्रेझर, मि. सौंटर, मि. आन्स्टी, मि. विनायकराव वासुदेव, ना. अगाखान साहेबांचे चिरंजीव इत्यादि होते. मि. सांडर्स साहेब रेसिडेंट यांनीं दिवाण साहेबांच्या व या सर्व लोकांच्या भेटी करविल्या नंतर गवनर साहेबांनीं च्यार घोड्यांची सुंदर गाडी स्टेशनावर पाठविली होती तिजमध्यें दिवाण साहेब, मि. सांडर्स साहेब व मि. फिटझरल्ड साहेब बसून दिवाण साहेबांकरितां गिरगावांत एका पारशी गृहस्थाचा एक उत्तम सुशोभित केलेला बंगला राहण्यास योजिला आहे तेथें गेले. दिवाण साहेबांचें वय सुमारें ३५ वर्षांचें असावें. यांचा बांधा पातळ व मध्यम उंच आहे. व चेहरा पाणीदार आहे यांची ढब थोडीशी हिंदू सारखी दिसते. यांचा बाटेचा पोशाग अगदीं साधा होता. बरोबर हैदराबाद दरबारचे कित्येक थोर लोक आहेत व स्वतांचा लवाजमा आणि हत्यारबंद लोकही पुष्कळ मा-

हेत. दिवाण साहेबांनीं आजपर्यंत आगगाडी कधींच पाहिली नव्हती व रेलवे कंपनीनें त्यांची उत्तम टापटीप ठेविली होती त्यावरून ते फार खुशी झाले असतील. या दिवाण साहेबांच्या आदरार्थ १७ तोफांची व रेसिडेंट साहेबांच्या आदरार्थ १३ तोफांची सलामी होण्याचा ठराव आहे. मुंबईस यांचे ९ मुक्काम होणार नंतर वऱ्हाडांत येतील. वाटेंत औरंगाबादेस त्यांचे बंधूचें कबरस्तान आहे म्हणून तिकडेही ते जाऊन येतील अशी बोलवा आहे. या स्वारीखर्चाकरितां दिवाण साहेबांनीं दहा लक्ष रूपये खर्च करण्याचा संकल्प केला आहे असें म्हणतात.

---

मि. डब्ल्यू ई अशबर्नर वऱ्हाडपैमाषीकडील असिस्टंट सुपरिंटेंडेंट यांस विलायतेस जाण्याकरितां सिक सर्टिफिकिटावरून १८ महिन्यांची रजा मिळाली.

मि. डब्ल्यू टर्नबुल यास मि. डिस्नींचे जागेवर पैमाष असि. सुपरिं. नेमिलें.

सन १८६७चे १९वे आकटाचे ९ वे कलमाप्रमाणें रेसिडेंट साहेबांनीं असा ठराव केला आहे कीं जिल्ह्या जिल्ह्याचे पोलिस सुपरिंटेंडेंट हे त्यांत जितक्या मुनसिपल कमिट्या असतील तितक्यांचे एक्स आफिशिओ (हुद्याचे नात्यानें) मेंबर आहेत असें समजावें.

मि० हणमंत खंडेराव बाळापुरचे तहशिलदार यांस ते लागू करून घेतोल त्या दिवसापासून येक महिन्याची हक्काची रजा दिली आहे.

मि. एच. सी. फौलर यांस मि बास्वेलचे जागीं हैदराबादेस एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर नेमिलें व त्यांनीं २९ वे तारखेस त्या कामाचा च्यार्ज घेतला. ही नेमणूक हिंदुस्थान सरकारांतुन मंजुर व्हावयाची आहे.

फर्स्ट क्लास आस्पिटल असिस्टंट सादुला खान यांस अंजनगावचे धर्मार्थ दवाखान्यावर नेमिलें.

सब असिस्टंट सर्जन जे व्हाइटल तारीख २४ जानेवारी रोजीं वाशिमास आपले सिविल आस्पिटलचे कामावर जाऊन रुजू झाले.

वाशिमचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर व तहशीलदार यांस सन १८६७ चे १९ वे आकटाचे ९ वे कलमाप्रमाणें एक्स आफिशिओ (हुद्याचे नात्यानें) मेंबर नेमिलें.

मि. आत्माराम भिकाजी एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस सन १८६६ चे २० वे आकटाचे ८ वे कलमाप्रमाणें उमरावतीचे सब रजिस्टर नेमिले व मि० बापुजी रंगनाथ एकस्ट्रा असि० कमि० यांस कारंजास सब रजिस्टर नेमिले.

मि० डी. ए. मार्टिन तिसरे प्रतीचे सब इंजिनियर यांचा तो हुद्दा कमी करून त्यांस पहिले प्रतीचे सुपर वाइझर केलें व खामगाव रेलवेकडून काढून पश्चिम वऱ्हाडाकडे दिले.

मि. एच. डबल्यु बोयेन बुलढाण्याचे पोलिस सुपरइंटेंडेंट आपले कामावर रुजू झाले.

मुंबईचे नेटिव ओपिनियन पत्रांत लिहिलें आहे कीं हैदराबाद सरकारानीं कर्जाबद्दल जे प्रांत इंग्रज सरकाराकडे लावून दिले आहेत त्या प्रांतांतील इंग्रज सरकारचे सर्व नौकरांस पगार निझामाचे खजिन्यांतून मिळत असून इनकमट्याक्सा बद्दलचें उत्पन्न इंग्रज सरकार घेतें हा केवढा चमत्कार!

खामगावास प्रस्तुत पोलिसचे लोक जिल्ह्या जिल्ह्यांतून जात आहेत. इलिचपूर जिल्ह्यांतून १ इन्स्पेक्टर १ चीफ कान्स्टेबल ३ हेड कान्स्टेबल आणि २० कान्स्टेबल वणी. जिल्ह्यांतून १ चीफ कान्स्टेबल ३ हेड कान्स्टेबल आणि २९ कान्स्टेबल. बुलढाणें जिल्ह्यांतून ३ हेड कान्स्टेबल आणि २० कान्स्टेबल इतके लोक आले आहेत आणि इलिचपुराहून फोर्थ इनफंट्रींतील च्यार कंपनी दोन तीन दिवसांनीं येणार आहेतच. अवरंगाबादेहून तोफा व इंगोलीकडून कांहीं स्वारही येणार आहेत.

---

## अकोला.

मे. हार्डन साहेब डिपुटी कमीशनर व मे. दस्तुर बहिमनजी साहेब असिष्टन कमीशनर मुंबईस गेले होते ते परत आले. कमीशनर साहेबांचे क्लार्क रा. रा. विष्णु सदाशिव मुंबईस गेले आहेत असें ऐकतो. एथें सडकांची दुरुस्ती, घरांची स्वच्छता, व तंबूकरिता जागा तयार करणें वगैरेची गर्दी होऊन राहिली आहे. पुलाचे कामास पुन्हा आरंभ झाला. काम बरेंच चाललें आहे पण याहून अधिक त्वरा व मनुष्यांची पुष्कळ मदत पाहिजे आहे म्हणजे कदाचित पुढील बरसातीचे आंतही पुलाचें काम होईल असें म्हणतात.

सन १८६० चे ९ वे आकटाप्रमाणें रेसिडेंट साहेबांनीं असें ठरविलें आहे कीं अकोल्यास ज्या ज्या वेळीं जो असिस्टंट कमिशनर असेल त्यास त्या आकटाप्रमाणें खटले येतलि त्यांचे फैसल करण्याचा अधिकार दिला आहे.

---

मागाहून आलल्या जाहिराती.

## जाहिरनामा.

तमाम लोकांस दण्यांत येतो कीं अकोलें जिल्ह्यापैकीं खालीं लिहिलेले सन १८७०। ७१ सालाबद्दल मक्ते तारीख २७ जानेवारी सन १८७० रोजीं हरास करण्यांत आले असून ज्या लोकांनीं ते लिलावांत घेतले त्या लोकांनीं लिलांवाच्या शर्तीप्रमाणें पेशगी म्हणजे चौथाईचा ऐवज मुदतशीर आणून न दिल्याकारणानें मक्ते मामुलप्रमाणें पुन: लिलांव करण्यांत येत आहेत. हा लिलांव ता० १० माहे मार्च सन १८७० रोजीं गुरुवारीं दहा वाजतां डिपुटी कामिशनर जिल्हा अकोलें यांचे कचेरींत सुरूहोईल. सबब हा मक्ता घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांणीं नेमले ठिकाणीं नेमले तारखेस हजर व्हावें, याबाबदींत जास्त माहिती पाहिजे असेल ती खालीं सही करणार यांचे आफिसांत मिळेल. लिलांव होण्याचे मक्ते.

१. तालुक बाळापुर सबंध कलालीचा.
१. " जळगांव.
१. विषयुक्त सबंध तालुक्याचा.
१. अफू गांज्या प्रगणे जळगांव व प्रगणे जामोद.

---

येणें प्रमाणें मक्त्याचा फेरलिलाव होणार आहे. तारीख १७ फेब्रुवारी सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

माधवराव हरी
शिरस्तेदार.

J. FITZGERALD
Officiating Deputy Commissioner
Akola District.

## नोटिस.

धोंडोबापुजी मिताळ मिशन स्कुलमास्तर उमरावती सदर बाजार यांस खालीं सही करणार याजकडून. तुमचे कडून तारिख १७ जानेवारीचे सत्यप्रकाशांत तारिख ११ ची नोटिस दिल्ही ती काल रोजीं पावली. तिचें उत्तर. आपण डोणगाव मुकामीं नोटिस देण्याचे पूर्वी आले होते त्या वेळीं आपण विच्यारल्या वरून तुमचे रुपये राव साहेब नारायण वामन डे० ए० इन्स्पेक्टर जिल्हा बुलढाणें यांचे हुकमावरून कजवे मजकूरचे पाटील पांडे याजजवळ देऊन पावती घेतली आहे असें सांगितलें असून विनाकारण नोटिस दिल्ही तरी ही नोस मंजूर नाहीं व या नोटिसीचा खर्च ८ दिवसांत आपण पाठवून देणें. नाहींतर रिती प्रमाणें तजविज करण्यांत येईल. कळावें तारीख १४ फेब्रुआरि सन १८७०

(सही) विश्वनाथ नारायण अ० मास्तर डोणगाव.

---

## वर्तमानसार.

**रसियाचें**—मुलखांतलि वर्तमान पत्रावरून कळून येते कीं रसिया सरकार पावलावर पाऊल चढवीत पुढें येत आहे. व अटोकाट लष्कराची तयारी चालली आहे. व दारू गोळा वगैरेंची इतकी बेहद तयारी चालली आहे कीं अशी तयारी आजपावेतों कधींही झाली नव्हती. आमच्या विलायत सरकारच्या तर मनांत पूर्णत्वें वागलें असेल कीं रसिया सरकार कोठेंही तयारी करो आणि आपल्या समागमें मित्राचारी कशींही राखो. परंतु मोठ्याच लढाईचा कांहीं तरी घाट चालला आहे खरा.

**चमत्कार**—मौजे अधोसी तालुके आलीबाग येथें एका पाटलाची मुलगी प्रात:काळीं मयत झाली, नंतर चाली प्रमाणें तिला स्मशानांत नेऊन अग्निप्रवेश केला, तों त्या मुलीचा हात हालू लागला त्यावरून बरोबर गेलेले लोकांनीं जलदी करून तावडतोब त्या मुलीस अग्नींतून बाहेर काढिली पुढें. कांहीं वेळानें ती जिवंत आहे. असें त्या लोकांस पक्कें भासल्यावरून त्याणीं तिला गांवचे देवळांत आणून ठेविली. कण्हेरी वगैरे खावयास घातलेली त्या मुलीनें खाल्ली. या प्रमाणें प्रकार घडून दिवसाचे चार प्रहर पर्यंत ती मुलगी जिवंत होती. नंतर रात्रीं पुन्हा: ती मयत झाली असें आमचे एका मित्राच्या लिहिण्यावरून कळतें. कायहो आश्चर्यहें!!! स. स.

आरबांतील एक चमत्कारीक चाल—आरबांतील एकादा विधवेस जेव्हां लग्न करावयाचें असतें तेव्हां लग्नहोण्याच्या पूर्व रात्रीं ती आपल्या प्रथमच्या नवऱ्याच्या थडग्यापाशीं जाते. आणि त्या मृत नवऱ्याची आपण दुसरें लग्न केल्यामुळें न रागावण्याविषयीं व मत्सर न करण्याविषयीं प्रार्थना करितों मग अशी प्रार्थना केल्यावरही कदाचित त्यास राग येईल म्हणून तेथें जातेवेळीं दोन गाढवांवरून पाण्याच्या मोटा नेलेल्या असतात तें पाणी त्या थडग्यावर थोडें थोडें ओततें कीं त्यास राग आला असतां त्याणें थंड व्हावें.

विलायतेंत मिस्तर म्याकी नांवाच्या उद्योगी पुरुषानें टैप जुळणें व जिकडील तिकडे ठेवणें याचें एक नवीन यंत्र तयार केलें आहे. याच मासल्याचें कांहीं दिवसांमागें तेथील एक्झिबिशनांत असलीं अक्षरें जुळण्याचें, आणि ज्या घरांतील अक्षरें घेतलीं असतील तेथें जागच्या जागीं ठेवण्याचें यंत्र नमुन्याकरितां तयार केलेलें दाखविं, परंतु हल्लीं म्याकी साहेबानें जें बनविलें आहे त्यांत पायांचे आणि हाताचें काम पडतें, आणि १० कंपाझिटरांचें काम एका यंत्रानें होतें व त्यास तें काम करण्यास कांहीं दिवस पूर्वी शिकलें पाहिजे.

आफ्रिका खंडाचे शोधक पुरुष डा. लिविंगस्टन साहेब यांस ठार मारल्याची व पुन्हां जिवंत असल्याची बातमी आली आहे.

मुंबईच चवथे स्मालकाज जज्ज रा. बा. भास्कर दामोदर व पुण्याचे आणि नाशिकचे फर्स्ट ग्रेड सबार्डिनेट जज्ज (प्रिन्सिपलसदर अमीन) रा. रा. मदनश्रीकृष्ण आणि विष्णु मोरेश्वर हे गेल्या सपटंबर महिन्यापासून त्या त्या जाग्यावर मुकरर० झाले

**हैदराबाद**—निजामसरकारानें सरकारी ग्याझेट छापण्याची सुरुवात केली आहे त्यांतील कांहीं भागांचे तरजुम्यासहित रेसिडेंट साहेबांनीं हिंदु० सरकारास रिपोर्ट केला. हिं० सरकारानें आपणास ती व्यावस्था पसंद झाली असें रेसिडेंट मार्फत सरसालरजंग बाहादुर व अमीर अकबर बाहादुर यांस कळविलें व आपले ग्याझेटांत ते मजकूर दाखल केले.

युरोपियन लोकांच्या देवालयांस सरकार लाखों रुपये देतें व त्यांवरील धर्माध्यक्षांस हजारों रुपये पगार देतें हें गैर आहे. कोणत्याही धर्मास सरकारानें मदत करावची नाहीं तर ख्रिती धर्मास तरी कां? असा नेटिव वर्तमानपत्रांतून आलीकडे वूट निघाला होता त्याविषयीं हिंदुस्थान सरकार विच्यार करीत आहेत व इतर सरकारचीं आणि धर्माध्यक्षांचीं खर्च कमी करण्याचे बाबदींत त्यांनीं मते मागितलीं आहेत असें कळतें.

हावर्ड साहेबानीं केलेलीं इंग्लिश पहिलीं दुसरीं, तिसरीं, पुस्तकें यांत कांहीं फेरफार करण्याचे विच्याराकरितां नवीन डायरेक्टर मे० पील साहेब यांनीं एक कमीटी नेमिली आहे.

मि. महमद वजीर अहमद वायव्य प्रांताकडील एक डिपुटी कलेकटर यांनीं मुसलमानलोकांच्या गृहस्थितीवर एक निबंध लिहिला त्याकरितां तिकडील ले. गवरनर साहेबांनीं त्यांस एक हजार रुपये सरकारांतून बक्षिस दिले. व आपले खासगीतून एक घडयाळ दिलें.

रेवरेंड डाकटर उइलसन साहेब जे सुमारें ४२वर्षें हिंदुस्थानांत होते ते आज रोजीं मुंबईहून आपले स्वदेशीं जात आहेत. यांच्या जाण्यानें मुंबईची एक शोभा गेली असें होईल.

मुंबईचे सर रिचर्ड कोच साहेब यांस कलकत्ता हायकोर्टाचे चीफ जस्टीस नेमिलें.

मिस मेरी कार्पेंटरबाई २१ वे तारखेस मुंबईस गिरगावांत मुरारजी गोकुळदासचे बंगल्यांत आपण स्वतां चालविण्याची मुलीची शाळा सुरू करणार आहे.

संयोगजन्य रोगाचे प्रतिबंधार्थं मुंबईस तीनतीनशे रुपये पगाराचे दहा असिस्टंट सुपरइंटेंडंट नेमणार आहेत.

# जाहिराती.

## NOTICE.

SIR H. B. E. FRERE'S SPEECHES AND ADDRESSES.

The undersigned begs respectfully to announce that he has in the press a work containing all the Speeches and Addresses delivered by Sir Bartle Frere G. C. S. I. K. C. B. during the time he was Governor of this Presidency.

The work is classified under the following heads;—

(1) Political Addresses.
(2) Legislative. ,,
(3) Educational. ,,
(4) Miscellaneous Speeches delivered on memorable public occasions.
(5) Appendices, containing letters written on public occasions, and addresses presented to Sir Bartle Frere on his retirement from India and his replies thereto.

The size of the book is royal octavo, is containing about 500 pages, and the binding will be of a good character. The frontisprese will contain Sir Bartle's portrait. Gentlemen desirous of subscribing for this publication, will be pleased to signify their wishes to Mr. Keshewrao Narayen Kolutkar care of Berar Sumachar.

The price of the Book will be Rupees Five per Copy, payable in advance, exclusive of postage.

The Compiler trusts that he will receive liberal patronage and support from the public in his present undertaking.

*BALKRISHNA NILAJI*
*Asst. Supt., Revenue Department,*
*Secretariat, Bombay.*

*Bombay*
*7th February* 1870.

## नोटिस.

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येतें कीं, बुलढाणे जिल्ह्याचे अपकारीचा लिलांव तारीख २४ माहे फब्रुवारी सन १८७० इसवी रोजीं होण्याविषयीं सर्वत्र ठिकाणीं प्रसिद्ध झाली होती परंतु हल्लीं तो दिवस रहित करून तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८७० रोज मंगळवार इसवी रोजीं सन १८७०।७१ इसवी साचाबद्दल सालाबाद प्रमाणें केला जाईल बाकीचे नियम मागीलप्रमाणेंच समजले पाहिजेत कळावें. तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी मुक्काम बुलढाणें.

दामोदर सदाशीव हुजूर कारकून.
रामकृष्ण महिपत जुडिशल
शिरस्तेदार.

J. ALLARDICE
Deputy Commissioner B. District
देपुटी कमिशनर.

---

नोटिस—रा. गणेश नारायण कोल्हटकर महाराष्ट्र मित्र कर्ते मुक्काम सातारा यांस—नोटिस देण्यांत येते कीं माझे पगाराचे रुपये ९२ तुम्हाकडे राहिले आहेत ते नोटिस पावल्यापासून ८ दिवसांत ह्या नोटिशीच्या खर्चासहीत न दिल्यास कायद्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. तारीख १९ फेब्रुवारी सन १८७०

( सही ) देवीबल्लद मेहेरवान पुर्भई.

---

नोटिस—खालीं सही करणार याजकडु. भिवसेन वल्लद किसनसा कलाल मौजे सस्ती हालीं वस्ती वाडेगाव तालूकें बाळापूर यास तूं अठ्ठेचाळीस रुपयांवर तेरा महिने शतीचे कामी नोकर राहून रोख अठेचाळीस रुपये घेऊन वर लिहिलेले महिने नोकरीकरीन वगैरे मजकुराचा मिती वैशाख वद्य प्रतीपदा सन १२७८ फसली रोजीं आम्हांस दस्तऐवज लिहुन दिला आहे त्यांत लिहिल्या प्रमाणे साहा महिने अकरा दिवस नोकरी करून पुन्हा नोकरीवर न येतां घरीं राहिलास, तुजकडे तेरा महिन्या पैकीं नोकरी भरून घेण्याचे जे दिवस राहिले त्याबद्दल व सेतीच्या उपयोगाचा सामान आणि तुरीचीडाळ मिळुन हिशेब करूनपाहातां बेचाळीस रुपये पांचआणें दोन पै होतात तर ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसाचे आंत मदरहू बद्दल निकाल करावा न केल्यास कोर्टांत फिर्याद करून नोटिसिच्या खर्चा सुद्धां भरून घेईन कळावें तारिख १२ माहे फेब्रुवारी सन १८७० इसवी

( सही ) अनंत येशवंत उनाळे राहाणार पातुर शेखबाबु तालुक अकोलें

---

नोटिस—चिमणाजी वल्लद जानजी पाटील राहणार मौजे धनगरपिंपरी तालुके बाळापुर यांस देण्यांत येते कीं तुम्ही देऊळगावसाकरशा येथील श्रीराम शाळीग्राम या दुकानचे मुदल रुपये एकशें एक्याशी १८१ व शिवाय व्याज आणि ज्वारी साडेसत्रामण ॥१२॥ देणें आहात तरी ही नोटिस पोंचल्यापासून ८ दिवसांचे आंत उलगडा करावा नाहीं पक्षां दिवाणी कोर्टमार्फत खर्च सुद्धां वसूल करून घेण्यांत येईल. कळावें तारीख ५ फेब्रुवारी सन १८७०.

( सही ) श्रीराम शाळिग्राम द. खु.

---

नोटिसः—जानजी वल्लद गोंडाजी चवंडकर राहणार दुर्गबोरी हाल्लीं मुकाम चोंडी परगणे पातुर तालुके आकोलें यांस नोटीस देण्यांत येते कीं तुम्हीं देउळगाव साकरशा येथील श्रीराम शाळीग्राम दुकानचे मूद्दल रुपये ३९ एकोणचाळीस बः हुकुम रोखा तारिख २१ आगस्ट सन १८६७ चा शिवाय दुहोत्रचा प्रमाणें व्याज आणि ग्यातेचाकी रु० दोन २ देणे आहात तरी ही नोटिस पोचल्या पासून आठ दिवसाचे आंत उलगडा करावा नाहीं पक्षां दिवाणी कोर्ट मार्फत वसूल करून घेण्यांत येईल कळावें तारिख ९ फेब्रूआरी सन १८७० इसवी.

( सही ) श्रीराम शाळीग्राम द. खु.

---

## विकावयाचीं पुस्तकें.

कायद्या संबंधीं.

| | रु० आ. पै. |
|---|---|
| पिनलकोड १८६०चा ४५ | २—०—० |
| नादारीची रूळ … | ….०—६—० |
| पोलिसाच्या रुळी …. | ….०—३—० |
| मुं. इला. मुलकी सर्कुलरें | ….४—०—० |
| जाइंट रुळ…. …. | ….०—२—० |
| स्माल. को. आक्ट १८६५चा १ | ०—४—० |
| पैमाषीचा आक्ट १८६५चा १ | ०—४—० |
| फौजदारी गुन्ह्यांची जंत्री …. | ०—३—० |

पोथ्या वगैरे.

| | |
|---|---|
| अध्यात्मरामायण …. …. | ४—०—० |
| व्रत कौमुदी …. …. | ०—१२—० |
| प्रायश्चित्तेंदुशेखर …. …. | ०—१२—० |
| नृसिंहचंपू …. …. | ०—४—० |
| धर्मसिंधू … …. | ३—४—० |
| धनंजय विजय काव्य …. | ०—४—० |
| अमरकोश सटिप्पण …. | १—९—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा…. | ०—२—० |
| अनुस्मृती. …. …. | ०—३—० |
| भीष्मस्तवराज. . …. | ०—२—० |
| अपरोक्षानुभूती. . …. | ०—३—० |
| संस्कृत आरत्या. . .. …. | ०—२—० |
| प्राकृत आरत्या …. …. | ०—१—० |
| पंचरत्नीगीता सोवळ्याचे बांधणीची. | १—४—० |
| रूपावळी. …. | ०—२—० |
| समासचक्र. …. | ०—२—० |
| शिवकवच. …. | ०—२—० |
| पांडुरंग महात्म. …. | ०—८—० |
| चमत्कार चिंतामणी. …. | ०—१३—० |
| बभ्रुवाहन आख्यान. …. | ०—३—० |
| गोत्र मालिका. …. | ०—४—० |
| काशिप्रकाश. …. | ०—१२—० |
| गायन प्रकाश. . | ०—४—० |
| सौभाग्य रत्न. . | ०—३—० |
| सामुद्रिक लक्षण. …. | ०—८—० |
| हिंदुस्थानी एकादश स्कंध | १—०—० |
| शिवलिलामृतें उत्तम. …. | १—१०—० |
| ,, दुसरी. …. | १—४—० |
| संतलीलामृत. …. | २—८—० |
| विवेक सिंधू. …. | ०—८—० |
| दासबोध. . . …. | ५—०—० |
| चतुश्लोकी भागवत. …. | ०—४—० |
| कर्मविपाक. …. …. | ०—४—० |
| परमामृत. …. | ०—४—० |
| व्यंकटेश स्तोत्र. …. | ०—१—० |
| पंचायतन नामावली. …. | ०—३—० |
| शिवसहस्त्र नामावली. …. | ०—३—० |
| ध्रुवचरित्र. …. …. | ०—१—० |
| भजन. . . … | ०—१—० |
| चक्रव्यूह. . . … | ०—१—० |
| रत्नमाला भास्कर दामोदर कृत | ०—६—० |
| सत्यनारायण व्रत कथा प्राकृत | ०—४—० |
| भुपाळ्या. … | ०—१—० |
| धावे. …. | ०—१—० |
| हरिपाठ. . . …. | ०—१—० |
| अमृतरावाचे कटाव शुकरंभा चरित्र | ०—४—० |
| नलाख्यान. . … | ०—३—० |
| आर्या मोरोपंती उद्योग पर्व. | १—८—० |
| ,, ,, वनपर्व. | १—८—० |
| ,, ,, द्रोणपर्व. …. | २—०—० |
| ,, ,, मंत्ररामायण. | १—८—० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला. | ०—१२—० |
| सदहू भाग दुसरा. . . | ०—१२—० |

वाचन संबंधीं.

| | |
|---|---|
| हिंदुस्थानी वेताळ पंचविशी. | १—०—० |
| ,, सिंहासन बत्तिशी. | १—०—० |
| मराठी वेताळ पंचविशी. …. | ०—८—० |
| सुरस व रागदारीच्या लावण्या. | १—४—० |
| चमत्कारिक गोष्टी. … | ०—८—० |
| बहारदानीष भाग १ …. | ०—८—० |
| ,, भाग २. …. | ०—८—० |
| रुक्मिणी हरण नाटक. …. | १—८—० |
| हरिश्चंद्र नाटक. . …. | १—०—० |
| विराटपर्व नाटक. . …. | १—०—० |
| विक्रमोर्वशी नाटक (संकृत ) | ०—८—० |
| वालीवध नाटक. . …. | ०—६—० |
| आगगाडीचें नाटक. …. | ०—५—० |
| इंग्रजांची बखर. .. …. | ०—६—० |
| वसंतमाला. . . …. | १—४—० |
| सर्वोपरिज्ञान. . . …. | ३—०—० |

मुलांकरितां पुस्तकें.

| | |
|---|---|
| बालज्ञान. …. | ०—२—० |
| इंग्रजी पहिलें पुस्तक उच्चार व अर्थ सहीत. …. | ०—३—० |
| भुगोलविद्या. …. | ०—२—० |
| बालव्याकरण. …. | ०—०—९ |
| अंक लिपी …. | ०—१—६ |
| अंकगणित प्रश्नसमुदाय. …. | ०—५—० |
| तोंडचे हिशेबाचीं पुस्तकें …. | ०—१—६ |
| कित्ता मोडीचा. …. | ०—०—६ |
| " बाळबोध. …. | ०—०—३ |

☞ हीं पुस्तकें रोख किमतीस वऱ्हाड समाचार छापखान्यांत विकत मिळतील. बाहेरगांवचे नेणारांस डाकहाशील शिवाय पडेल.

---

| किमतीचे दराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास·· ···६ | | ० |
| साल अखेर ··· ··· ···७ | | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ··· ···३ | | ८ |
| एक अंकास ··· ··· | | ५ |
| फुटकळ ··· ··· ···० | | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व साल अखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होऊन तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत··· ··· ··· १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०।६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०।४
एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

**वऱ्हाडसमाचाराचे मालक.**

---

**वऱ्हाडसमाचार** वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धा आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

**वऱ्हाडसमाचाराचे मालक**

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

## THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. V, AKOLA :—SATURDAY EVENING, FEBRUARY 26, 1870 NO.9

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २६ माहे फेब्रुएरी सन १८७० इ० अंक९


## वाशिम जिल्ह्याविषयीं.

वऱ्हाडांत आलिकडे वाशिम हा नवीन जिल्हा झाला आहे त्यांतील माहिती लोकांस कळविण्याकरितां बहुत असल्यावरून आह्मी ती आपले पत्रीं संक्षपानें लिहिण्याची योजना केली आहे.

मोगलाईपासून वाशिम परगणा मेहकर सरकाराखालीं होता व पुढें इंग्लिश अंमल झाल्यावरही मेहकर जिल्ह्याखालीं तो एक तालुका होता. नंतर सन १८६८ सालीं वणी जिल्ह्यांतून पुसद तालुका इकडे जोडून वाशिम हा स्वतंत्र जिल्हा केला. याचें क्षेत्रफळ १८३२ चौरसमैल आहे. व लोकसंख्या पावणेतीन लक्ष आहे. याखालीं वाशिम व पुसद असे दोनच तालुके आहेत व जिल्ह्याची एकंदर जमाबंदी ३०२४१९ रुपये आहे.

वाशिम हा गाव अकोल्यापासून दक्षिणेस २९ कोसांवर आहे. सुमारें १२ कोसावर पातुराचे पुढें मेडशीचा घाट चढून जावा लागतो. चढण थोडी आहे व सडक चांगली आहे त्यामुळें वाहनांवरून उतरावें लागत नाहीं. घाटाचे वरील मुलखास ह्मणजे वाशिमाकडील प्रांतास वऱ्हाड ह्मणण्याचा जुना परिपाठ नाहीं. तिकडील लोक घाटाखालील भागास मात्र वऱ्हाड ह्मणतात. व वाशिमाकडे आजूनही तसें बोलण्याचा पाठ आहे. तात्पर्य सांगण्याचें हें कीं हवा, पाणी, देखावा, लोकरहाटी इत्यादिकांवरून स्वाभाविकच हे दोन वेगवेगळे देश दिसतात.

वाशिमाचे दक्षिण हद्दीवर च्यार कोसांवर निजाम सरकारचा मुलुख आहे. व हिंगोली, नांदेड, नरशी वगैरे त्यांपैकीं मोठाले गाव आहेत. हिंगोलीस इंग्रज सरकारचे सैन्याचा मोठा तळ आहे. वाशिमाकडे सर्व जिल्हाभर डोंगर आहेत. व त्यामुळें रस्ते वाईट आहेत, हवा पुण्यासारखी आहे. बहुधा खानदेश व वाशिम एकाच अक्षांशावर आहेत परंतु खानदेशांत सपाटी फार त्यामुळें उष्णता अधिक आहे व इकडे डोंगर आणि झाडी फार यामुळें थंडावा अधिक आहे.

वाशिम हा गांव बराच मोठा आहे पण त्यास पूर्वीचा तजेला नाहीं व मोठी गढबड नाहीं त्यामुळें सर्वत्र सामसूम दिसतें. तरी ब्राम्हण वस्ती मोठी आहे. व त्यांचें राहणें निर्मळ आहे व त्यांच्या स्त्रिया अकोला, उमरावती वगैरे जिल्ह्यांतील वऱ्हाडी स्त्रियांप्रमाणें ओंगळ दिसत नाहींत. वाशिमास अमराई पुष्कळ आहे, दोन तीन तळीं आहेत, पाणी पाचक चांगलें आहे. व हवा मोठी सुखकारक आहे. ~~आणि आतां तर तेथें जिल्हा ची जागा झाली आहे व स्वा. मंकजी साहेबासारखे उद्योगी सरदार त्याच्या सुधारणेकडे फार लक्ष देताहेत; तेव्हां तें लवकरच अधिक चांगलें होईल यांत संशय नाहीं. तेथें नवीन कायद्याप्रमाणें~~ मुनसिपालकमिटी ~~स्थापन झाली~~ आहे व ~~त्यांनी~~ सडकांचे वगैरे बेतबात ~~त्यांनी केले~~ आहेत. ~~तें लवकरच अमलांत येतील. हिंगोलीचे कित्येक व्यापाऱ्यांसही वाशिमास दुकानांकरितां जागा देण्याचा विचार आहे.~~ वाशिमास सरकारी कचेरी फार सुंदर बांधली आहे. तिला अजमासें ६०००० रुपये खर्च लागला असावा.

वाशिम जिल्ह्यांतील कित्येक खुणांवरून व पुराणांवरून असें दिसतें कीं जुन्या काळीं ही मोठी पवित्र भूमी होती. व बहुत ऋषी वगैरे त्या लगत्यास रहात होते. ~~त्याचे ऋषींची कित्येक ठिकाणांची माहिती आह्मांस मिळालेली आहे व ती आम्ही आपल्या प्रिय वाचकांस पुढें देऊं. वाशिमाविषयीं मात्र एथें थोडें सांगतों.~~

पद्मपुराणामध्यें वत्सगुल्ममहात्म्य म्हणून एक प्रकरण आहे तें सर्व वाशिमाविषयीं आहे. संस्कृत ग्रंथ बराच मोठा आहे त्याचे अध्याय चाळिसांहून अधिक असून श्लोकसंख्याही दहा बारा हजार आहे. त्यावरून असें दिसतें कीं वत्सगुल्म शब्दाचा अपभ्रंश होऊन वाशिम हें नांव झालें. हें वत्सऋषीचें तपोवन होय. असें म्हणतात कीं, या ऋषीनें बहुतकालमर्यादा तपश्चर्या केली ती इतकी कीं त्याचे अंगावर गुल्म म्हणजे वारूळें वाढलीं. तेव्हां तेहतीस कोटि देव शिवास शरण गेले. मग शिव येऊन त्यांनीं वत्सऋषीची स्थिति पाहिली तों त्यांस करुणाश्रु आले. त्याची विहीर झाली. व तेथून दोन कोसांवर तें उदक फुटून काटे या नावाच्या गावाजवळ त्याची नदी वाहूं लागली व तिला काटेकरुणा असें नांव आहे. तसेंच वत्सऋषीच्या आश्रमाचे जागीं हल्लीं करुणेश्वर नामें शिवाचें देवालय आहे. पद्मतीर्थ म्हणून ज्या तळ्यास हल्लीं म्हणतात, व जें बांधून सुमारें ४०० वर्षें झाल्याचें सांगतात, तेथील पाण्यानें कर्नाटकचा राजा वासुकी याचें कुष्ठ गेलें. तेव्हां जवळच वशिष्ठऋषीचा आश्रम होता तेथें जाऊन राजानें त्यास विचारितां त्यानें वत्सगुल्म पंचक्रोशीचें हें महात्म्य होय असें सांगितलें अशी पद्मपुराणांत कथा आहे.

~~वाशिम जिल्ह्यांत आणखींही कांहीं तपःस्थानें आहेत व अनार्शींग, रिसोड, अस्रा, मांमवाडे, मांडवे, शिरपुर, मंगरूळपीर इत्यादिकांविषयीं पुरातन गोष्टी समजल्या आहेत त्या पुढें लिहूं.~~

वाशिमांतील मुख्य व पाहण्याचें पहिलें स्थान श्री बालाजीचें देवालय, त्याविषयीं आह्मांस थोडें विस्तृत सांगावयाचें आहे. ~~ह्मणून तें पुढील अंकावर ठेवितों.~~

## पातुरची यात्रा.

या जिल्ह्यांत पातुर नावाचीं दोन तीन गावें आहेत त्यांतून जेथें यात्रा भरते त्या पातुरास पातुरशेखबाबू किंवा नानासाहेबांचें पातुर असें म्हणतात. शेखबाबूचा दर्गा आहे त्याची गोष्ट पाच सहाशें वर्षांपूर्वींची सांगतात कीं एका ब्राम्हण बाबूनें शेख जातीच्या बादशहास कांहीं अद्भुत चमत्कार दाखविला; त्या संबंधानें त्या दोघांचें नाव शेखबाबू असें त्या संस्थानास पडलें अशी दंतकथा आमचे कानावर आहे परंतु आम्ही कांहीं इतिहास मिळवित आहों तो मिळाल्यावर वाचकांस कळवूं. शेखबाबूचा मोठा उरूस भरत असतो व पुष्कळ लोक त्या समयास जमतात. नुकताच दोन महिन्यांपूर्वीं हा उरूस झाला. सरकारांतून या दर्ग्यास बरेंच उत्पन्न आहे.

दुसरें नाव नानासाहेबांचें पातुर असें पडलें आहे तें, नाना साहेब म्हणून कोणी साधू तेथें होऊन गेले त्यावरून पडलें आहे व हल्लीं जी तेथें वर्षास यात्रा भरते ती त्या साधूचे पुण्यतिथीचे उत्साहनिमित्तानेंच भरते. सुमारें सवाशें वर्षांपूर्वीं नाना नावाचा कोणी सराफ उमरावतीचे लगत्यास कोठें यात्रेस जात असे. तिकडे त्यास कांहीं साक्षात्कार होऊन कांहीं वर्षांनंतर त्याचें संसारावरून चित्त उडालें. तेव्हां लोकांनीं त्यास भ्रमिष्ट ठरविलें; व तो शूद्राकडे अन्नोदकव्यवहारही करूं लागला म्हणून त्यास रागें भरून प्रायश्चित्त दिलें. तरी तो तसेंच करी; एके दिवशीं मध्यरात्रीं नवाबाचे वाड्याचे सर्व दरवाजास कुलपें व पहारे असतां नानासाहेब आंतले दिवाणखान्यांत जाऊन उभे राहिले. नवाबांनीं विचारिलें कीं आपण आंत कसे आला? त्यांनीं सांगितलें कीं दरवाजे खुले होते. परंतु शोधा अंतीं सर्व दरवाजे बंद होते असें कळलें. पुन्हां परत कसे जाल म्हणून विचारिल्यावर आल्याप्रमाणें जाईन असें सांगून सर्वांचे देखत सर्व दारें ओलांडून पलीकडे जाऊन उभे राहिले. ही गोष्ट गावांत कळतांच मग बहुत लोक त्यांचे भजनीं लागले व त्या पुरुषाची चहोंकडे ख्याती झाली असें ह्मणतात. त्यांचे मरणानंतर पुढील वंशजांनीं त्यांचे समाधीवर मोठें देवालय बांधिलें तें पातुर गावापासून पश्चिमेस अर्ध मैलावर लहानशा डोंगराचे तळास आहे. तेथें ही यात्रा माघ शुद्ध १०पासून भरत असते. त्यांचे वंशज अद्यापि आहेत ते देशावर उत्साहाकरितां भिक्षामागून द्रव्य जमवून आणितात व थोडें ब्राम्हण भोजन करून पौर्णिमेस मिरवणूक काढितात. त्या दिवशीं भजनवाल्यांच्या दिंड्या गावोगावाहून शेंपन्नास जमतात व नामसंकीर्तन होत असतें. यात्रेचा बाजार सुरू व्हावयाचा तो पौर्णिमेपासून सुरू होतो व सुमारें पंधरा दिवस असतो.

या सालच्या यात्रेंत कापडकरी, कासार, भांडेकरी, किराणेवाले वगैरे लोकांचीं सुमारें एक हजार पालें होतीं व एकंदर मनुष्यें आल्याचा अजमास सुमारें अडीच लक्षांचा झाला. देवघेवीची घडामोड आरंभीं फारशी न होतां शेवटचे चार पांच दिवशीं फार झाली. दगडी जातीं व पाटे वरवंटे सुमारें २००० खपले व नागपुर कामठीकडून त्याचें म्हणजे इकडील तऱ्हेच्या गाड्या सुमारें ५००० आल्या होत्या व त्या सर्व खपल्या. अखेरीस मालकांनीं जे जे दाम सांगितले तेते देऊन कुणबी लोकांनीं सवदे केले.

सालमजकुरीं बंदोबस्ताकरितां मि. मुबारक अल्ली पोलिस इन्स्पेक्टर यांस नेमिलें होतें. त्यांनीं व तेथील चीफ कानस्टेबलांनीं बंदोबस्त चांगला ठेविला होता. पोलिसचे शिपायीही या वर्षीं त्यांचे दिमतीस कमी होते, कारण खामगावाकडील समारंभास चाहोंकडून भरती गेलेली आहे. गुदस्त सालीं गुन्हे पुष्कळ झाले होते. सालमजकुरीं पांच झाले व त्यांपैकीं चार पकडले. दोन दिवस उचले लोक बरेच जमले होते परंतु त्यांतील चवघांवर मुकदमे झाल्यामुळें बाकीच्यांस भीति पडून ते नाहींसे झाले. याप्रमाणें यात्रेची हकीकत झाली.

पातुर पाहण्यास जाणारे लोकांनीं जुन्या रहदारी बंगल्या नजीक डोंगराचे पश्चिमेस जुनें बहुतां दिवसांचें सुंदर कोरीव काम आहे तें अवश्य पहावें. त्यावरून वेरूळच्या व घारापुरीच्या वगैरे कोरीव लेण्याची कल्पना त्यांचे मनांत येईल. हा पातुरचा डोंगर कोरून दोन मोठाल्या होमशाळा चार पांचशें मनुष्यें बसण्याजोग्या बेताच्या केलेल्या आहेत असें दिसतें. ह्या कारागिरीला डोंगराच्या भागाखेरीज इतरचा दगड, चुना, माती, लाकूड, खंडविटा, कवलें यांचा संपर्क देखील नाहीं. या इमारती पूर्वाभिमुख आहेत. दोहीं आठ फुटाची पडवी असून मागें बारा फूट रुंद व बत्तीस फूट लांब असा दिवाणखाना आहे त्याला चौकोनीं तीन खांब आहेत त्यांची प्रत्येक बाजू साडे तीन फुट आहे व उंची आठ फूट आहे. दिवाणखान्यामागें मधोमध एकच खोली सुमारें दहा फुटाची आहे व तें यज्ञकुंडाचें स्थान असावें असें तेथील भस्माच्या वगैरे निशाण्यां वरून दिसतें. व बाजूस एक सोपा आहे तो पाकनिष्पत्ती करितां असावा. ही सर्व एका घराची गोष्ट झाली व याचेच नमुन्यांत दुसरें असावें असें दिसतें. तें बुजलेलें आहे व हेंही बुजलेलें होतें पण सरकारानें दोनशें रुपये खर्चून मोकळें केलें. याच प्रमाणें दुसरें करितील तर बरें होईल.

## मासिक पुस्तकें.

सध्यां मासिक पुस्तकांचा हंगाम सुरू झाला आहे असें दिसतें. ज्ञानप्रसारक, विविधज्ञानविस्तार, सर्वसंग्रह न्यायाश्रम, मनोविहार, स्त्रीज्ञानप्रदीप पुराणांचें पाक्षिक पुस्तक इतक्या मासिक पुस्तकां विषयीं तर आपणास ठाऊक आहेच परंतु आनंदाची गोष्ट अशी कीं यांशिवाय आणखीं पाचसहा मासिक पुस्तकें निघण्या-

च्या तयारींत आहेत असें समजलें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील केळशीकर गणेश रघुनाथ जोशी या नांवाचे गृहस्थ **ज्योतिषरत्नसार** नांवाचें मासिक पुस्तक काढणार आहेत. किंमत डाकहा० सुद्धां अगाऊ ६ रुपये व मागाहून ८ रुपये— वामन गोविंद शास्त्री इसलामपुरकर हे **काव्यार्थदीपिका** या नांवाचें मासिक पुस्तक मुंबईस काढणार आहेत त्याची किंमत अगाऊ ६ रु. व मागा. ९ रुपये. शिवाय डाकहाशील— **वेदांतसूत्रटीका** या नांवाचें मासिक पुस्तक काशीक्षेत्रीं हरिश्चंद्र नावाचे गृहस्थ काढणार आहेत. **वकीलांचा बंधू** म्हणून आलीबागेस तेथील सत्यसदन छापखान्यांत दरमहा च्यार आणे किंमतीचें एक मासिक पुस्तक निघणार आहे. **गायन कला** या नांवाचें एक मासिक पुस्तक मौला बक्ष वीनकार हे बडोद्यास काढणार आहेत.

**सुबोधरत्नाकर** नांवाचें एक मासिक पुस्तक गुजराथी व मराठी भाषेंत बडोद्यास निघूं लागलें आहे. व **वऱ्हाडरिपाटर** हें आमचे येथें पुढील आठवड्यापासून मासिक पुस्तक निघणार आहे. तर हीं सर्व सुरळीत चालोत व यांस चांगला आश्रय मिळो व त्यांपासून देशाचा खरोखर फायदा होवो असें आम्ही इच्छितों.

## वऱ्हाडांतील शाळाखातें.

आमचे वांचकांस ठाऊकच आहे कीं, मुंबई, मद्रास या इलाख्यांवर मुख्य अधिकारी हे गवरनर आहेत; वायव्य प्रांत, बंगाल व पंजाब या इलाख्यांचे अधिकारी हे लेफटिनेंट गवरनर आहेत; अयोध्या, मध्यप्रांत, व महिसुर या ठिकाणीं जसे चीफ कमीशनर आहेत तसे आमच्या वऱ्हाडचे अधिकारी हैदराबादचे रेसिडेंट साहेब आहेत. परंतु वऱ्हाड प्रांतांत व बाकीच्या प्रांतांत इतकाच भेद आहे कीं, तर प्रांतांतील अधिकारी जसे त्या प्रांतांत व नेहमी राहतात तसे रेसिडेंट साहेब वऱ्हाडांत नेहमी राहत नाहींत. ही आमचे प्रांतास मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे यांत संशय नाहीं. इतर प्रांतांत कोणताही अन्याय होत असला व सरकारी कोणतेही खात्यांत कांहीं कमीपणा असला म्हणजे गवरनरासारख्या अधिकाऱ्यांचे तेव्हांच दृष्टीस पडतो. आमचे एथें तसें नाहीं; कारण रेसिडेंट साहेबांकडे वऱ्हाडचें जें काम आहे तें गौण आहे व त्याचें मुख्य काम याहून भिन्न आहे असें त्यांच्या हुद्द्याच्या नांवावरूनच दिसून येतें. इतर अधिक महत्वाचें काम उरकून वऱ्हाडांत येण्यास जरी कित्येक वर्षांनीं त्यांस सवड सापडली तरी या सर्व प्रांतांत फार मुक्काम झाले म्हणजे आम्ही लोकांनी भाग्य समजावयाचें; इतक्या थोड्या काळांत त्यांनीं काय काय म्हणून करावें? आणि इतक्या थोड्या सवडीमध्यें त्यांस सर्व अव्यवस्था व उणेपणा कसा दिसून येईल? असो. आतां आमचे वर्तमानपत्राकडे अवलोकन करण्यास तरी त्यांस फुरसत सांपडेल अशी आशा बाळगून आम्ही पुढील च्यार ओळी लिहितों.

गेल्या आठवड्याचे पत्रांत मेहेरबान रेसिडेंट साहेबांचे अवलोकनार्थ कांहीं मजकूर आम्हीं लिहिला होता त्यांत कांहीं ओळी इकडील शाळाखात्याविषयींही आम्हीं लिहिल्या होत्या. आतां या खात्यांत सरकार पुष्कळ पैसा खर्च करितें व या पैशाचा सद्व्यय व्हावा अशी सरकारची फार उत्कंठा असून त्यापासून लोकांचेंही हित आहे असें समजून जो मजकूर मागें आम्हीं संक्षिप्त लिहिला होता त्याचें आजच्या अंकांत थोडेंसें अधिक विवेचन करितों:—

आमचे विद्याखात्याचे वऱ्हाडांतील मुख्य अधिकारी मेहेरबान डा. सिंक्लेर साहेब आहेत. हे येण्यापूर्वीं तीस पसतीस शाळा होत्या व त्या जिल्ह्याचे डेपुटि कमिशनर यांचे ताब्यांत होत्या. डेपुटि कामशनर यांस इतर कामें फार असल्या मुळें त्यांचे हातून इकडील काम बरोबर होऊन विद्यावृद्धी व्हावी तशी होत नाहीं असें जाणून सरकारानें १८६६ त डैरेक्टर साहेबांची नेमणूक केली व त्यांचे हाताखालीं इन्स्पेक्टर नेमिले. तेव्हां पासून शाळा सुमारें दसपट अधिक झाल्या, आणि पूर्वींचे शाळांतील अभ्यास ही वाढला. अभ्यासाचे अनुरोधानें शाळांच्या तीन प्रति झाल्या—उत्तम प्रतीच्या शाळा, (हायस्कुल्स) मध्यम प्रतीच्या शाळा. (मिडल क्लास स्कुल्स) आणि कनिष्ठ प्रतीच्या शाळा (लोअर क्लास स्कुल्स). रिपोर्टवरून असें समजतें कीं वऱ्हाडांत हायस्कुलें दोन, मिडलक्लास स्कुलें चाळीस, व लोअरक्लास स्कुलें तीनशें आहेत. यांत कनिष्ठ प्रतीचा भरणा मोठा आहे. आतां आम्ही पुढें जी गोष्ट सांगणार आहों ती मोठी आश्चर्यकारक आहे तरी आमच्या वऱ्हाडांतील लोकांच्या कानावर ती नेहमी येत आहे यामुळें आतां तिचा चमत्कार वाटत नाहीं, ती ही कीं, या कनिष्ठ प्रतीच्या तीनशें शाळा डैरेक्टर साहेबांच्या हाताखालीं नसून मारखानाच आहेत; म्हणजे वेगवेगळे जिल्ह्याचे डिपुटि कमिशनर साहेबांचे ताब्यांत त्या शाळा आहेत. हल्लीं डेपुटि इन्स्पेक्टरांचा या स्कुलांच्या बाबतींत सर्व पत्रव्यवहार डेपुटी कमिशनरांशीं चालतो. या शाळांतील मास्तरांच्या नेमणुका डेपुटी कमिशनर करितात. याकरितां अर्थातच विद्याखात्याचें बहुतेक काम दुसरे खात्यांतील लोक करतात असें झालें. आतां डेपुटी कमिशनरांकडे दिवाणी, फौजदारी, मुलकी वगैरे पुष्कळ कामें असल्यामुळें त्यांस फुरसत होणें नाहीं व त्यांचें या कामाकडे लक्ष लागण्याचाही विशेष संभव नाहीं; असें असतां जें काम करण्याकरितां दुप्पट पुष्कळ पैसा खर्च करून अधिकारी नेमिले आहेत तें काम त्या अधिकाऱ्याशिवाय इतर अमलदारांकडून करविण्यांत सरकारचा काय हेतु असेल तो आम्हांस समजत नाहीं. बरें ज्या अमलदारांकडून हें काम करवितात त्यांस फुरसत नाहीं व करण्याची इच्छा नाहीं, व कदाचित अशा प्रकारचें काम करण्याची त्यांस पूर्वींची सवय नसण्याचाही संभव आहे; याकरितां काम बरोबर रितीनें होत नाहीं व अशानें गरीब स्कुलमास्तर लोकांचे मात्र हाल आहेत. त्यांचे बिचाऱ्यांना दोन दोन महिने पगार मिळत नाहीं. डेपुटि कमिशनरांकडून नेमणुका होतात व डैरेक्टर साहेबांकडून पगाराचे तक्ते तयार होतात एवढें मात्र बाहेरील लोकांस ठाऊक आहे. डेपुटी कमिशनरांचे आफिसांत काम फार व तिकडून सर्व प्रकारची माहिती डैरेक्टर यांजकडे जेव्हां जाईल तेव्हां पगारपट तयार होणार, व यामुळें पगारास उशीर लागत असेल असा लोक तर्क करतात. सारांश दोन अधिकारी असले म्हणजे जसे चाकराचे हाल होतात तसे या व्यवस्थेनें गरीब स्कुलमास्तरांचे हाल आहेत, तर यांतून ते लवकर मुक्त होवोत अशी आम्ही आशा करितों.

आतां यावरील लिहिण्यांत डेपुटी कमिशनरांनीं शाळांकडे मुळींच पाहूं नये असें आमचें म्हणणें नाहीं. ते जिल्ह्यांतील मुख्य अधिकारी आहेत. त्यांनीं थोडेंसें लक्ष दिलें तर विद्यावृद्धीस पुष्कळ मदत होण्याचा संभव आहे व त्याप्रमाणें होत गेलीही आहे. मुलें शाळेंत पाठविण्याविषयीं लोकांस उत्तेजन देणें, शाळागृहास लोकांकडून मदत करविणें, व हरएक शाळेच्या कामास लोकलफंडांतून मदत देणें हें डेपुटि कमिशनराकडे आहे. व त्याप्रमाणें या प्रांतांतील कित्येक डेपुटि कमिशनर आजवर हीं सर्व करित गेले, परंतु हल्लीं त्यांच्या हातून न उचले इतका मोठा कामाचा बोजा त्यांच्यावर ठेविल्यामुळें सर्व कामाचा त्यांस त्रास येऊन त्यांच्याहातून मुळींच कांहीं काम नीट व बक्तशीर होण्याचा संभव नाहीं; याकरितां या स्थितीकडे मे. रेसिडेंट साहेबांनीं पूर्ण लक्ष पोचवावें अशी आम्ही त्यांस शिफारस करितों.

## ARRIVAL OE SIR SALAR JUNG AT AKOLA.

SIR Salar Jung K. C. S. I. arrived at the Akola Railway Station this morning accompanied by Mr. Saunders the Resident at Hyderabad. An immensely large con course of Europeans and Natives were gathered to greet the minister and the Resident. The Police were busy keeping order in the crowded. The Train arrived at about eight o'clock A. M., and as it entered the Station the Engine quite astonished the bystanders with a salute of fog signals let off in a rattling succession. An artillery that was awaiting the arrival of Sir Salar Jung fired salutes of 17 guns to the minister, and 13 to the Resident. A Native Cavalry consisting of about 50 soldiers and a company of Native Infantry were drawn up out-side the Station with colours. The Band how ever, played on the platform. Mr. Saunders with Mr. Lyall and Sir Salar Jung with the chief Engineer drove off to the Commissioner's Bunglow receiving and returning salams by hundreds and thousands. The further proceedings of our guests during their brief stay at Akola will be mentioned in our next Issue. The Governor General of India will, we hear, come in on the 4th Proximo and on the following day will proceed to Khamgaum accompanied by Sir Salar Jung and the Resident to open the State Railway there.

## THE RAILWAY INAUGURATION.

IT is understand that the arrangements connected with the ceremony of opening the North-east Extension of the G.I.P. Railway are now approaching completon. His Excellency the Viceroy will proceed by special train from Bhosawal on the 7th March, arriving at Jubbulpore about the same time as the special train from Allahabad conveying H. R. H. the Duke of Edinburgh and party. The Governor of Bombay will meet the Viceroy at Bhosawal and travel with him to Jubbulpore. The visitors from Bombay, and the Agent and officers of the G. I. P. Railway will also reach Jubbulpore at the same time, about 4-50 P.M. The last rail having been keyed-in the party will disperse to the quarters provided for them by the Chief Commissioner of the Central Provinces and by the Railway Authorities. With the permission of Mr. Morris the banquet will take place at the School of Industry, as the only building where sufficient space is available.

Early on the morning of the 8th the Duke of Edinburgh will visit the Marble Rocks, and then meet a special train near the Nerbudda viaduct, which will carry a party of sportsmen to Semree station, between Sohagpore and Bhagra. Near Semree is the footpath which conducts to the shooting in the Denwa Valley, where it is proposed to beat for game on the 9th and 10th. It is believed that Lord Mayo does not intend to shoot on this occasion, but will return at once via Allahabad to Calcutta. The Duke of Edinburgh will arrive in Bombay on the after noon of the 11th March, where he will be received by His Excellency Sir Seymour Fitzgerald, who will have preceded him by about twenty-four hours.

## INDIAN CIVIL SERVICE.

The three young natives who were disqualified last year in their examination for the Indian Civil Service on account of their age have been reinstated by the Civil Service Commissioners.

## वऱ्हाड.

### दिवाण साहेब व रसिडेंट साहेब यांचें आगमन.

ज्यांच्या येण्याची बहुत दिवस वाटाघाट चालली होती व ज्यांकडे लोक डोळे लावून होते ते दिवाणसाहेब सर सालरजंग, के. सी. एस. आय., व रेसिडेंट मेहेरबान सांडर्स साहेब यांच्या स्वाऱ्या आज प्रात:काळच गाडींतून अकोल्यास आल्या. तोफखाना, घोडस्वार, बांडबाजा वगैरे त्यांचे सन्मानार्थ स्टेशनावर नेले होते. स्वाऱ्या येतांच दिवाण साहेबांकरितां १७ व रेसिडेंट साहेबांकरितां १३ तोफांची सलामी झाली. डिपुटी कमिशनर साहेबांच्या विनंतीवरून बहुत सभ्य लोक स्टेशनावर गेले होते परंतु त्यांस या बसा कोणी म्हटलें नाहीं व उलटें "मज्जाव" केलें. तोंडे पाहून भाडभिडेचे जे थोडे लोक स्टेशनावर दारवाजाचे आंत घेतले होते त्यांची तरी प्लाटफार्मकडे दाद लागली नाहींच. मागील बाजूस त्यांस च्यार घटका उन्हांत उभे केलें होतें. सारांश, पैरवी चांगली नव्हती. आतां उभयतां सरदारांच्या स्वाऱ्या सात आठ दिवस एथें राहणार आहेत व एकादा प्रसिद्ध समारंभही होईल असें ऐकतों. तेव्हां त्यासंबंधी सविस्तर मजकूर पुढें लिहू.

गवरनर जनरल साहेबांची स्वारी ११ वये तारखेस एथें येणार व दुसरे दिवशीं खामगावचा समारंभ होईल असें कळतें.

अकोल्यास तूर्त नेत्रसुख विपुल झालें आहे. आज स्टेशनावर पाहिलें तों सुमार पांच हजार लोकांची दाटी होती. मध्यें जरीपटक्याचे घोडे स्वार, पायदळ पलटण, पोलिस, घोड्यावरील तोफखाना, बयांडबाजा इत्यादि पाहून सर्वांस मोठें समाधान वाटेल असेल. तसेच दिवाण साहेबांचे पाच हत्ती व कांहीं स्वार व शिपायी आले आहेत. छावणीमध्यें सर्व तंबूच तंबू झाले आहेत. व कमीशनर साहेबांची कचेरी सुध्दां खासगी बंगला झाला आहे, रस्ते स्वच्छ झाले आहेत यांतून कंदील लाविले आहेत. किल्यांतील हवाखान्यावर एक बाहुटा उभारला आहे. तसाच कमीशनर साहेबांच कचेरीशीं एक ध्वज लाविला आहे. अशी जिकडे तिकडे गंमतच गंमत झाली आहे. व इतक्यांतच हिंदुस्थानचे मुख्य सरकार लार्ड मेयो साहेब ही एथें येत आहेत तेव्हां त्या गर्दीस काय पुसावयाचें आहे?

हिंदुस्थान सरकाराकडे शेतकी व व्यापार खात्याचे सेक्रटरी म्हणून येक नवीन जागा होणार व ती मे० कारनाक साहेब काटन कमिशनर यांस मिळणार असें ऐकतों.

बुलढाण्याहून मेजर अलार्डाइस साहेब व वाशीमाहून क्या० मेकंजी साहेब यांच्या त्यांच्या आफिसासह येथें आल्या आहेत.

पूर्व वऱ्हाडचे कमिशनर साहेब उदईक एथें येणार आहेत.

वाशिमचे हेड क्लार्क मि० क्रो यांस १५० रुपयांवरून ९० रुपयांवर नेमणार व बुलढाण्याचे डिपुटी क्लर्क रा० बापूजी भिकाजी यांस त्यांचे १५० चे जागेवर नेमणार असें ऐकतों.

( रेसिडेन्सी आर्डरावरून. )

हिंदु० सरकारचा फिनानशियल खात्याकडील जाहिरनामा नं. ११ ता० ४ जानेवारी सन १८७०—कोणा सरकारी कामदाराची एक जागेवरून दुसरे जागेवर नेमणूक केली व तिप्रमाणें तो जात असतां त्यास रजा दिली तर त्या रजेस जोडून त्यानें आपले नवे जागेवर केव्हां रुजू व्हावें याचा सुमार पाहून तेही दिवस द्यावे व त्या दिवसांचा त्यास वाटेचा भत्ता मिळण्याचा हक्क आहे.

हिंदु. सर. चा करन्सी खात्याकडील जाहिरनामा नंबर ५२१ ता. २० जानेवारी १८७०—कागदांच नाण्याचीं आफिसें आहेत त्यांपैकीं कित्येक आफिसांनीं आपले अजमासापर्यंत दुसऱ्या कित्येक आफिसच्या नोटी घेऊन रोख रुपये देण्यास व रुपये घेऊन नोटी देण्यास हरकत नाहीं.

हिंदु. सरकारची यादी फिनानशियल खात्यापैकीं नं० ३३३१ ता. २८ डिसेंबर सन १८६९—नवीन रिडक्शन पैकीं काढलेले पोलीस खात्यांतील कामदारांस त्यांने भरल्या चाकरीच दरवर्षास एक महिन्याच्या पगारा इतका पैसा बिनसनदी नोकरांचे रुळीप्रमाणें ( ग्राचुइटी ) बक्षिस द्यावा. त्यांत खासगत कामाकरितां रजा घेतल्या असतील तो काळ व बेवीस वर्षांच वयाचे पूर्वीचा चाकरीचा काळ वजा करून बाकी मोजावी.

हिंदुस्थानच्या मेडिकल खात्याच्या इन्स्पेक्टर जनरलचें सरक्युलर नं. ३९०६ ता ८ अक्टोबर सन १८६९—हिंदु. सर. नें असें ठरविलें आहे कीं जिल्ह्याच्या सदरस्टेशनमध्यें रहाणारे सर्व बिनसनदी कामदार ज्यांच्या नेमणुका सरकारी गयाझेटांतून प्रसिद्ध होतात ते आजारी असतां त्यांच्या घरीं सिविल सर्जन यांनीं स्वत: जाऊन त्यांस पाहिलें पाहिजे—दुसरें एकादें ठिकाण जेथें असिस्टंट सबअसिस्टंट सर्जन, किंवा आस्पिटल असिस्टंट असेल तेथें त्यानें गयाझेटमध्यें ज्यांच्या नेमणुका येत नाहींत असे वरील प्रतीचे सरकारी नोकर क्लार्क वगैरे आजारी पडले असतां त्यांच्या घरीं जाऊन त्यांस पहात जावें—हलक्या प्रतीचे सरकारी नोकरांकरितां डिस्पेन्सरी व जनरल आणि सिविल इस्पितळें आहेतच—खालचे प्रतीचे डाक्टरांनीं आवश्यकता कळविली व रोग्याची भयंकर किंवा अवघड स्थिती असली तर सिविल सर्जनांनीं त्यांकडे गेलें पाहिजे.

हैदराबाद डिपुटी अकौंटंट जनरलचें सरक्युलर नंबर ४७ तारीख १५ जानेवारी १८७०—सिविल खजिन्यांतून पाक्षिक वर्तक खत्याने कामद यांस अडव्हान्स देत जाऊ नये. त्यांचें वेगळें फंड रखावें.

सदरहूकडून दुसरें सरक्युलर नंबर ४८ तारीख मजकूर—लोकलफंडसंबंधी पत्रव्यवहारास आगाऊ साधारण टपाल हशिलाचीं टिकिटें लावित जावीं.

## मागाहून आलेल्या जाहिराती.

नोटिस—रामचंद्र वल्लद कुळभाजी सिपी बोथकर हल्लीं वस्ती बाळपूर यांस खालीं सही करणार यजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडून पूर्वी पैकीं रुपये १२६ त्यात वसूल रुपये ५० जातां बाकी तुम्हांकडेस निघाली बाकी रुपये ७६ व सिवाय दोन वर्षांचें व्याज ऐन रुपये व्याज मुद्दल सुद्धां तुम्ही आठ दिवसांत आमचे आम्हांस द्याव नाहीं तर तुम्हांवर दि. फिर्याद करून व नोटिसीच खर्च समेत रुपये भरून घेतले जातील कळावे तारीख २५ माहे फेब्रुआरी सन १८७० इसवी.

( सही ) भगुलाल ताराचंद मात वारीस पनाबाई वहिवाटदार वन्हय्यालाल इंद्रराज दस्तुखुद.

## परोपकारी व उदार जनांस विज्ञापना

ऐसीजे. पूर्वी ता० २६ मार्च १८६७ इ०चे जाहिरात नेटिव ओरिनेयन पर्यंत कायद्याच अभ्यास करणारास पैशाचें साह्य मिळण्या विषयीं वाचण्यांत आली व हल्लीं ता० २२ ज्यानेवारीचे वऱ्हाड समाचारांत "लायसेन्शिट आफ ला" अशी डिग्री नूतन करण्याविषयीं व्हाइस च्यानसेलरास मुंबई युनिव्हरसिटीचे अंडर ग्राज्युएट हे अर्ज करणार आहेत असें आहे. या वरून सदरील गृहस्थांस विनंती आहे कीं:—

१. माझी म्याट्रिक्युलेशनची परिक्षा सन १८६५ सालांत पास झाली असून माझी इच्छा कायद्याच्या कामांत धंदा रोजगार करण्याची आहे. यास्तव कालेजामध्यें जाऊन विद्याभ्यास करण्यासाठीं दर महा सुमारें रुपये २१ प्रमाणें तीन वर्षे पर्यंत निदान दोन वर्षे पर्यंत निर्वाहाच्या खर्चास पुरविण्यास कोणी सिद्ध असल्यास धंद्यारोजगारांत शिरल्यावर सवडी-च्या हप्तेबंदीनें परत भरणा करण्याविषयीं उसनवारीच्या किंवा हलक्या व्याजाच्या करारानें छापी कागदावर रोखा लिहून रजिष्टर करून देण्यास मजकडून सिद्धता आहे.

मुंबईकर पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस विनंती लिहिण्यांत येते कीं, त्यांचा संतोष असल्यास वरील करारानें व १०० प्रतिष्ठित ब्राह्मण पंक्तीस बसण्याच्या पूर्वीच्या करारानें पुनर्विवाहाच्या कार्यांत उभे राहाण्याची मजकडून अद्यापि सिद्धता आहे.

मुक्काम कसबे शेगांव तालुके मेहकर ता० २३ फेब्रुवारी सन १८७० इसवी.

हरी नारायण गोडक.

## वर्तमानसार.

**धुळें**—इंजिनियर खात्यांतील नारायण रामचंद्र फ० ग्रे० ओ० यांजवरील कमिट खटल्याची चौकशी सेशन कोर्टांत चालू आहे अद्याप निकाल झाला नाहीं. ह्या खटल्यांत प्रासिक्युशनचें काम एथील फ० अ० क० मे० प्रिचर्ड साहेब हे स्वत: पहात आहेत. अखेर कोणत्या पल्यावर याचा शेवट होईल हें आज कळत नाहीं.

खा. वै.

दहा लक्षांवरील खर्चाची इरिगेशनची ( बंधऱ्याचीं ) कामें स्टेट सेक्रटरीचे मंजुरीशिवाय हिंदुस्थान सरकारानें आरंभूं नयेत असा ठराव झाला आहे.

कर्नल मीड सी एस आय यांस म्हैसुरास चिफ कमिशनर नेमिलें. या गृहस्थानीं तात्या टोपास पकडलें होतें तें वाचकांस आठवत असेल.

पारिस शहरांत फ्रान्सचा नेपोलियन बादशहा यास ठार मारण्याचा कट झाला होता पण तो उघडकीस आला.

विलायतेहून सिविल सर्विसवाले नवीन २५ गृहस्थ हिंदुस्थानांत येण्याचें ठरलें. यातून बंगाल इलाख्यास १७ व वायव्य प्रांतास ८ जातील.

जंजिऱ्याचे पोलिटिकल एजंटास असि. से. जजाचा अधिकार दिला.

**नाशिक** एथून श्रीधर वासुदेव नावाच्या गृहस्थांनीं तथील कलेक्टर मि. ओव्हन साहेब यांचा मुनसिपल कमिटींतील कामाविरुद्ध कांहीं मजकूर इंदुप्रकाशांत छापविला होता व संशयावरून त्यांचे घराचा झाडा घेतला त्यांतही साहेबांचे विरुद्ध तार केलेला एक अर्ज आढळला. त्याची सेशनांत चौकशी होऊन कांहीं चार्ज रद्द झाले. व एका बद्दल श्रीधर वासुदेव यास शंभर रुपये दंड झाला.

सर. हेनरी डुरंड यांस पंजाबचे लेफ्ट० गवरनर नेमिल्याचें वर्तमान आहे.

धुळ्यास मुलींच्या शाळेची परिक्षा झाली. तथील मुलींचा अभ्यास दुसरे यत्तेपर्यंत आहे. व त्या शुद्ध लिहितात.

कच्छचे राव, नवानगरचे जाम, व कोल्हापूरचे राजे मार्चच्या तिसरे तारखेस सुमारास मुंबईस येतील. कच्छच्या रावांची रयत व्यापारी वगैरे मुंबईस सुमारें दोन लक्ष आहे तिनें आपल रावांचे सन्मानार्थ दरूकाम सोडण्याचा व नजराणे देण्याचा वगैरे बेत केला आहे.

आम्हांस हें लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं अधिक वयाचे सबबीनें सिविल सर्विसच्या परिक्षेंत पास झालेल्या तीन हिंदु गृहस्थांस नापास केलें होतें त्यांची वयें परिक्षेस योग्य आहेत असें चौकशी करून ठरविलें.

अफूची लागवड करणाऱ्या रयतेच्या कबुलायतनाम्यास स्टांप कागदाची जरूर नाहीं असें हिंदु० सर० नें ठरविलें.

राजपुत्र ड्युक आफ एडिंबरो याची स्वारी पुढील महिन्याचे ११ वे तारखेस मुंबईस जाईल.

माजिस्त्रेटचा शिक्का कसा असावा या विषयीं सन १८२७ चे बारावे कायद्याचे तिसरे कलमाची दुसरी रकम आहे ती रद्द करण्या विषयीं मुंबई इलाख्याचे कायदे कौंसलांत आक्टाचा मसुदा झाला आहे. नवीन पाहिजे तसा शिक्का करविण्या विषयीं वेळोवेळ सरकारानें ठराव करावा असा या आक्टाचा उद्देश आहे.

जबलपुर व भुसावळ मधील रेलवे व्यासेंजरकरितां एप्रिल महिन्याचे पहिले तारखेपासून सुरू होईल व मार्चाचे ८ वे तारखे पासून माल जाऊं येऊं लागेल.

**ठाणें.** कलेक्टर साहेब यांचे दप्तरांतील कारकून रा. रा. सदाशिव गणेश व्हाडी यांस जंजिरा एथें पोलिटिकल एजंटचे शिरस्तेदार नेमिले.

मि. हाग साहेब फर्स्ट असि० कलेक्टर हे रजेवर गेले त्यांचे जागेवर मि० मेकडानल्ड यांची नेमणूक होऊन त्यांनीं कामाचा च्यार्ज घेतला.

ठाणें जिल्हाअसोसिएशनची जनरल वार्षिक सभा कालअस्तमानीं भरली होती, सर्वांचे सूचनेवरून अध्यक्ष स्थान रावबहादूर नारायण गणेश साठे यांणीं स्वीकारिलें होतें. रा. रा. रामचंद्र त्रिंबक यांच्या सूचनेवरून मागील दोनसालचा रिपोर्ट रा०रा० गोविंद बाबाजी जोशी सभेचे चिटणीस यांनीं वाचून दाखविला. नंतर सभेच्या नियमांत, वर्गणींत, व सभासदांत बराच फेरफार होऊन ठरावांत आल्यावर अध्यक्षांनीं सर्वांचे आभार मानून सभा विसर्जन झाली.

सूर्योदय

**सोलापुर**—हवा उष्ण आहे. दिवसां ऊन फार लागतें व रात्रीं गरमी होते. रोगराई कांहीं नाहीं. परंतु थंडी मात्र या सालांत बिलकुल नाहींशी झाली त्यामुळें पिकाचें नुकसान फार झालें आणि धान्याचीही महर्गता झाली आहे. कापूस तुरी, हरबरे हीं पिकें अगदी कमी झालीं जोंरी बरी आहे परंतु पर्जन्यानें धान्य काळें झालें.

येथील म्युनसिपालिटीचें काम बरें चाललें आहे. रस्ते ही स्वच्छ झाले आहेत. आमचे राव बाहादुर व मामलेदार साहेब उभयतां फार मेहनत घेत आहेत. येथें म्युनिसिपालिटीकडे एक बाग तळयावर तयार केला आहे त्यास आतां शोभा उत्तम येत चालली आहे. बाहेरून नूतन कंपौंड व कठडा करण्याचे काम चाललें आहे

कल्पतरु

**पुणें**—जज्ज कोर्टांतील वकील रा. रा. काशिनाथ परशुराम गाडगीळ ह्यांस सरकारानें स्तनगिरिस सरकारी वकीलीचे कामावर नेमलें आहे. ह्या जागेचा नेमणुकी पगार १५० रुपये असून शिवाय दरमहा अजमासें रु. ५० पर्यंत दिवाणी मोकदम्याची फी मिळते. ही जागा पतकरण्यास मशारनिल्हे गाडगीळ हे खुषी नव्हते, परंतु मे. फ्रान्सिस साहेब सर्वे कमिशनर यांच्या आग्रहामुळें त्यांणीं ती जागा पत्करली असें आम्ही ऐकतों.

ज्ञा. प्र.

**सातारा.** मि. जनार्दन बल्लाळ बापट यांची एथील हेड आकौंटंटच्या जाग्यावर नेमणूक झाली त्याप्रमाणें ते एथें येऊन त्यांणीं आपले कामाचा चार्ज घेतला. शु०

**सर विलियम म्यानस्फील्ड** साहेब पुढील महिन्यांत विलायतेस जागार. हे गृहस्थ १२ वर्षे हिंदुस्थानांत होते.

**लार्ड नेपियर साहेब** विलायतेहून लवकरच इकडे येतील.

**रशियन**—सरकारची फौज साडेपांच लक्ष आहे.

**फौजांचा** हिंदुस्थानांत जो खर्च आहे यांत सालिना सुमारें चाळीस लक्षांचें रिडक्शन होणार.

**बाबु केशव चंद्रसेन** यांजबरोबर दुसरे ६ | ७ गृहस्थ सिविल सर्विसची परिक्षा वगैरे करितां विलायतेस जात आहेत.

## पत्रव्यवहार.

भादोली ता० चिखली एथून वऱ्हाड समाचार कर्ते यांस.

विनंती विशेष, पावसाळा आला म्हणजे बंद होऊन दिवाळीअखेर जसीं इंजिनियर लोकांचीं हपिसें सुरू होतात तसेंच दरसालप्रमाणें तेथें ता० १७ मजकूर रोजीं वन्हि महाराजानें आपलें हपीस सुरू करून स्वतां येका कुणब्याच्या कोठयावर समन्स बजावून आहुती करून तो खाक केला. ह्या प्रसंगीं ईश्वराची मोठीच दया झाली कीं वारा बिलकुल नव्हता, त्यामुळें सदरहु ग्रहस्थास जें मिळालें तेवढयावरच संतुष्ट होऊन हिरमुसपणें त्यास परत जाणें भाग पडलें. ती कसर काढण्याकरितां पुन्हा कालरोजीं येका मुसलमानाच्या घरावर पुडी करितां उडी घातली पण स्वारी सडी असल्यामुळें खडाखडीच येऊन परत गेली. अशा निर्दयांची कचेरी सुरू झाली म्हणजे सर्वांस धस्ती स्वती होऊन रस्तोरस्तीं गस्ती द्याव्या लागतात. ही स्वारी येण्यास कोणाचें अंग असतें ह्याचा अद्याप थांग लागला नाहीं. पण काल रात्रीं दंवडी पिटली आहे कीं असा मनुष्य जो धरून देईल त्याला इनाम मिळेल.

येथील शाळा दिवसें दिवस उत्तम दशेस येत चालली आहे. पण पळसास पानें तीनच तीन. हल्लीं मुलांचा नंबर ८० वर आहे पण तिसरा मदतनीस मिळत नाहीं. येथें महारचांभरही शिकताहेत. इकडील कष्ट पाहून वरिष्ठांनीं रुष्ट न होतां संतुष्ट होऊन कनिष्ठांसही संतुष्ट करावें.

डेपुटीकमीशनर बुलढाणा, डेपुटी इन्स्पेक्टर, लोकलफंड इंजिनियर इत्यादि नांदुरा, खामगावाकडे गेले. पोलिस सुपिंटेंडेंट देऊळ गावराजा येथें आहेत. आगगाडीचा समारंभ झाल्याखेरीज परत येण्याचें चिन्ह दिसत नाहीं.

मि० मीरचिरागुदीन साहेबांचे तीर्थरूप मे. सय्यद कमालुद्दीन साहेब ता० १७ रोजीं ह्या गावीं मुक्काम करून आपले जावई मे० शेख हिसामुद्दीन साहेब ह्यांस भेटण्याकरितां इछिचपुराकडे गेले. हे गृहस्थ फार उत्कृष्ठ आहेत व मनाचे थोर व शाळा वगैरे देशसुधारणेचीं कामें पहण्याची यांस फार हौस आहे.

बुलढाणें येथें बराच खर्च करून ह्यांनीं येक महजद बांधण्यास आरंभ केला आहे. निमें काम झालें व निमें होणें आहे.

भादोली गावांत कांजण्या रोगाची फार सांत आली आहे व बहुत मुलें त्यामुळें आजारी आहेत.

जिकडे पाहावें तिकडे पांढरेंच पांढरें झालें आहे. जागोजाग कापसाचे रेचे सुरू आहेत. दर मणीं आठ आणे पर्यंत दर चढला असून रेचा चालवण्यास माणूस मिळत नाहीं. ह्यावरून किती काम जारी चालले आहे हें सहज अनुमान होतें. असो गरिब गुरिबांचें पिकलें आहे. वरकड रोगरायी नाहीं. हवा स्वच्छ आहे. पण दिवसेंदिवस गर्मी होत आहे

एक फिरस्ता.

## समाधि किंवा मृतस्थिति.

(मागील अंकावरून पुढें चालू)

रोमन लोकांत या विद्येची माहिती होती; परंतु हिंदु लोकांनीं त्यांत अगदीं शिखर संपादिलें. हिंदुस्थानांतील योगी व फकीर लोक नुसते महिनेच काय परंतु वर्षेच्या वर्षेंही अशा जीवन्मृत स्थितीमध्यें राहात.

सन १८३७ त लाहोर एथें रणजीत शिंग यांचे दरबारांत एका फकिरानें आपणास पुरून घेतलें होतें त्या वेळेस सर क्लाडवेड हे हजीर होते. ते पुढें लिहिलेली हकीकत देतातः— "एका खोलीत तीन फूट खालीं जमीनींत एका फकिरानें पुरून त्या खोलीचे तीन दरवाजे दगड चुना लावून बंद केले व चौथ्यास कुलूप लावून त्याजवर महाराजांनीं आपलें मोर्तब केलें. रात्रंदिवस तेथें शिपायांचा पहारा ठेविला होता म्हणून आंत काहीं अन्नपाणी जात असेल अशी शंका घेणें नको. फकीर मखमलीच्या एका पिशवींत गेला व डोक्यावर पिशवीस गांठ मारली होती. नंतर ती पिशवी एका लांकडी ४ फूट लांब ३ तीन रुंद अशा पेटींत घालून बंद करून पुरली. नंतर ज्या वेळेस ती पिशवी बाहेर काढली त्या वेळेस मला संशय आल्यावरून मी सांगितलें कीं फकिरावर बरा होण्याकरितां कांहीं प्रयोग करण्याचे पूर्वी मला त्यास पाहिलें पाहिजे. त्याप्रमाणें मी पाहिला. पिशवी जशी फार दिवस मातींत असावी त्याप्रमाणें दिसत होती. हात पाय आंखडून तांठळे होते. तोंडवळा पूर्वीं प्रमाणें होता परंतु मानेचा कांटा मोडून जशी प्रेताची डोकी एका बाजूस पडावी तशी होती. नंतर मी डाकतरास बोलाविलें. त्यांणीं पाहून सांगितलें कीं, हात, हृदय, व कानसूले यांत अगदीं धडधड नाहीं. सर्व शरीर कालाप्रमाणें गार होतें. परंतु मस्तकाच्या वरच्या भागास मात्र ऊब होती. नंतर या फाकिराचा चेला त्याजवर ऊन पाणी घालूं लागला. व हात पाय आखडले होते ते सरळ करूं लागला. डोकीवर एक इंच जाड गव्हांची पोळी ठेविली या प्रमाणें त्याणें तीन चार वेळ केलें, नंतर नाक व कान यांत जें मेण व कापूस श्वास बंद करण्या करितां घातला होता तो काढून टाकिला व सुरीच्या टोंकानें त्याची दांतखिळी उघडली. नंतर तूप लावून पापण्या उघडूं लागला. व उघडल्यावर डोळे अगदीं प्रतासारखे पाणीरहित असे दिसले. नंतर नाकाचा शेंडा जो मोडून पडला होता तो उभा राहिला, श्वास सुरू झाला, हातपायांस ज्या सुरकत्या पडल्या होत्या त्या जाऊन पूर्वीं प्रमाणें ते फुगले, व हातांत नाडी आली. नंतर त्याणें थोडेसें तूप तोंडांत घातलें व फकिरा कडून गिळविलें नंतर त्या फकिरानें रणजित शिंग यांस ओळखून विचारलें कीं मि ब्रम्हांडीं प्राण नेतों हें आतां तरीं तुम्हांस खरें वाटतें काय? पेटी उघडल्या पासून सुमारें अर्ध तासाचे आंत तो चांगला बोलूं लागला.

डा० ब्रेड साहेब दुसरें उदाहरण लिहितातः—सन १८३९ त एका हिंदूनें आपणास पुरून घेतलें. एका घरांत ३ फूट लांब, २॥ फूट उंच व रुंद असें एक भुयार होतें त्यांत मलमलींत शिवून त्यास उकिडवा बसविला होता. दोन मोठ्या शिळा ६ फूट लांब व हातभर जाडी भुयाराचे रुंदीच्या तोंडावर ठेविल्या होत्या. घराचें दार चुन्यानें बंद करून ठेविलें असून वाटोळे पाहारेकरी होते. एक महिन्यानंतर घर उघडून पूर्वोक्त कृति केल्या वर तो मनुष्य बोलूं चालूं लागला.

सन १८२८ त दुसरें एका मनुष्यास ४ फूट खालीं पुरलेलें. एका युरोपियन पलटणीचे लोकांनीं पाहिलें. त्याणें आपणास दहावे दिवशीं वर काढा असें सांगितलें होतें. परंतु क्यापटनास भीति वाटून त्याणें त्यास तिसरेच दिवशीं वर काढलें. तो अगदीं प्रेतवत दिसत होता. व बरा होण्याचे उपाय केल्यावर उठता झाला.

जगन्मित्र

## जाहिराती.

### जाहिरनामा.

तमाम लोकांस देण्यांत येतो कीं अकोलें जिल्ह्यापैकीं खालीं लिहिलेले सन १८७० । ७१ सालाबद्दल मक्ते तारीख २७ जानेवारी सन १८७० रोजीं हरास करण्यांत आले असून ज्या लोकांनीं ते लिलावांत घेतले त्या लोकांनीं लिलांवाच्या शर्तींप्रमाणें पेशगी म्हणजे चौथाईचा ऐवज मुदतशीर आणून न दिल्याकारणानें मक्ते मामुलप्रमाणें पुनः लिलांव करण्यांत येत आहेत. हा लिलांव ता० १० माहे मार्च सन १८७० रोजीं गुरुवारीं दहा वाजतां डिपुटी कामिशनर जिल्हा अकोलें यांचे कचेरींत सुरू होईल. सबब हा मक्ता घेण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांणीं नेमले ठिकाणीं नेमले तारखेस हजर व्हावें, याबाबदींत जास्त माहिती पाहिजे असेल तो खालीं सही करणार यांचे आफिसांत मिळेल. लिलांव होण्याचे मक्ते.

१. तालुके बाळापुर सबंध कलालीचा.
१. " जळगांव.
१. विषयुक्त सबंध तालुक्याचा.
१. अफू गांज्या प्रगणे जळगांव व प्रगणे जामोद.

येणें प्रमाणें मक्त्याचा फेरलिलाव होणार आहे. तारीख १७ फेब्रुवारी सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

माधवराव हरी
शिरस्तेदार.

J. FITZGERALD
Officiating Deputy Commissioner
Akola District

नोटिस—सुकदेव केजडीवाल रहाणार खामगांव यांस मनोहरदास सावतराम रहाणार मुंबई हल्लीं मुक्काम अकोलें यांजकडून देण्यांत येते कीं, तुमचेकडे खात्यावरून बाराशें चवदा रुपये दिडआणा निघत आहे तर ही नोटिस पावल्या पासून आठ दिवसांत आपण येथें येऊन निकाल करावा निकाल न केल्यास सरकारांत फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील. कळावें तारीख २६ फेब्रुवारी सन १८७०

( सही ) मनोहरदास सावतराम.

### जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें पुढील सालचीं ज० ग० छा० त छापलेलीं आम्हांकडे विक्रीसाठीं आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ०३ आणे.

| किंमतीचे ठराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास… … | ६ | ० |
| साल अखेर … … … | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ … … | ३ | ८ |
| एक अंकास … … | | ६ |
| फुटकळ … … … | ० | ४ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ आठवड्यांबद्दल टपाल खर्च अगाऊ पडेल तो ३ रु. ४ आणे व सालअखेर ३ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून २ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब सरून नवें साल चालू होईल तेथून २ महिन्यांची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत… … … १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०।०६
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ०४

एकच मजकूर वारंवार छापणें झाल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible there Subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

**सूचना**—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते बालबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास सवा दोन वर्षे होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस हो विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंदकरून ज्या लोकांनीं त्याजबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता० १० माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छा. प्र. केलें.